

# केल्याने देशाटन

गो. प्र. सोहोनी

म. ग्रं. स. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. १५१

REFBK-0024246

२४२४६
२७।७।८४

# केल्याने देशाटन

## ईशान्य भारत, कर्नाटक आणि कन्याकुमारी प्रवासवर्णन
## आणि 'गंगालहरी' या संस्कृत काव्याचा श्लोकबद्ध अनुवाद

लेखक – गो. प्र. सोहोनी
बी ए (ऑ) एल् एल्. बी, बी टी

साहाय्यक – सौ. कमला गो सोहोनी
व
श्रीमती उज्वला चं काटे

REFBK-0024246
REFBK-0024246

मूल्य १८ रुपये

नूतन प्रकाशन, पुणे ४११०३०.

प्रकाशक :

गो. के जोगळेकर

नूतन प्रकाशन

२१८१ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशन क्रमांक : ७३

प्रथमावृत्ती : २६-६-१९८४

© गो प्र सोहोनी

चित्रकार 'प्रफुल' पुणे ३०

मुद्रक .

सौ सुलोचना रा रिठे

सर्व्हे नं १३० दांडेकर पूल

पुणे ४११०३०

# लेखकाचे मनोगत

१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर १९७७ या काळात आम्ही ईशान्य भारताचा प्रवास केला नेहमीच्या प्रथेप्रमाणे प्रवासात मी विस्तृत टिपणे केली होती. परतु १९ मे १९७७ रोजी मला अर्धांगाचा आजार झाला आणि माझ्या शरीराची उजवी बाजू लुळी पडली, वाचा अजिबात गेली व उजवा हातातली शक्ती गेल्यामुळे लिहिणे अशक्य झाले महिना-भर दवाखान्यात राहिल्यावर हातपाय थोडे थोडे हलू लागते. काही महिन्या-नतर स्वतन्त्रपणे हिंडू फिरू लागलो उजव्या हाताने वेड्यावाकड्या अक्षरात लिहू लागलो

टिपणे काढून पाहिली त्यावरून पुस्तक लिहावयाचे धाडस करावयाचे ठरविले पण वाचा गेल्यामुळे दुसऱ्याला सांगून त्याने लिहावयाचे हे शक्य नव्हते तेव्हा स्वतःच हळूहळू लिहावयाचे असे ठरविले. पण हात दुखू लागे. शेवटी १९८२ अखेर लिहिणे सपले

पण अक्षर फार वाईट होते. ओळी वेड्यावाकड्या असत या वेळी माझी विद्यार्थीनी श्रीमती उज्वला काटे माझ्या मदतीस आली आणि तिने चांगल्या सुवाच्य अक्षरात माझ्या हस्तलिखिताची नक्कल करून दिली या कामाला तिला वर्षभर लागले. नंतर प्रकाशकाचा शोध सुरू केला मी बोलू शकत नसल्यामुळे प्रकाशकांच्या प्रश्नांना उत्तरे देऊ शकत नसे शेवटी नूतन प्रकाशन, पुणे ३० या सस्थेचे मालक श्री गो के. जोगळेकर यांच्याकडे शब्द टाकला त्यांनी माझे ‘आदर्श शिक्षक’ हे पुस्तक १९७५ साली प्रकाशित केले होते. उमदा स्वभाव, निर्लोभ वृत्ती, आणि हळुवार सहानु-भूतीने भरलेले अंतःकरण हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू मला माहीत होते. त्यांनी माझी ही कामगिरी पत्करली. असा सुयोग जुळून आला व त्याचा परिपाक म्हणजे आज २६-६-१९८४ रोजी माझ्या ८१ व्या वाढदिवशी हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाचे नाव ' केल्याने देशाटन ' हे श्री जोगळेकर यांनीच सुचविले. या पुस्तकात ईशान्य भारताच्या प्रवास वर्णनाखेरीज महाराष्ट्र एज्युकेशनल् जर्नल या मासिकात प्रकाशित झालेली माझी दोन प्रवासवर्णने आहेत. असे हे प्रवासवर्णन-त्रिदल आहे शिवाय गंगालहरी या सुप्रसिद्ध संस्कृत काव्याचा मी केलेला मराठी श्लोकबद्ध अनुवाद आहे

अगदी अथपासुन इतिपर्यंत हे पुस्तक लिहून प्रकाशित करण्याचे कामी माझी प्रिय पत्नी कमला हिचे मला उत्स्फर्त सहकार्य व साहाय्य मिळाले ही गोष्ट अत्यंत कृतज्ञतापूर्वक मी कबूल करतो तिच्या मदतीशिवाय व उत्तेजनाशिवाय मी काहीच करू शकलो नसतो तिचा मी अतिशय आभारी आहे वेड्यावाकड्या अक्षरात लिहिलेल्या माझ्या हस्तलिखिताची सुवाच्य अक्षरात नक्कल करण्याचे कटाळवाणे वेळखाऊ व किचकट काम माझी विद्यार्थीनी श्रीमती उज्वला काटे हिने नोकरी साभाळून अनेक शनिवार रविवारी व सुट्टीच्या दिवशी वेळ मोडून आपलेपणाने केले याबद्दल तिचा मी फार आभारी आहे हे काम तिने केले नसते तर पुस्तक तयारच झाले नसते. उन्हातान्हात पावसापाण्यात माझ्या घरी येऊन ती हे काम करायची. शिवाय महत्वाच्या सूचनाही करायची

प्रकाशक श्री. गो के. जोगळेकर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील प्रुफे तपासणे छापखान्यात छपा करणे, ब्लॉक तयार करून घेणे इत्यादी सर्व कामे त्यांनी आपलेपणाने केली म्हणून केवळ हे पुस्तक सूर्य प्रकाशात येत आहे श्री जोगळेकर यांचे मनापासून आभार मानून हे मनोगत पुरे करतो

गो. प्र सोहोनी

२६ जून १९८४

माझ्या

दिवंगत धाकट्या बहिणी



सौ. उमाबाई शंकर बापट



सौ. ताराबाई गणेश आपटे

यांच्या पवित्र स्मृतीस

सादर अर्पण

अण्णा

# ऋणानुबंध

सुमारे १२ – १३ वर्षांपूर्वी श्री गो प्र सोहोनी यांचा परिचय शालेय पुस्तके तयार करण्याच्या निमित्ताने झाला पुढे स्वतंत्र प्रकाशन सुरू केल्या-वर आणखी वाढत गेला. पहिल्याच वर्षी अनेक दिवस पडून राहिलेले आदर्श शिक्षक हे पुस्तक प्रसिद्ध केले व ते महाराष्ट्रभर सर्व शाळात मान्यताही पावले ते पुस्तक म्हणजे शिक्षकांची भगवत्‌गीताच आहे. ते सर्व धर्मीय लोकांकरिता कुराण बायबल आहे. माझ्या मते शिक्षकाला धर्म नसतो. असेल तर तो वैयक्तिक असतो साऱ्या जगातील शिक्षकानी ते पुस्तक वाचावे असे आहे त्याचमुळे एक निरपेक्ष सेवा म्हणून त्याचे इंग्रजी भाषांतर त्यांनी केले. त्याचा हिंदी–कानडी अनुवाद लवकरच प्रसिद्ध होणार आहे. गुजराथी-बंगाली अनुवादाचा प्रयत्न चालू आहे. भारतीय साऱ्या भाषातून ते प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न आहे


सौजन्यमूर्ती अशा आमच्या अण्णांना ( तथा गो. प्र. सोहोनी ) काळाने फार मोठी शिक्षा का केली हे मला कळत नाही. अर्धांगाने त्यांचे काही काळ चलनवलन व वाचाच बंद केली. त्यांचे हे हाल माझ्याने पहावत नसत व म्हणून मी त्याना भेटत नसे पण मोठ्या मानसिक धैर्याने त्यानी त्यावर मात केली वाचन-चिंतन-मनन व लेखनही चालू ठेवले.

त्यांची आज्ञा प्रमाण मानून ‘ केल्याने देशाटन ’ हे त्यांच्या प्रवास-वर्णनाचे पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरविले. ते आज प्रसिद्ध होत आहे. काही ऋणानुबंध मोठे विचित्र असतात त्यांच्या पत्नी जोगळेकरांच्या माहेरवासिनी आहेत. हा एक मोठा दुवा ! जणू मोठी आत्याच अशा प्रेमा-पोटी हा सारा घरगुती खटाटोप. मोठ्या माणसाचा असाच आशीर्वादाचा प्रेमळ हात पाठीवरून सदैव फिरत रहावा यापेक्षा जास्त भाग्य ते काय ?

**पो. के. जोगळेकर**

प्रकाशक

# केल्याने देशाटन



दगडी रथ   विठ्ठल मदिर, हपी



गो प्र सोहोनी श्रीमती उज्वला काटे
व सौ कमला सोहोनी



श्री विवेकानद केंद्राचा परिसर,
कन्याकुमारी



सौ कमला सोहोनी व श्रीमती
उज्वला काटे, उटकमडल



काझीरंगा अभयारण्यातला एकशिंगी गेंडा, आसाम



गोकर्ण येथील समुद्रात सूर्यास्त



तिरदाजी भूतानचा राष्ट्रीय खेळ

भारतात सर्व प्रकारची खनिज संपत्ती कोठेना कोठे उपलब्ध होते. जगातल्या सर्व प्रकारच्या वनस्पती भारताच्या निरनिराळ्या भागात आढळतात ध्रुव प्रदेशातले सील, पांढरे अस्वल, पेंग्विन व पेलिकन हे प्राणी आणि ऑस्ट्रेलियातले कांगारू हे प्राणी वगळले तर जगातील सर्व प्रकारचे प्राणी– पशुपक्षी– भारतात आढळतात

जगातील सर्वात जुने वाङ्मय, सर्वात जुनी महाकाव्ये भारतातच जन्माला आली. भारतात सर्व धर्मांचे, पंथाचे, वर्णाचे, चालीरीतींचे लोक राहतात

भारतातील तत्त्वज्ञ ऋषिमुनींनी जीवनाचा जितका सखोल विचार केला तितका जगात अन्यत्र कोठे केलेला दिसत नाही श्रीमद् भगवद्गीते-सारखा चित्तशांती देणारा आणि मानवांना सन्मार्गाला लावणारा दुसरा ग्रंथ जगात नाही अशी कबूली जगातील अनेक तत्त्वज्ञानी पुरुषांनी दिलेली आहे. तीच गोष्ट वेदोपनिषदाची कालिदासासारखा कवी व नाटककार जगात दुसरा नाही. संस्कृतसारखी व्याकरणशुद्ध आणि मधुर व अर्थपूर्ण भाषा दुसरी नाही कोहिनूरसारखा हिरा जगात दुसरा नाही असे म्हणतात. अजंठाच्या लेण्यात आढळणाऱ्या चित्रांसारखी चित्रे, वेरूळच्या लेण्यांसारखे शिल्प काश्मीर मणिपूरसारखे सृष्टिसौंदर्य जगात अन्यत्र कोठे क्वचितच आढळते

भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, नाट्य आणि काव्य जगभर प्रसिद्ध आहे कलात्मक सुंदर सुंदर वस्तू हाताने बनविण्यात भारतीय कारागिरांचा हात क्वचितच कोणी धरू शकेल जगाला देण्यासारखे भारतापाशी जितके आहे तितके अन्य कोणत्याही देशापाशी सापडणार नाही शाश्वत जीवन-मूल्ये सत्य, अहिंसा, स्त्रीबद्दल आदर, सचोटी, परधर्मसहिष्णुता, परमेश्वराब बद्दल भक्तिभाव आणि माणुसकी भारताइतकी अन्यत्र कोठे प्रत्यक्ष आच-रणात आलेली दिसणार नाहीत म्हणूनच, ' दुर्लभ भारते जन्म ।' असे म्हटले जाते भारतात जन्मले इतके साक्षात्कारी संत, वीरपुरुष आणि राज्य-कर्ते इतर कोणत्याही देशात आढळत नाही

याचा अर्थ असा नाही की भारतात वाईट असे काही नाही अस्पृश्यता आहे, गरीबी आहे, अज्ञान आहे, अंधश्रद्धा आहे, अस्वच्छता आहे, विषमत

उत्तर प्रदेशात आहे. त्या खालोखाल ५,७३५ कि मी. मध्य प्रदेशात आणि आणि ५,६१२ कि मी राजस्थानात आहे.

---

## प्रकरण दुसरे

# आम्ही केलेले प्रवास

आम्ही एकूण दीर्घ मुदतीचे सोळा प्रवास केले साधारण वर्षांनी एक प्रवास दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुटीत तीन वर्षात तेवढी शिल्लक साठत असे पहिली सात वर्षे प्र जमले नाही कारण शिल्लकच पडत नसे

मे १९३७ मध्ये कलकत्याला जाण्याचा योग आला आचार्य अत्रे याना भीत भीतच विचारले त्यानी, ' अवश्य जा ' असे म्हटले. ते पुढे म्हणाले " शिक्षकानी भरपूर प्रवास केला पाहिजे डोळस पणाने सर्व पाहिलं पाहिजे विशेषत सामान्य लोकांचे जीवन पाहिले पाहिजे आपले अध्यापन रंजक करण्यास त्याचा उपयोग होतो सहकुटुंब जाणार आहात ना ? आपल्या कडच्या बायकांना फारस बघायला मिळत नाही. त्यांना अवश्य बरोबर न्या. अनायासे उन्हाळ्याची सुटी आहे."

आम्ही पाच वर्षाचा मुलगाही बरोबर न्यायचा ठरविला. आमचा पहिला मुक्काम नागपूर होता. पण ऐन मे महिन्याचे ऊन ! कधीच असल्या उन्हाळ्याची सवय नाही दोन तीन दिवसांनी तिथला मुक्काम हालविला म्युझिअम व तलाव पाहिले. विशेष काही बघण्यासारखे नागपूरला नव्हतेच. संत्री भरपूर खाल्ली.

दुसरा मुक्काम कलकत्ता. कलकत्याला विद्यार्थ्यांनी चालविलेल्य

गजबजलेले शहर झाले आहे

भुवनेश्वर पाहून आम्ही पुण्याला परत आलो. या प्रवासाचा एक फायदा असा झाला की मला व माझ्या पत्नीला प्रवासाची गोडी लागली व त्यासाठी जरूर ते कष्ट करण्याची मनाची तयारी झाली. निदान हिंदुस्तान तरी बघायचाच असा आम्ही दोघांनी निश्चय केला. दरमहा थोडी थोडी रक्कम प्रवासाकरिता बाजूला काढून ठेवू लागलो त्यावेळी प्रवास हल्ली सारखा महाग नव्हता तीन वर्षांत एक महिन्याच्या दोघांच्या प्रवासाला [illegible]

(२) आमचा दुसरा प्रवास आम्ही इ. स. १९३९ साली पुणे ते हृषीकेश असा केला प्रथम दिल्लीला मुक्काम करून सर्व दिल्ली पाहून घेतली कुतुबमिनार वरपर्यंत चढून पाहिला व प्राचीन काळच्या स्थापत्य विशारदाचे कौतुक वाटले तसेच कौतुक कुतुबमिनार जवळ असलेला व शेकडो वर्षे झाली तरी ऊन, वारा, पाऊस यांचा मारा होत असूनही न गंजलेला अशोक स्तंभ पाहून वाटले. दिल्लीचा लाल किल्ला पाहून मोगल सम्राटांच्या वैभवाची व रसिकतेची तारीफ करावी तेवढी थोडीच असे वाटल्या वाचून राहिले नाही नंतर आग्रा व फत्तेपूरसिक्री पाहिली. ताज-महाल प्रथमच पाहिला व मन आनंदाने भरून गेले सकाळी, दुपारी उन्हात व रात्री चांदण्यात पाहिला प्रत्येक वेळची शोभा निराळीच ! चित्रात पाहून एखाद्या वस्तूची खरी कल्पना येत नाही हे ताजमहाल पहाताच पटते शहाजहान बादशहा खराच रसिकशिरोमणी. मोठी नसूनही इतकी प्रमाणबद्ध इमारत क्वचितच आढळेल अकबर, हुमायून यांच्या कबरीही मोठ्या असून सुंदर आहेत पण ताजमहाल तो ताजमहाल फत्तेपूरसिक्री सुंदरच आहे पण आज ओसाड आहे सभोवतालचा प्रदेशही तसाच एके-काळी ही अकबराची राजधानी होती पण आज तिची अवस्था पाहून 'कालाय तस्मै नमः ।" असे म्हणावे लागते

नंतर आम्ही मोटारने हरिद्वारला गेलो मोटारने जाण्याचा उद्देश असा की नदीसारखे मोठे आणि सुंदर असे गंगेचे कालवे बघावयास मिळावे.

गंगेचे पाण्याने तुडुंब भरलेले कालवे पाहून समाधान वाटते. लोक " गंगामय्या " म्हणून गंगेची इतकी का भक्ती करतात याचा बोध झाला. गंगेच्या काठी राहणारांना वर्षाला तीन पिके घेता येतात. हरिद्वारला, गंगा आणि तिचे प्रशस्त घाट पाहून मन अतिशय प्रसन्न होते. त्यावेळी उत्तर भारतात जावे खायला ' अशी म्हण होती व ती सार्थ होती. दूध, दही, रबडी, डाळमोट, पेठा, पेढे, बर्फी याची रेलचेल होती. मथुरेला एकदा चहा मिळतो का पहायला पहाटेचा बाहेर पडलो. एक दुकान उघडे होते. दुकानदार म्हणाला, ' तुम्ही दख्खनचे लोक चहा पिता म्हणून असे बारके आहात " शेवटी चहा करून दिला आणि तो दुधाचा आणि कितीतरी स्वस्त ! हरिद्वारची मंदिरे आणि संध्याकाळी होणारी गंगेची आरती पाहून हृषिकेशला गेलो. तेथे गंगेवरील पूल लक्ष्मण झूला व स्वर्गाश्रम पाहिला. बरोबर तप करण्याला जागा चांगली आहे किंवा होती असे म्हटले पाहिजे. कारण आता पूर्वीचे काहीच राहिले नाही.

स्वर्गाश्रमाच्या बाहेर थोड्या अंतरावर एक पाटी पाहिली. त्यावर लिहिले होते केदारनाथ बद्रीनाथला जाण्याचा पाय रस्ता येथून सुरू होतो. त्याच वेळी निश्चय केला की येथून जमेल तेव्हा पायी जाऊन केदारनाथ व बद्रीनाथचे दर्शन घ्यावयाचे. हिमालयात हिंडावयाचे व तेथील वनश्री भरपूर पाहावयाची. पण नारायणाचे बोलावणे यावे लागते असे म्हणतात. त्या शिवाय कितीही निश्चय केला तरी होत नाही. आम्हाला बोलावणे यायला तीन चार वर्षे लागली. एकंदरीत हा प्रवास फार चांगला झाला. येताना कुरुक्षेत्राला उतरलो व तेथील पवित्र सरोवरात स्नान केले. कोणतेही ग्रहण असले की कुरुक्षेत्राला यात्रा लोटते. ग्रहणाच्या पर्व काळी लाखो लोक स्नान करतात आणि पावन होतात. आम्ही गेलो तेव्हा ग्रहण नव्हते. आरामात स्नान करायला मिळाले.

(३) १९४२ साली आम्हाला नारायणाचे बोलावणे आले व आमचा तिसरा प्रवास हिमालयात पायी झाला. पायी प्रवास असल्यामुळे गटागटाने प्रवास करण्याची पद्धत होती. पुण्यात १६ माणसांचा गट तयार झाला. जो खर्च येईल तो सगळ्यांनी वाटून घ्यावयाचे ठरले. या खेपेस आम्ही हरिद्वार

पर्यंत थेट आगगाडीने प्रवास केला तेथे गंगा स्नान करून त्याच लेच्च आगगाडीनेच हृषीकेशला गेलो तेथे सामान वजन करून नेपाळी शेरपा हमाल ठरविले पायी यात्रेला सुरवात केली एकूण ३५० मैल येता जाता चालावयाचे होते व २८ दिवसात प्रवास उरकावयाचा होता वाटेत चट्ट्या असत चट्टी म्हणजे मकान चट्टीत उतरावयाचे. रहाण्याचे भाडे पडत नसे पण रोज लागणारा शिधा चट्टीवाल्याच्या दुकानातून घ्यावालागे साधारण-पणे ७–८ मैल सकाळी व ७–८ मैल दुपारी चालत असू सकाळी ७ ला निघावयाचे व १० वाजता चट्टीत उतरावयाचे. मग स्वयपाक करून जेवण करावयाचे, दोन एक तास विश्रांती घेऊन चहा घेऊन ३॥–४ वाजता निघावयाचे संध्याकाळी ७–७॥ वाजता पुढच्या चट्टीत मुक्काम करावयाचा अशी पध्दत होती. हमाल आमच्या थोडे अगोदर निघत व आमच्या अगो-दर चट्टीत पोहचत स्वयंपाकाची भाडी चट्टीवाला पुरवीत असे. बहुतेक चट्ट्या पाण्याच्या जवळ असत डोंगरातून येणारे पाणी गोमुखावाटे बाहेर वाहत ठेवलेले असे व २४ तास वहात असे त्यामुळे अडचण पडत नसे. शिवाय पाणी स्वच्छ, चवदार व गार असे शेरपा आपला स्वैपाक करून जेवत, बायकाना चालवयाची आणि पुन्हा स्वयपाक अशी दुहेरी मेहनत पडे. पण बहुतेक गटात बायकाची संख्या पुरुषापेक्षा जास्त असल्यामुळे काम वाटले जाई. आमच्या गटात ६ पुरुष होते तर १० बायका'होत्या. कारण विधवा बायका सोबतीसाठी गटात सामील होत असत

रमत गमत हिमालयाची शोभा पाहत जाण्यात अपार आनद आहे. मनावर कसलेही ओझे नसल्यामुळे त्या आनंदात भरच पडते रस्त्याने उन्हाचा त्रास होत नाही कारण चेडाची झाडे दुतर्फा हारीने उभी असतात. एखादे विशेष रमणीय दृश्य दिसले तर थाबून पाहता येते. वेळेवर चट्टीवर पोहोचले म्हणजे झाले वेळ गेलाच तर वेग वाढवावयाचा कोठे पगदडी ( short cut ) असली तर तिने जावयाचे. जस जसे वर जावे तस तसे अरण्य दाट होते वृक्षही बदलतात गौरीकुंड, केदारनाथ, तुंगनाथ व बद्री-नारायण ही चार ठिकाणे विशष लक्षात राहिली गौरीकुंड येथे उन्हेरी आहेत. पायी प्रवास सुरू झाल्यापासून ऊन पाण्याची आघोळ मिळाली

नव्हती ती मिळाली त्यामुळे दोनदा आंघोळ केली केदारनाथ येथे मन्दाकिनीत स्नान केले तेव्हा पाणी बर्फाइतके गार असल्यामुळे डोक्यापर्यंत कळ गेली केदारचा शेवटचा ५-६ मैलाचा चढही खात्री करून गेला शंकराचार्यांनी हे मदीर कस बाधल असेल याची कल्पनाही करवत नाही. चोवीस तास अगातली थंडी जात नाही बर्फ जवळपास पडलेले दिसते दर वर्षी हिवाळ्यात चार महिने मदिर बर्फाखाली झाकलेले असते अक्षय्य ततीयेला मदिराचे दरवाजे दर्शनासाठी उघडतात केदारनाथ येथे वृक्ष वाढत नाहीत कारण ११००० फूट उचीवर असल्यामुळे थंडी फार असते. पक्षीही दिसत नाहीत. पडे लोक हृतरूणे पाघरूणे भरपूर पुरवितात पण तरी थडी वाजतेच

केदारनाथहून बद्रीनाथला जाताना वाटेत तुगनाथला गेलो तुगनाथ नावाप्रमाणे तुग म्हणजे १४००० फूट उचीवर आहे. विरळ हवेत चालणे व चढणे अतिशय अवघड. दर चार पाच पावलावर विश्राती घ्यावी लागते. दम अतिशय लागतो तुगनाथ येथे शकर पार्वतीचा विवाह झाला असे म्हणतात.

बद्रीनारायणाची उची १०००० फूट आहे. येथे उष्ण पाण्याची कुड आहेत त्यामुळे स्नानाची चांगली सोय आहे. शेजारी अलकनदा नदी वाहते तिचे पाणी बर्फासारखे गार निसर्गाचा हा चमत्कार पाहून मोठी मौज वाटते. बद्रीनारायण येथे सर्व प्रकारची मिठाई मिळते पहाटे दर्शनाला गेले की निर्वाण दर्शन होते कारण त्यावेळी सर्व कपडे काढून देवाचे स्नान होते. मूर्ती त्या मानाने लहानशी आहे आता बद्रीनारायण पासून १-२ किलोमीटरपर्यंत मोटारने जाता येते. पण चालत जाण्याचे सुख मोटार प्रवासात नाही पण आता चालत जाऊ म्हटले तरी शक्य नाही कारण वाटेत चट्टयाच नाहीत आमच्या सर्व प्रवासात या पायी प्रवासाच्या आठवणी आम्ही कधीही विसरू शकणार नाही या प्रवासात पोट सांभाळावे लागते कारण एकजण जरी आजारी झाला तरी सर्वांची खोटी होते किंवा डोली करून जावे लागते व खर्च वाढतो

येताना उतार असतो पण चालण्याचा वेग फारसा वाढवता येत

नाही जायला १५ दिवस लागले तर यायला १२, दिवस लागले. येतांचा रस्ता थोडा वेगळा होता चमोलीला मोटार दिसल्या बरोबर बहुतेकांनी मोटारची चौकशी सुरू केली पण गर्दी इतकी होती की मोटार मिळायला दोन किंवा तीनही दिवस चमोलीला थाबावे लागले असते थाबण्या पेक्षा आम्ही पायी प्रवास चालू ठेवला

शेवटी जेथून आगगाडी सुरू होते तेथे येऊन पोचलो व आमचा पायी प्रवास सपला शरीर थोडे थकले पण मन अतिशय उल्हसित झाले. नेपाळी शेरपा प्रामाणिक होते ते नोकर व आम्ही मालक ही भावना त्यांचे पाशी नव्हती चट्टीत ते आमच्या शेजारीच बसत एक मण ओझे पाठीवर घेऊन आमच्या इतकेच पधरा मैल चालत त्याचे श्रम पाहून अचबा वाटे. शिवाय जाताना सर्व चढाचा रस्ता. केदार सारखे काही चढ साध्या माण-साला देखील कठीण वाटत पण ओझे घेऊन हे शेरपा ते चढ चढून जात. अर्थात हा सवयीचा परिणाम. तोच पोटाचा धदा व जन्मभर करायचा.

प्रवासात मनुष्य स्वभावाचे अनेक नमुने बघावयास मिळाले काही शीघ्रकोपी तर काही शातिब्रह्माचे पुतळे काही खाण्याचे शोकी तर काहीचे बारवार उपास काहीना रोजच्या दिनक्रमात थोडाही बदल चालत नसे तर काहीना ठराविक दिनक्रमच नसे काही रोज दमल्याचं सोग करून काम टाळणारे तर काहीना रात्रीच्या झोपे शिवाय विश्रांती लागत नसे काही इतके देवभोळे की प्रत्येक लहान लहान मूर्तीला नमस्कार केल्याशिवाय देवळाच्या बाहेर पडावयाला तयार नाहीत तर काहीचा देवावर विश्वासच नाही काही लबाड तर काही सज्जन.

स्मरणात कायम राहील असा हा प्रवास करून आम्ही निघाल्या पासून सव्वा महिन्यांनी घरी आलो

४) चौथा प्रवास १९४७ साली दिवाळीत माळवा भागात केला, ग्वाल्हेर, उज्जैन आणि ओंकार ही प्रमुख ठिकाणे पाहिली शिवाय भेलसा गावाजवळ असलेला साची येथील बौद्ध स्तूप पाहिला. माळवा म्हणजे मध्यप्रदेश.

ग्वाल्हेरचा किल्ला अद्याप चांगल्या स्थितीत आहे. हा किल्ला एका

खडकावर बांधलेला आहे ग्वाल्हेरला इतर प्रेक्षणीय स्थळे म्हणजे झाशीची राणी जेथे लढता लढता पडली ते बागेतले स्मारक, शिंदे घराण्यातील स्त्री-पुरुषांच्या छत्र्या, प्रसिद्ध गायक तानसेन याची समाधी ह्या होत. ग्वाल्हेरला चिनीमातीच्या वस्तूंचा कारखाना आहे

इंदूर हे मोठे शहर. तेथील काच मंदिर प्रसिद्ध आहे बाजार मोठा आहे शेट हुकूमचंद यांची धर्मशाळा चांगली आहे साध्वी अहिल्या देवीचे महेश्वर इंदूरजवळच नर्मदा किनारी आहे उज्जैन किंवा अवन्तिका ही भारतातील प्रसिद्ध सप्तपुऱ्यांपैकी एक आहे हे शहर फार प्राचीन असून त्याला मोठा इतिहास आहे विक्रमादित्य राजा येथे राज्य करीत होता क्षिप्रा नदीच्या काठी असलेले महाकाळेश्वरांचे मंदिर बारा ज्योतिर्लिंगां* पैकी एक असून येथे सर्व भारतातून यात्रेकरू नेहमी येत असतात महाशिवरात्र, मकर संक्रांत, सोमवती अमावस्या, सूर्यग्रहण, दर १२ वर्षांनी येणारा कुंभमेळा किंवा सिंहस्थ या वेळी मोठी यात्रा भरते जयपूरचा राजा जयसिंग याने बांधविलेली वेधशाळा उज्जैनीमध्ये आहे कृष्णाचे गुरु सांदीपनी यांचा आश्रम येथेच आहे ओंकार हे ज्योतिर्लिंग उज्जैनीपासून जवळच नर्मदेच्या काठी एका खडकावर आहे हे बेट असल्यामुळे नावेतून जावे लागते उज्जैनीला जाणारे यात्रेकरू बहुतेक ओंकारला जातातच दोन ज्योतिर्लिंगे इतक्या जवळ अशी ही एवढीच सात मोक्ष दायक पुऱ्या आहेत त्या अशा—

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका
पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायकाः ।।

सांची येथील प्राचीन बौद्ध स्तूप पाहण्यासाठी भेलसा येथील सरकारी अधिकाऱ्याकडे आम्ही उतरलो होतो भेलसा गावाच्या दक्षिणेला पाच मैलावर एका लहानशा टेकडीवर हा स्तुप आहे. हा स्तूप घुमटाकार असून बौद्ध धर्माचे सुंदर स्मारक आहे हा स्तूप इ स पूर्वी २५० वर्षे सम्राट अशोक राज्य करीत असताना बांधला. या स्तूपाच्या चार दिशांना चार तोरणे, असून ती नंतर बांधलेली आहेत दक्षिणेकडील तोरणावरील लेखावरून ते इ. स. १५ च्या सुमारास बांधलेले आहे यानंतर उत्तरेकडील तोरण बांधलेले असावे हे सर्वांत मोठे असून कलाकुसर चांगली आहे,

जबलपूर हे मध्यप्रदेशातील एक मोठे शहर आहे जबलपूरपासून अकरा मैलावर धुवांधार हा नर्मदा नदीवरील धबधबा आहे. येथे नर्मदेचे पाणी तीस फूट सरळ उडी घेते धबधब्याला उंची अगदीच थोडी पण गर्जना मोठी आणि सभोवतालचा परिसर रमणीय नंतर नर्मदा दोन्ही बाजूस संगमरवराच्या खडकाच्या भिंतीमधून दोन मैल वहात जाते व तिची खोलीही पुष्कळ आहे कारण १०० यार्ड रुंदीचे पात्रातील पाणी २० यार्ड रुंदीच्या प्रवाहात सामावावे लागते नावेतून नर्मदेत फिरण्याची मौज लुटण्याची सोय आहे

५) आमचा पाचवा प्रवास गुलबर्गा, हैद्राबाद, श्रीशैल्य, व्यंकटगिरी बालाजी, गाणगापूर असा झाला व्यंकटगिरी हे अतिशय श्रीमंत देवस्थान आहे. केश त्याग हे इथले वैशिष्टय. सुहासिनीदेखील मुंडन करून घेतात. देवास्थानाबद्दल चांगले मत झाले नाही.

६) आम्ही सहावा प्रवास १९५२ मध्ये स्वत. वाहून येईल इतकेच सामान घेऊन दोघानींच केला रामेश्वर कन्याकुमारीपर्यंत जाऊन आलो त्याबद्दल ' दक्षिण भारताचे दर्शन ' नावाचे पुस्तक लिहिले पुष्कळांना या पुस्तकाने प्रवासाची प्रेरणा दिली व आवड उत्पन्न केली आचार्य अत्रे यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे हे आमचे भाग्य

७) आमची ७ वी सहल अमृतसर, भाक्रानानगल व काश्मिर अशी १९५७ साली झाली या सहलीचे वर्णन या पुस्तकात अन्यत्र आढकेल

८) १९५९ साली, आमची ८ वी सहल वाराणशी, पाटणा, पशुपती चित्रकुट, कानपूर, लखनौ व भोपाळ अशी झाली हिचे वर्णन या पुस्तकात

——२——

९) खजूराहो, दार्जिलिंग, गोहत्ती व शीलांग अशी ९ वी सहल १९६४ साली केली

१०) १९६५ साली गगोत्री, अमुनोत्री, चंदीगड व सिमला अशी दहावी सहल आम्ही केली

११) १९६६ साली केवळ मोटारने (मॅटॅडोरने) शेगाव, भंडारा. परभणी, अजठा, वेरूळ, घृष्णेश्वर व औरंगाबाद अशी महाराष्ट्राची सहल

केली ही आमची ११ वी सहल

१२) १९६७ साली माऊंट अबू, अंबाजी, गिरनार, द्वारका अशी पश्चिम भारताची एक महिन्याची सहल दत्त दिगंबर कंपनीबरोबर केली. ही बारावी सहल 'पश्चिम भारताचे दर्शन' या नावाचे पुस्तक मी लिहिले व ते बरेच लोकप्रिय झाले

१३) १९७६ च्या पंढरपूरच्या आषाढी वारीला आम्ही पायी गेलो व पांडुरंगाचे दर्शन घेतले

१४) १९७९ साली जोग धबधबा शृंगेरी आणि उटकमंड (उटी) पाहण्यासाठी आम्ही श्री ट्रॅव्हल्सबरोबर मोटारने दक्षिण भारताच्या काही भागांची पुन्हा यात्रा केली व जुन्या स्मृतींना उजळा दिला. बेलूर, हळेबीड, गोमटेश्वर, म्हैसूर व बंगलोर पुन्हा पाहिले या प्रवासाचे वर्णन या पुस्तकात अन्यत्र आढळेल

१५) १९८० साली केवळ स्वामी विवेकानंदाचे शिलास्मारक पाहण्यासाठी आम्ही त्रिवेंद्रममार्गे कन्याकुमारीला जाऊन तेथे विवेकानंद केन्द्रात दहा दिवस राहून आलो पुन्हा एकदा शुचींद्र आणि त्रिवेंद्रम पहावयास मिळाले ह्या सहलीचे वर्णन या पुस्तकात अन्यत्र आढळेल.

१६) १ नोव्हेंबर १९७६ ते ३० नोव्हेंबर १९७६ या महिन्यांत जी सहल आम्ही केली ती या पुस्तकात वर्णिली आहे तीच 'केल्याने देशाटन' या नावाने प्रसिद्ध करीत आहे

श्री विजय वाघ यांनी ही सहल आपल्या धनश्री यात्रा कंपनी मार्फत आयोजित केली होती एकूण १७०० रु माणशी खर्च आला पश्चिम बंगाल, आसाम, सिक्किम, भूतान, नागभूमी व इम्फाळ किंवा मणिपूर ही मुख्य आकर्षणे होती.

असे १६ प्रवास करून आम्ही बारा ज्योतिर्लिंगे, चार धामे, सात पुऱ्या, अष्टविनायक, अनेक ऐतिहासिक स्थळे, थंड हवेची ठिकाणे, मोठमोठी धरणे, लहानमोठे कारखाने पाहिले सृष्टिसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला. अनेक नद्यांची, सागरांची व तीर्थांची स्नाने केली. तरीदेखील पुष्कळ पहाव-याचे राहिले आणि राहणारच कारण आपला भारत हा खंडप्राय विशाल देश आहे.

## आजचा भारत

१) भारतात कमालीचे दारिद्र आहे कोट्यावधी लोक अपुरे आणि निकृष्ट अन्न खाऊन मरण येत नाही म्हणून जगत आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या प्राथमिक गरजाही भागत नाही.

२) शिक्षित आणि अशिक्षितात अंधश्रद्धा, घातक रूढी आणि भोळ्या समजुती पुष्कळ आहेत. आणि सर्व प्रचारमाध्यमे त्याना खतपाणी घालत आहेत.

३) आपल्यातील बहुसंख्य कमालीचे दांभिक आहेत त्यांचा देवावर विश्वास नाही पण परमभक्ताचा आव आणीत आहेत.

४) बहुसंख्य लोक कमालीचे स्वार्थी व आत्मकेंद्रित आहेत. गरिबांची खरी कणव फार थोड्यांना आहे पैसा व अधिकार हे आजचे देव झाले आहेत

५) आपण लोकसंख्या भरमसाठ वाढवीत आहे. ३५ कोटीचे आपण ३५ वर्षांत ७० कोटी झाले. ब्रह्मचर्य पाळण्याऐवजी आपण निरोध व नस-बंदीवर भर देत आहे.

६) भ्रष्टाचार सर्वत्र माजला आहे अगदी वरपासून खालपर्यंत प्रेम, बंधुभाव, एकात्मता, समता, सहानुभूता परधर्म सहिष्णुता हे नुसते शब्द राहिले आहेत

---

## प्रकरण तिसरे

# सुंदरी बंगभूमी

ईशान्य भारताच्या दर्शनाला जावयाचे म्हणजे प्रथम कलकत्त्याला जावे लागते. पुणे–मुंबई–नागपूर–राऊरकेला मार्गाने आपण हावरा येथे पोहोचतो हुगळी ( गंगेचेच हे नाव आहे ) नदीच्या एका तीरावर हावरा

आणि दुसऱ्या तीरावर भारतातले सर्वात मोठे शहर कलकत्ता आहे हावरा स्टेशनच्या बाहेर पडताच प्रसिद्ध आणि प्रचंड हावरा पूल आपले लक्ष वेधून घेतो आधारासाठी मध्ये एकही खांब अथवा कमान नसलेला हा प्रचंड रहदारीचा-पूल पाहून आपण चकित होतो नदीच्या विशाल पात्रात आग-बोटी, मोठे-मचवे आणि होड्यांचा संचार चालू असतो दोन्ही टोकांना असलेल्या राक्षसी खांबावर टांगलेला हा पूल म्हणजे स्थापत्य शास्त्राचे एक आश्चर्यच आहे या पुलाची लांबी ५०० मीटर आहे पुलावरील सडकेची रुंदी २४ मीटर आहे. दोन्ही किनाऱ्यावर गगनचुंबी इमारती आणि कार-खान्याची धुराडी दिसतात

कलकत्ता शहराची लोकसंख्या पाऊण कोटीपर्यंत असावी कलकत्ता शहर सावकाशपणे पाहावयाचे झाल्यास आठवडाभराची सवड पाहिजे. तितकी बहुधा नसतेच. आम्ही दोन दिवसात कलकत्त्यातील निवडक स्थळे पाहिली.

पश्चिम बंगालचे राज्य दक्षिणेला गंगेच्या मुखापासून उत्तरेला हिमा-लयात दार्जिलिंगपर्यंत पसरलेले आहे मधला भाग खूप चिचोळा आहे त्याचे क्षेत्रफळ ८७,६७६ वर्ग कि मी. आहे पण लोकसंख्येची घनता दर वर्ग कि. मी मागे ५०० इतकी मोठी आहे कलकत्ता शहरात तर वर्ग कि. मी. मागे अंदाजे एक लक्ष लोक राहतात

बंगालचा दक्षिण भाग जवळजवळ सपाट आहे तर उत्तर भाग डोंग-राळ आहे परंतु सर्व बंगाल राज्य सुपीक आहे पाऊसही भरपूर पडतो• बंगालमध्ये अनेक लहान-मोठ्या नद्या आहेत त्यांना भरपूर पाणीही असते. सुजला, सुफला, सस्यशामला, शुभ्र, ज्योत्स्ना, पुलकित, यामिनी; फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनी ही ‘ वंदे मातरम् ’ या राष्ट्रगीतात बंकीम-चंद्र चतर्जींनी भारतमातेला लावलेली विशेषणे येथे लागू पडतात.

तांदूळ आणि ताग ही बंगालची मुख्य पिके, तसेच राणीगंज आणि झारिया येथील खाणीत सापडणारा दगडी कोळसा ही बंगालची एकमेव

खनिज संपत्ती गंगेच्या मुखाजवळ असलेले सुंदरवनचे अफाट जंगल जळाऊ लाकूड पुरविते बांबू आणि केळी ह्रीही बंगालची महत्त्वाची पिके होत. नद्यातून आणि बंगालच्या उपसागरात मासे विपुल मिळतात आणि बंगालमध्ये मासे हे खाद्य फार लोकप्रिय आहे बंगालमध्ये सर्व प्रकारच्या पाले आणि फळभाज्या याचे उत्पन्नही भरपूर होते. फळेही विपुल आहेत दार्जिलिंग जिल्ह्यात उत्कृष्ट चहा, इमारती व इतर लाकूड, फळ फळावळ याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते जलपाइगुरी जिल्ह्यातही अगदी सपाटीवर चहाचे मोठे मोठे मळे दिसले.

बंगाल राज्य आधुनिक कारखान्यांच्या बाबतीतही आघाडीवरचे राज्य आहे तागाचे कापड व गोणपाट विणण्याच्या गिरण्या तर कलकत्त्याच्या आसमतात पारतंत्र्याच्या काळापासून प्रसिद्ध आहेत तशीच टिटाघरची कागद गिरणी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चित्तरंजन येथील रेल्वे इंजिनाचा कारखाना, दुर्गापूर येथील पोलादाचा कारखाना जगप्रसिद्ध झाले आहेत राणीगंज, आसनसोल आणि झारिया या दगडी कोळशाने समृद्ध असलेल्या प्रदेशात अनेक पूरक कारखाने आहेत दगडी कोळसा इंधन म्हणून जाळला तर अतोनात नुकसान होते कारण त्यात असलेले अतिशय मूल्यवान घटक जळून नष्ट होतात पण दगडी कोळशाचे भंजक–ऊर्ध्वपातन केल्यास अनेक औषधी द्रव्ये, रंगद्रव्ये, डांबर, वगैरे अनेक मूल्यवान रासायनिक पदार्थ मिळतात आणि जाळण्यासाठी कोक मागे शिल्लक राहतो कोळशाच्या विपुलतेमुळे औष्णिक विद्युत उत्पादन केंद्रे आहेत

मुर्शिदाबाद जिल्हा रेशमासाठी पूर्वीपासून प्रसिद्ध आहे कृष्णनगर मातीच्या खेळण्यांसाठी प्रसिद्ध आहे माल्डा हे गाव आंबे आणि आंब्याचे टिकाऊ पदार्थ यासाठी प्रसिद्ध आहे

बंगालमधून रेल्वेने प्रवास करताना दोन्ही बाजूंना लहान-लहान तलाव, भाताची मोठमोठी शेते, केळीच्या बागा, बांबूची बने दृष्टीला पडतात तलावातून शिंगाड्याचे पाणवेल आणि हायसिंथ ह्या वनस्पतीचे वेल लावलेले दिसतात या वेलाची पाने जाड असतात या वेलाचा टोपल्या विणण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होतो बांबूचा उपयोग तर फारच

मोठ्या प्रमाणात होतो विशेष म्हणजे खेडेगावातील घरे बांबूची असतात आणि भिंती देखील बांबूच्या तट्ट्यांच्या करतात, अनेक नित्योपयोगी आणि कलाकुसरीच्या वस्तू बांबूच्या बनवतात.

बंगाल ही नवरत्नाची खाण आहे बंगाली लोक बुद्धिमान यात संशय नाही प्रभू चैतन्यदेव यांच्यासारखे संत, राजाराम मोहन रॉय यांच्यासारखे द्रष्टे समाज सुधारक, चित्तरंजन दासासारखे कायदे पंडित आणि त्यागी नेते, सुभाष बोसासारखे नेताजी, रवींद्रनाथ टागोरांसारखे कवी व साहित्यिक, बंकीमचंद्र चतर्जी आणि शरदचंद्र चतर्जीसारखे कथा–कादंबरीकर, अरविंद घोषांसारखे योगी, रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंदासारखे साक्षात्कारी संत, जगदीशचंद्र बसू आणि प्रफुल्लचंद्र रे यांच्यासारखे शास्त्रज्ञ, आशुतोष मुकर्जीसारखे विद्वान शिक्षणतज्ञ, श्यामाप्रसाद मुकर्जीसारखे विद्वान पुढारी, डॉ बिधनचंद्र रॉय यांच्यासारखे धन्वंतरी, हसत फाशी जाणारे अनेक क्रांतिकारक किती म्हणून नांवे सांगावी ! ‘ यत्र विश्व भवत्येकनीडम् ।’ हे बिरूद मिरवणारी विश्वभारती विद्यालयासारखी शिक्षण संस्था जगात दुसरी नसेल रवींद्रनाथांच्या महान प्रतिभेतून निर्माण झालेली ही संस्था जगाला ऐक्याचा आणि बंधुभावाचा संदेश आजही देत खडी आहे.

बंगालला भयानक संकटांनाही तोंड द्यावे लागले आहे इ. स १७४० च्या दुष्काळात एकतृतियांश माणसे मृत्यूमुखी पडली अनेक परचक्रे आली, पारतंत्र्यात अनेक शतके काढावी लागली, मोठमोठ्या सार्थींनी अनेक बळी घेतले आणि अखेर फाळणीही झाली परंतु या सर्व आपत्तींना तोंड देऊन बंगाल दिमाखाने उभा आहे

## कलकत्ता शहरातील काही प्रेक्षणीय स्थळे

### दक्षिणेश्वर येथील कालीमाता मंदिर

रामकृष्ण परमहंसांनी ज्या कालीमातेची उपासना करून तिच्या प्रत्यक्ष दर्शनाचे सुख अनुभविले ते हे मंदिर ! एका प्रशस्त आवारात गंगाकिनारी हे भव्य मंदीर उभे आहे. आवारात १२ ज्योतिर्लिंगाची बारा छोटी मंदिरे आहेत कालीमातेच्या दर्शनासाठी नेहमीच भाविकांची गर्दी

असते. रामकृष्ण परमहंस हे अशिक्षित, साधे भोळे पुजारी परंतु त्यांनी आपल्या असामान्य व एकनिष्ठ भक्तीने कालीमातेला प्रसन्न करून घेतले. त्यांनी आपली आध्यात्मिक उंची इतकी वाढविली की विवेकानंदांसारख्या आंग्लविद्या विभूषित-तरुणाने त्यांचे शिष्यत्व स्वीकारले आणि आत्मोन्नती घडवून आणली विवेकानंदांनी केवळ आत्मोन्नती साधली असे नव्हे तर जगभर हिंदू तत्वज्ञानाची महती गाइली आणि परदेशस्थ शिष्य आणि भक्त जोडले. भगिनी निवेदिता ही त्यातली एक.

## बेलूर मठ :

आपले आध्यात्मिक गुरु श्री रामकृष्ण परमहंस यांचे स्मारक म्हणून हे अतिशय भव्य आणि मोठे मंदिर स्वामी विवेकानंदांनी बांधून घेतले. हे मंदिरही गंगाकिनारी आहे पण दुसऱ्या तीरावर. येथील परिसर भव्य, सुंदर आणि अतिशय स्वच्छ व शांत आहे मंदिरात रामकृष्ण परमहंसांची मोठी सुंदर मूर्ती आहे स्वामी विवेकानंदांची समाधी याच आवारात आहे. विवेकानंदांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनचे मुख्य कार्यालय येथेच आहे.

स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण परमहंसांच्या स्मरणार्थ रामकृष्ण मिशन ही संस्था स्थापन केली या संस्थेच्या अनेक शाखा भारतात आणि परदेशांत जनतेच्या उद्बोधनाचे आणि सेवेचे बहुमोल कार्य करीत आहे. संन्यास घेतला तरी कर्म हे केलेच पाहिजे ही आद्य शंकराचार्यांनी स्थापन केलेली परंपरा स्वामी विवेकानंदांनी मोठ्या जोमाने पुढे चालविली. आद्य शंकराचार्यांनी भारतभर भ्रमण करून अद्वैत वैदिक धर्माची पताका फड-कावली आणि मठांची स्थापना केली विवेकानंदांनी युरोप, अमेरिकेत संचार करून हेच महान कार्य केले. संन्यास हा आश्रम सर्वसंगपरित्यागा-साठी नसून सर्व वेळ एकाच महत्कार्यासाठी खर्च करण्यासाठी असतो हे तत्व रामकृष्ण मिशनचे सेवक आचरणात आणतात.

विवेकानंदांचे विपुल वाङ्मय माणसाचे मन उन्नत करणारे आणि त्याला योग्य मार्ग दाखवून चित्तशांती देणारे आहे यात संशय नाही. राम-कृष्ण परमहंसांची वाग्गंगाही तेच कार्य करणारी आहे विवेकानंदांना अद्या.

पही भारतात आणि परदेशात किती मान आहे हे कन्याकुमारीजवळील समुद्रातील खडकावर लक्षावधी रुपये खर्च करून त्यांचे दिव्य, भव्य स्मारक उभारले आहे त्यावरून सहज कळून येते ज्या खडकाकडे पोहत जाऊन आणि तेथे तीन दिवस उघड्यावर बसून विवेकानंदांनी साधना केली त्याच खडकावर हे स्मारक उभारले आहे. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ही गुरुशिष्याची आधुनिक जोडी रामायण महाभारतकालीन गुरुशिष्याच्या जोड्यांसारखी अमर झाली आहे

## कालीघाट

कलकत्ता येथील कालीघाट हे एक देवीचे महापीठ आहे. येथील देवीचे नाव आहे ' कालिका ' मूर्ती दगडाची आहे. अर्धी मूर्ती दिसत नाही. कमरेच्या वरचे अंग मूल्यवान दागिन्यांनी सजलेले असते. हातात सोन्याची कंकणे, सोन्याचा मुकूट, सोन्याची जीभ, सोन्याच्या भिवया, चांदीचे फार मोठे छत्र आहे मूर्ती दिसावयाला उग्र दिसते पूर्वेला कालीकुंड, पश्चिमेला गंगेचा घाट, तोरणावर नौबत खाना आणि ईशान्येला नकुलेश्वराचे मंदिर, मंदिरासमोर नाट-मंदीर आहे येथे धार्मिक प्रवचने होतात.

कालिका मंदिरात सतत यात्रा आणि गर्दी असते. दररोज तेथे महोत्सव असतो अनेक भोग चढविले जातात. तेथे बकरा बळी देण्याची चाल आहे हल्ली बळी द्यावयाच्या बकऱ्यांची संख्या कमी होत आहे असे म्हणतात बंगालमध्ये दुर्गापूजेचे महत्त्व फार असते दुर्गा म्हणजे शक्तीची देवता-आदिशक्ती दुर्गापूजा दहा दिवस धूमधडाक्याने चालते. शेवटच्या दिवशी असुरनाशिनी दुर्गेच्या मूर्तीचे विसर्जन होते.

कालीघाट हे तीर्थ बाराव्या शतकापूर्वीचे आहे त्यापूर्वी येथे जंगल होते. हिंस्र श्वापदे आणि चोर, लुटारू यांची वस्ती होती. बल्लाळसेन राजाने येथील यात्रेला प्रारंभ केला येथे मंत्रतंत्र हस्तगत करू इच्छिणारे आपली तांत्रिक योग साधना करीत असत कलकत्याला आलेला प्रत्येक हिंदू कालिका मातेचे दर्शन घेतल्याशिवाय राहत नाही.

महिलांची गर्दी विचारावयास नको ! बहुतेक महिला बरोबर ओट्या घेऊन येतात आणि ओटी भरून घेतात. हे मोठे जागृत स्थान मानले जाते.

कारण भगवान विष्णूच्या सुदर्शन चक्रामुळे पार्वतीच्या पायाचे एक बोट कापले गेले व ते या ठिकाणी पडले अशी आख्यायिका आहे

## व्हिक्टोरिया स्मारक

कलकत्त्यामध्ये ‘ चौरंगी ’ हा एक प्रसिद्ध परिसर आहे रुंद सुंदर रस्ते, मोठमोठी हॉटेल, रेस्टॉरंट, सिनेमा, तऱ्हेतऱ्हेने सजविलेली आलीशान दुकाने, बाजार, कंपन्यांच्या कचेऱ्या, मोटारींची धावपळ असे दृश्य येथे दिसते हिरव्या मखमलीसारखी दिसणारी हिरवळ असलेले मोठे मैदान; मोठमोठ्या वृक्षांची शीतल छाया, मोकळी, स्वच्छ हवा आणि शांतता पाहून गडबड, गोंगाटाला विटलेला माणूस येथे येताच सुखावतो आणि काही वेळ आराम करतो ऑक्टरलोनी मॉन्युमेंट नावाचा ५५ मीटर उंचीचा एक मोठा मनोरा लक्ष वेधून घेतो. याचा घुमट तुर्की शिल्पकलेचा नमुना आहे.

या चौरंगी परिसरात एखादे चित्र काढल्यासारखी दिसणारी व्हिक्टोरिआ मेमोरिअलची भव्य इमारत आहे लॉर्ड कर्झन यांना ताजमहालच्या तोडीची किंबहुना त्यापेक्षाही भव्य इमारत बांधण्याची इच्छा झाली. ब्रिटिश स्थापत्यकलेचा एक अजोड नमुना म्हणून ही इमारत उभी आहे

या इमारतीचा नकाशा सर विलियम इमर्सन या स्थापत्य शास्त्रज्ञाने तयार केला या स्मारकाची पायाभरणी इंग्लंडच्या युवराजाच्या हस्ते इ. स. १९०५ मध्ये झाली इमारत इ स १९३० मध्ये पूर्ण झाली आणि त्या स्वस्ताईच्या काळात एक कोटी रुपये खर्च आला. सर्व इमारत पांढऱ्या संगमरवरी पाषाणाची बांधलेली आहे. लांबी अदाजे ११० मीटर, रुंदी ७० मीटर आणि उंची ६५ मीटर आहे. यावरून या इमारतीच्या भव्यतेची सहज कल्पना येईल ब्रिटीश वास्तुकला, इटलीची मूर्तिकला आणि भारतीय कारागिरी याचा त्रिवेणी संगम म्हणजे व्हिक्टोरिआ मेमोरिअल इमारत आणि ती अतिशय भव्य आणि देखणी आहे यात संशयच नाही. परतु ताजमहालची प्रमाणबद्धता आणि सौंदर्य तिच्यात नाही याची .जाणीव तत्काळ होते ताजमहालला जगात तोड नाही ‘ ताजमहाल कशासारखा ’ असे विचारले तर ‘ ताजमहालसारखा ’ हेच उत्तर द्यावे लागते

व्हिक्टोरिया मेमोरिअल हे आता पदार्थ संग्रहालयही झाले आहे.

भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लावणाऱ्या प्लासीच्या लढाईतला तोफेचा गोळा तेथे ठेवलेला आहे टिपू सुलतानाची डायरी, कवी फिरदोसीचा ' शाहनामा,' अबुल फजलच्या आईन–ए–अकबरी, महाकवी तुळसीदासाचे रामायण इत्यादी ग्रंथांच्या प्रती तेथे पाहावयास मिळतात.

बंगाली साहित्यिकांची हस्तलिखिते आहेत हैदरअल्लीची तलवार, रणजितसिंहाची तलवार, वॉरन हेस्टिंग्जची पिस्तुले, इंग्रजी बंगाली प्राचीन कोश विलिअम जेम्सने केलेला ' मनुसंहितेचा ' अनुवाद, पहिले बंगाली वर्तमानपत्र राजा रविवर्माची तैलचित्रे, सुंदर सुंदर पुतळे, चित्रे अशी इतिहासविषयक सामग्री येथील पदार्थ संग्रहालयात पाहावयास मिळते पस्तीसशेच्या आसपास येथील प्रेक्षणीय वस्तूंची संख्या आहे हे सर्व पाहावयास एक दिवसही पुरणार नाही.

## नेताजी की कोठी :

ज्या राहत्या घरातून सुभाषचंद्र बोस ब्रिटिशांच्या नजर कैदेतून निसटून भारतातून अफगाणिस्तानात गेले ते घर आता एक राष्ट्रीय स्मारक झाले ज्या मोटारीतून ते गेले ती लहान आकाराची Baby Car प्रवेश द्वारातून आत जाताच दिसते. नेताजी ज्या खोलीत राहात ती खोली किंवा कोठी वरच्या मजल्यावर आहे तेथे त्यांच्या वापरातल्या काही वस्तू, छायाचित्रे इत्यादी जतन करून ठेवलेली आहेत. नेताजींनी भारतातून वेषांतर करून पलायन केले हा प्रसंग श्री शिवाजीमहाराजांच्या आग्र्याहून सुटकेच्या प्रसंगाइतकाच अद्‌भुत, रोमांचकारी, नाट्यमय आणि सर्व भारतीयांना अभिमानास्पद आहे अशी स्मारके ही जीवंत स्मारके आहेत आणि ती प्रेक्षकांना नतमस्तक करून स्फूर्तीही देतात.

कलकत्त्याचे प्राणिसंग्रहालय ( Zoo ), पदार्थ संग्रहालय (museum); वनस्पती उद्यान (botanical gardan), शासकिय कचेरीची शाखा, रायटर्स बिल्डिंग ही सर्व ठिकाणे अत्यंत प्रेक्षणीय आहेत. बिरला तारागण (planetariam) आणि पारसनाथ जैन मंदिर ही दोन ठिकाणे अवश्य पहावी अशी आहेत पारसनाथ जैन मंदिरात सर्वत्र छोटे–मोठे आरसे बसविलेले असल्यामुळे एक आगळे सौंदर्य प्रत्ययास येते. पारसनाथाची

मूर्तीही फार सुंदर आहे. आवारात अनेक पुतळे आहेत त्यातले काही मंदि- रात शोभत नाहीत असे आमच्यासारख्या सामान्यांना वाटते. कलेकरता कला या तत्वावर विश्वास असणारांना कदाचित ते खटकणार नाहीत. स्त्री पुरुषाच्या अर्ध नग्न पुतळ्यातही कला नसते असे नाही पण अशा पुत- ळ्याची जागा मंदिर नसून एखादे कलाविद्यालय अथवा संस्था असली पाहिजे.

कलकत्याचे म्युझिअम फारच मोठे आहे सबंध दिवस घालवला तरी ते पाहून भागत नाही अभ्यासपूर्वक पहावयाचे तर कित्येक दिवस लागतील. संशोधकांची मोठीच सोय या संग्रहाल्याने साधली आहे

ईडन गार्डनमध्ये क्रिकेटचे कसोटी सामने होतात व ६५,००० प्रेक्ष- कांची बसण्याची सोय आहे सदर आवारात ब्रह्मदेशात पॅगोडा नावाची विशिष्ट रचनेची जी मंदिरे आहेत त्यांची एक प्रतिकृती आहे

इतर अनेक प्रेक्षणीय स्थळे कलकत्यात आहेत. कलकत्यात आजही विजेवर चालणाऱ्या ट्रामगाड्या चालू आहेत. माणसांनी ओढावयाच्या रिक्षा हे वाहन स्वस्त पडते पण अमानुष वाटते

----

प्रकरण चौथे

# फराक्का धरण व न्यू जलपायगुडी

## फराक्का धरण व न्यू जलपायगुडी

कलकत्याची धावती भेट संपवून दार्जिलिंगकडे वळलो. आम्ही सायकाळी ६–५५ च्या कामरूप एक्सप्रेसने हावरा स्थानक सोडले. सात तास प्रवास केल्यावर रात्री २ वाजता झगझगीत प्रकाश दिसला. इतक्या लौकर उजाडले कसे असे म्हणून बाहेर डोकावतो तो फराक्का डॅम ' स्थानकावर गाडी उभी !

रेल्वेवरील पूल धरणाला समांतर असून खूपच मोठा आहे पुलावर व धरणावर इतके तेजस्वी विद्युतदीप (फ्लड लाइटस) बसविले आहेत की मध्यरात्री दिवसाचा भास होतो उजेडामुळे धरण व त्यामुळे निर्माण झालेला सागरसदृश्य जलाशय पाहून मन आश्चर्याने भरून जाते हा देखावा इतका अद्‌भुत आहे की स्वर्गातले देव देखील तो पहायला जागे रहात असतील असे वाटते हे धरण गंगेवर बांधले असून त्याचा एक उद्देश असा आहे की, कलकत्ता बंदरात गाळ साचू नये, याशिवाय धरणाचे इतर उद्देश आहेतच विजेची निर्मिती, शेतीला पाणी, उद्यानाची निर्मिती, मत्स्योत्पादन आणि गिरण्या व कारखाने यांना पाणीपुरवठा इत्यादी परत येताना आम्ही अशी गाडी निवडली की. फराक्का डॅम हे स्थानक दिवसा येईल. त्यामुळे रात्री विद्युत प्रकाशात व दिवसा सूर्यप्रकाशात धरण आसमंताचा परिसर पहाव- यास मिळाला व मोठे समाधान वाटले फराक्का धरणाने निर्माण केलेल्या जलाशयाच्या पाणीवाटपाबद्दल भारत व बांगला देश यांच्यामध्ये काही वाद निर्माण झाला आहे व अधूनमधून दोन्ही देशांच्या प्रतिनिधींच्या आलटून पालटून नवी दिल्ली व ढाक्का या राजधानीत सभा होतात असे आपण वर्तमानपत्रात वाचतोच. या भागात पहाटे ४॥–५ वाजले फटफटीत उजाडते, कारण आपण देशाच्या पूर्व भागात आलेले असतो साधारणपणे पहाटे ५ ते ८ पर्यंत पश्चिम बंगालची सुजला, सुफला व सस्यशामला भूमी पहावयास मिळाली ह्या सपाट भूमीवरून रेल्वेने प्रवास मोठा नयनसुख देणारा व मनोहर आहे. भाताची हिरवीगार शेते क्षितीजापर्यंत पसरलेली पाहून जमिनीवर हिरवा गालीचा पसरला आहे असे वाटते मधूनमधून केळीच्या बागा आणि बांबूंची बेटे आढळतात व त्यामुळे पालट होऊन दृष्टी सुखावते लहान–मोठे तलाव रेल्वेच्या दोन्ही अंगाला दिसतात त्यामध्ये जाड पानाच्या हायसिंथच्या वेली असतात काही ठिकाणी शिंगाड्याचे वेल तलावाभर पसरलेले असतात मधूनमधून तागाची झाडे दिसतात व त्या ठिकाणी तागाची झाडे कुजण्यासाठी त्यांच्या जुड्या करून पाण्यात टाकलेल्या असतात. आपल्याकडच्या प्रमाणे बैलगाड्या दिसत नाहीत त्या ऐवजी रेडा गाड्या दिसतात. तांदूळ हे बंगालचे मुख्य पीक आणि ताग हे नगदी पीक.

भाज्या पुष्कळ प्रकारच्या होतात मासे हे बंगाली लोकांचे फार आवडते खाद्य बंगालचे गरीब शेतकरी बहुदा बांबू आणि लाकडाची फळकुटे यानी बनविलेल्या झोपड्यात राहतात.

आमची कामरूप एक्स्प्रेस तेरा तासांनी म्हणजे सकाळी ८ वाजता न्यू जलपायगुडी या महत्त्वाच्या स्थानकावर पोहोचली येथून जवळच मीटर गेजचे सिलीगुडी स्थानक आहे न्यू जलपायगुडीहून पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग, सिक्कीमची राजधानी गंगटोक व भूतानची राजधानी थिंपू येथे जाणाऱ्या बसेस सुटतात. या बसेस सिलीगुडीवरून जातात व तेथले उतारू घेतात. त्यामुळे ही दोन्ही स्थानके सदैव गजबजलेली असतात न्यू जलपाय-गुडीहून एक पर्वतीय आगगाडी दार्जिलिंगला जाते पण दार्जिलिंग पोहोच-ण्यास बसपेक्षा दुप्पट वेळ म्हणजे आठ तास लागतात

न्यू जलपायगुडी व सिलीगुडी ही हिमालयाच्या पायथ्यापाशी आहेत. हिमालयाची प्रवेशद्वारेच जणू !

हिमालय ही परमेश्वराने भारताला दिलेली मूल्यवान देणगी आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की हिमालय आहे म्हणून भारत आहे भारताची उच्च संस्कृती हिमालयात जन्म पावलेली आहे.

## हिमालय

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराज
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्ड॰ ।।

अशा शब्दात कवी कुलगुरू कालिदासाने हिमालयाचे वर्णन केले आहे

श्रीमद्भगवद्गीतेत आपल्या विभूती सांगताना भगवान श्रीकृष्ण म्हणतात,–

स्थावराणां हिमालयः

सर्व स्थावर वस्तूमध्ये हिमालयाच्या रूपाने मी उभा आहे

हिमालय हे नावही मोठे सूचक व अर्थपूर्ण. हिमालय हा हिमाचा किंवा बर्फाचा मोठा साठा आहे. म्हणूनच तो पाण्याचाही मोठा साठा आहे. भारताला हिमालयापासूनच पाणी म्हणजे जीवन मिळते. उत्तर भारताच्या

सर्वच नद्यांना बाराही महिने हिमालयाकडून पाण्याचा पुरवठा होतो. या पाण्यावरच सर्व उत्तर भारताची शेती, उद्योगधंदे, जलवाहतूक, विद्युत–निर्मिती अवलबून असते, पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही हिमालयच करीत असतो हिमालयाच्या पाण्यामुळेच उत्तर भारतात अनेक तीर्थक्षेत्रे आणि शहरे उदयाला आली आणि आज भरभराटीत आहेत हिमालयात अमर्याद उद्‌भिज आणि खनिज सपत्ती आहे पशुपक्षी–धनही विपुल आहे. हिमालयात औषधी वनस्पती असख्य आहेत आणि अद्याप त्यापैकी अनेकाचे सशोधन व्हावयाचे आहे तीच गोष्ट खनिज सपत्तीची हिमालयात पाटीच्या दगडाचे आणि सगमरवराचे कित्येक मैल लाबीचे उच डोगर आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहेत. हिमालय हा गाळाच्या खडकाचा बनलेला असल्यामुळे त्याच्या पोटात खनिज तेल आणि दगडी कोळशाचा भरपूर साठा असण्याची शक्यता आहे. आसामच्या ईशान्य कोपऱ्यात दिब्रुगडाच्या आसमतात गेली कित्येक वर्षे खनिज तेल प्रत्यक्ष मिळतच आहे. हिमालयामुळे उत्तर-भारताच्या भूमीला दरवर्षी नद्याच्या पाण्याने वाहून आणलेली सुपीक माती उपलब्ध होते.

हिमालयामुळेच असामान्य सृष्टीसौंदर्याने नटलेली आणि आरोग्य-दायक अनेक थड हवेची ठिकाणे निर्माण झाली आहेत, सिमला, मसुरी, काश्मिर, कुलू, मनाली, दार्जिलिंग, थिपू अशी कितीतरी थंड हवेची ठिकाणे हिमालयात आहेत. आणि हजारो प्रवासी दरवर्षी त्यांना भेट देतात. आणि सुखावतात या थड हवेच्या ठिकाणांनी अनेक श्रेष्ठ चित्रकारांना आणि इतर कलोपासकांना प्रेरणा आणि स्फूर्ती दिलेली आहे, देत आहेत आणि देत राहतील

हिमालयाचे भारतावर अनत उपकार झालेले आहेत उत्तर ध्रुवा-कडून येणारे थडगार वारे अडवून हिमालयाने भारताला समशितोष्ण हवामानाची देणगी दिली आहे. तसेच दक्षिणेकडून येणारे नैऋत्य मौसमी वारे अडवून विपूल पर्जन्याची देणगी भारताला दिलेली आहे त्यामुळेच वंदेमातरम् या गीतात म्हटल्याप्रमाणे आपली भारतभूमी सुजला सुफला सस्यशामला झालेली आहे.

हिमालय ही भारताची तपोभूमी आहे. प्राचीन काळापासून अनेक ऋषीमुनींनी तपश्चर्या करून मोक्षप्राप्ती करून घेतलेली आहे ही परंपरा अद्यापही खंडित झालेली नाही कारण स्वामी विवेकानंद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे आधुनिक विद्या पारंगत महात्मे चित्तशांतीसाठी हिमालयातच गेले होते तेथील शांत शीतल वातावरण आणि नयनरम्य परिसर ईशचिंतनासाठी आणि सत्य शोधण्यासाठी अत्यंत अनुकूल असे आहे. ऋषीकेशजवळील लक्ष्मणझुला-ओलांडून गेल्यावर जो स्वर्गाश्रम लागतो तेथेदेखील तपश्चर्येला अनुकूल वातावरण कसे असते याची कल्पना येते. भारतात निर्माण झालेली वैदिक वाङ्मय व त्यानंतरची रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आणि अद्वितीय ठरलेले भारताचे ललित वाङ्मय या सर्वांच्या रचनाकाराचा हिमालयाशी दाट परिचय होता हे निःसंशय अजूनही हिमालयात तपश्चर्या करणारे साधू आहेत आणि ते एकटे संन्यस्त वृत्तीने राहून गंगोत्री, जमनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ अशा ३५०० मी. उंचीवरील ठिकाणी ईशसाधना करीत असतात.

हिमालयाने गिर्यारोहणाला फार मोठी चालना दिली आहे. हिमालयाची अनेक शिखरे निरंतर बर्फाच्छादित आणि नऊ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीची आहेत ही शिखरे मानवाला जणू काय आव्हान देत असतात, 'या. भमिपत्रांनो या, अगदी आमच्या जवळ या आणि आपली ताकद धैर्य काटकपणा इत्यादी गुणांची कसोटी पहा. तुमच्या स्वागतासाठी आम्ही सज्ज आहोत आमच्यापर्यंत येऊन पोहोचलात तर तुमची दिगंत कीर्ती होईल ' हे आव्हान मानवाने स्वीकारले अनेक वेळा त्याचे प्रयत्न फसले. अनेक गिर्यारोहकांनी बर्फाच्या कड्याखाली चिरनिद्रा घेतली पण मानवाने प्रयत्न सोडले नाहीत आणि इ स १९५३ मध्ये शेरपा तेनसिंग आणि एडमंड हिलरी यांनी जगातील सर्वात उंच असलेल्या ठिकाणी एव्हरेस्टवर आपले पाऊल ठेवले आणि स्वतःचे व भारताचे नाव उजळून टाकले त्यानंतर अनेकांनी एव्हरेस्ट जिंकले, आणि नुकत्याच दोन जपानी महिलादेखील एव्हरेस्टवर पाऊल ठेवण्यात यशस्वी झाल्या परंतु अद्याप अनेक शिखरे अशी आहेत की जेथे मानवाला पाय ठेवण्यात यश मिळालेले नाही. उदा.

दार्जिलिंगहून ज्याचे सतत दर्शन होते ते कांचनगंगा शिखर. दरवर्षी जगातल्या कुठल्या ना कुठल्या देशातली गिर्यारोहकांची तुकडी भारतात येते आणि एखादे शिखर चढण्याचा प्रयत्न करते त्यासाठी लाखाने रुपये खर्च होतात. या शिखरावर हवा इतकी विरळ असते की कृत्रिम ऑक्सिजनची मदत घेतल्याशिवाय जगणे शक्य होत नाही अपुऱ्या ऑक्सिजनमुळे क्षणाक्षणाला धाप व दम लागतो मेंदूवरील ताबा कमी होतो

एकदा एक गिर्यारोहक शिखराजवळ आल्यावर इतका गोंधळला की आपण वर चढून शिखर गाठतो आहे या भ्रमात खाली उतरून आला.

या गिर्यारोहकांना इतरही अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. बर्फामुळे पायांची बोटे इतकी खराब होतात की कापून टाकावी लागतात. सबंध पाय वाचवण्यासाठी ती बोटे कापून टाकावी लागतात बर्फाच्या वादळात खूप मार बसतो आणि डोळे बिघडतात वरून बर्फाचा कडा केव्हा कोसळेल आणि अंगावर पडेल हे सांगता येत नाही चढतानादेखील पाठीवर १०–१२ किलो वजन घ्यावेच लागते डबा बंद अन्नावर दिवस काढावे लागतात, ते अन्न इतके कडक होते की चावणेही मुश्कील होते. पण मनुष्याची जिद्द अशी की तो आपले प्रयत्न सोडीत नाही. यातच त्याचा पुरुषार्थ आहे.

हिमालयातील पशुपक्षांबद्दल आणि वृक्षवेलींबद्दल लिहावे तितके थोडेच होईल आपल्याकडे न दिसणारे अनेक सुंदर सुंदर पक्षी हिमालयात दृष्टीस पडतात. तीच गोष्ट वनस्पतीचीही आहे ३०–३० मीटर उंच आणि

भव्यमोठे असे अनेक वृक्ष खडा पहारा करीत असतात त्यातील काही पर्जन्य जास्त झाल्यामुळे पडतात, आणि तेथेच कुजत राहतात. कारण वाहतुकीची अडचण ही हिमालयात फार मोठी समस्या आहे हिमालयात प्रवास करीत असताना ठिकठिकाणी १२ महिने सतत वाहणारे स्वच्छ आणि अमृतासारखे गोड पाण्याचे अनेक प्रवाह आपल्याला भेटतात आणि त्याचे पाणी पिणारा वाटसरू शीण गेल्यामुळे ताजातवाना होतो.

हिमालयातील एकामागे एक उंची वाढत गेलेल्या पर्वतांच्या रांगा पाहणे मनाला मोठा आनंद देते हिमालय हा घड्यांचा किंवा वळ्यांचा

पर्वत आहे असे मानतात हे सर्व डोंगर घनदाट जंगलांनी व्यापलेले आणि त्यामुळे हिरवेगार दिसतात त्यांचे सुळके विविध आकाराचे असतात.

हिमालयात साधारणपणे ६००० मी उंचीवर बाराही महिने बर्फाचे पांघरूण असते त्यातूनच हिमनद्या उगम पावतात आणि त्याच्याच पुढे नद्या बनतात हिमनदी अतिशय मंद वेगाने पर्वतावरून घसरत असते तिची हाल-चाल चालू असल्याचे जाणवतही नाही काही वेळा साचलेल्या बर्फाचे मोठे कडेही खाली कोसळतात. बर्फाचे वादळ सुरू झाले म्हणजे दगडांचा मारा करावा तसा बर्फाच्या खड्याचा मारा सुरू होतो बर्फाच्छादित शिखरे पाहणे हे एक मोठे आनंददायक दृश्य आहे जेव्हा ही पांढरीशुभ्र शिखरे उन्हात न्हाऊ लागतात तेव्हा तर ते दृश्य पाहातच राहावेसे वाटते कारण ती शिखरे सोनेरी दिसू लागतात आणि आकाशावर उन्हामध्ये उमटणारे विविध रंग त्या दृश्याचे सौंदर्य अनेक पटीने वाढवतात.

जगातील प्रत्येक माणसाने हिमालयाचे दर्शन अवश्य घ्यावे असे सुचवावेसे वाटते मग तो कोणत्याही धर्माचा, पंथाचा अथवा वंशाचा असो हे खरे आहे की हिमाच्छादित शिखरे जवळ जाऊन पाहणे केवळ गिर्यारोहकच करू शकतात- सर्वसामान्य माणसाच्या शक्तीबाहेरची ती गोष्ट आहे मग प्रश्न असा येतो की, प्रत्येकाने हिमालय पहायचा तो कसा ? त्याला उत्तर असे की एक तर हिमालयातील केदारनाथ, बद्रीनाथ, तुंगनाथ गंगोत्री, जमुनोत्री या यात्रा डोळसपणे कराव्यात अथवा दार्जीलिंगसारख्या हिमालयाच्या कुशीत असलेल्या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन काही दिवस राहणे व खूप भटकावे. आम्ही हिमालयातल्या सर्व महत्त्वाच्या यात्रा केल्या. तीन-चार थंड हवेची ठिकाणे पाहिली परंतु हिमालय पहाण्याच्या दृष्टीने आम्हाला दार्जिलिंग सर्वोत्कृष्ट वाटले. पण हिमालय पहाण्याच्या दृष्टीने जावयाचे तर १५ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर या काळात गेले पाहिजे आम्ही प्रथम दार्जिलिंगला गेलो ते सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात पुन्हा गेलो ते नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात दोन्ही वेळा हिमालयाचे मनसोक्त दर्शन घेऊन तृप्त झाली

—

प्रकरण पाचवे

# कुर्सिआँग, दार्जीलिंग व कालिंपाँग

दार्जीलिंग हा पश्चिम बंगाल राज्याचा पर्वतीय जिल्हा असून तो हिमालयाच्या कुशीत वसलेला आहे दार्जीलिंग हे या जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे दार्जीलिंगला जाण्यासाठी पूर्व रेल्वेच्या न्यू जल पाइगुडी या स्थानकावरून बसगाड्या सुटतात तसेच जवळच असलेल्या सिलीगुरी या रेल्वे-स्थानकावरून ही बसेस सुटतात आम्ही सकाळी ७-३० न्यू जल पाइगुडी स्थानकावरून बसने निघालो ते ११ वाजता दार्जीलिंगला पोहोचलो. हे अंतर ९१ किलोमीटर आहे व रस्ता पक्का आणि चांगला आहे वाटेत चढउतार फार, तसेच सारखी वेडीवाकडी वळणे आहेत, पण त्रास होत नाही.

दार्जीलिंगला न्यू जल पाइगुडीहून लहान पर्वतीय रेल्वेनेही जाता येते. ही रेल्वे ( Toy train ) १८८१ साली सुरू झाली या गाडीने दार्जीलिंगला पोहोचण्यास ७॥-८ तास लागतात. प्रवास कंटाळवाणा होतो. गाडी अरुंद असल्यामुळे वेग फार कमी असतो वाटेत लहान लहान रेल्वे-स्थानकेही फार. प्रत्येक ठिकाणी गाडी बरीच थांबते. रेल्वेचा मार्ग आणि बसचा मार्ग पुष्कळ ठिकाणी एकमेकांना समांतर व पुष्कळ ठिकाणी एकमेकांस छेदून जातात. न्यू जल पाइगुडीपासून ५८ किलोमीटर अंतरावर कुर्सिआँग हे महत्त्वाचे स्थानक आहे तेथे आगगाडीचेही स्थानक आहे बस आणि आगगाडी जवळ जवळ थांबतात. प्रथम ११ किलोमीटर अंतर दोन्ही मार्ग सपाटीवरून जातात व मग चढ सुरू होतो. चढ सुरू झाला की सृष्टिसौंदर्य दिसू लागते प्रथम बांबूची बेटे व उन्हाळी वृक्षांची अरण्ये दिसतात ताडाची झाडे विपुल आढळतात थोडे वर गेले की विविध प्रकारचे साग वृक्ष आढळतात त्यानंतर मेपल, बर्च, आल्डरची अरण्ये लागतात १८०० मीटरच्या वर चेस्टनट, ओक, मॅगोलिया व लॉरेनची दाट अरण्ये लागतात. हे

वृक्ष उंच वाढतात आणि त्यावर दाटीवाटीने पसरलेल्या फुलांनी लहडलेल्या वेली पाहून डोळे सुखावतात. जसजसे वर चढावे तसतशा वळणे घेत जाणाऱ्या नद्या नागमोडी जाणाऱ्या सर्पाप्रमाणे दिसू लागतात. मध्येच चहाचे प्रचंड मळे दृष्टोस पडतात. हिमालय चढून जाणे म्हणजे विषुववृत्तापासून ध्रुवापर्यंत प्रवास करण्यासारखे आहे असे म्हणतात. कारण हिमालयाच्या पायथ्याशी तराई विभागात विषुववृत्तावरच्यासारखी घनदाट उंच वृक्षांची सदाहरित अरण्ये आढळतात तर वरच्या हिमाच्छादित भागात ध्रुव प्रदेशासारखी स्थिती असते. दार्जीलिंग जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्ये म्हटले आहे, "दार्जीलिंग जिल्ह्यातील झाडांमध्ये जेवढी आश्चर्यकारक विविधता आढळते तेवढी जगात अन्यत्र कोठेही आढळत नाही. जसजसे हवामानात बदल होतात तसतसे वनस्पतीजीवनात बदल होतात. दार्जीलिंगच्या आसमंतात ४००० प्रकारच्या वनस्पती आहेत. विविध आकाराच्या आणि रंगाच्या ५५० पक्ष्यांच्या जाती आणि ६०० प्रकारची रंगीबेरंगी फुलपाखरे आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. कुर्सिआंग हे अतिसुंदर थंड हवेचे ठिकाण दार्जीलिंगच्या वाटेवर आहे. त्याची उंची १५६० मीटर आहे. त्यांना दार्जीलिंगची कडक थंडी मानवत नाही ते लोक उन्हाळ्यात कुर्सिआंगला राहणे पसंत करतात. हे एक लहान खेडेगाव होते. १८८० मध्ये पर्वतीय रेल्वे कुर्सिआंग पर्यंत आली आणि तेव्हापासून कुर्सिआंगचे महत्त्व वाढू लागले. १८९१ मध्ये ते जिल्ह्याचे उपकेंद्र केले गेले व त्याचे महत्त्व आणखी वाढले. कांचनगंगा या सुंदर शिखराचे दर्शन प्रथम येथेच घडते. इथली निसर्ग शोभा अवर्णनीय आहे. ऑरकीड नाव असलेल्या फुलाचे वेल सगळीकडे फुलेच फुले करून टाकतात. रेल्वेचे महत्त्वाचे स्थानक असल्यामुळे व्यापारही पुष्कळ वाढला आहे. क्षयरोग रुग्णालय, रेशीम उत्पादन केंद्र, आकाशवाणी केंद्र, अनेक शिक्षणसंस्था, हॉटेले आणि लॉज यांनी ते गजबजलेले असते.

कुर्सिआंगपासून ३३ किलोमीटर प्रवास केला की आपण दार्जीलिंगला पोहोचतो. दार्जीलिंग जवळ आले म्हणजे चहाचे हिरवेगार हसरे मळे आणि फर व पाइनचे उंचच उंच आणि सदाहरित वृक्ष आपले स्वागत करतात. दार्जीलिंग शब्दाची संस्कृत व्युत्पत्ती अशी आहे. दार्जीलिंगचे संस्कृत नाव दुर्जयलिंग म्हणजे अजिंक्य शंकर असे होते. त्याचा अपभ्रंश होऊन दार्जीलिंग

हे नाव रूढ झाले. दार्जीलिंगला 'हिमालयाची राणी' असेही म्हणतात कारण हिमालयातील थंड हवेच्या ठिकाणांमध्ये दार्जीलिंग हे सर्वांत सुंदर ठिकाण आहे यात दुमत होण्यास कारण नाही. दार्जीलिंगच्या उत्तरेला सिकीम, पूर्वेला भूतान, पश्चिमेला नेपाळ आहे. दार्जीलिंगची समुद्रसपाटीपासून उंची २१३४ मीटर आहे आणि वार्षिक पर्जन्यमान ३२० सेंटिमीटर आहे.

दार्जीलिंगला उन्हाळ्यात सरासरीने किमान तपमान ६ अंश सें. व कमाल तपमान १५ अंश सें. असते, तर हिवाळ्यात हीच तपमाने अनुक्रमे १५ सें. व ६ अंश सें. अशी असतात. आपणा महाराष्ट्रीयांना १२ ही महिने थंडी जाणवते. १८३५ पासून दार्जीलिंग इंग्रजांच्या अधिकाराखाली आहे. तेथील थंड हवा आणि अप्रतिम सृष्टिसौंदर्य पाहून इंग्रजांनी दार्जीलिंगला आपली हिवाळी राजधानी बनविली. तेव्हापासून त्याची भरभराट सुरू झाली. सरकारी कचेऱ्या, अधिकाऱ्यांसाठी बंगले, राजभवन, संस्थानिकांचे बंगले, बादशाही व मध्यम स्थितीतील लोकांसाठी हॉटेले, सुंदर रस्ते तयार झाले. आज दार्जीलिंगची लोकसंख्या पन्नास हजारांपेक्षा जास्त आहे. सर्व प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध आहेत. मोठा व्यापार आहे. मोटारींची धावपळ सतत चालू असते. रस्ते चढ-उताराचे असल्यामुळे दुसरे कोणतेही वाहन चालत नाही. टॅक्सीने तरी गेले पाहिजे किंवा पायी चालत गेले पाहिजे. दार्जीलिंगचे प्रमुख आकर्षण म्हणजे कांचनगंगा (८५९८ मीटर) या हिमालयातील विख्यात आकाशाच्या बर्फाच्छादित पर्वतशिखराचे दुरून पण स्पष्ट दिसणारे सूर्योदयाच्या वेळी कोवळ्या सूर्यप्रकाशात न्हाऊन निघणाऱ्या या शिखराचे दर्शन घेणे हा तिथे राहणाऱ्या लोकांचा नित्य क्रमच असतो. नेपाळमधील गुरख्यांचा भरणा सर्वांत जास्त आढळला. सिकीममधील लेप्चा आणि भूतिया लोक, आणि भारतातले लोक गुण्यागोविंदाने राहतात.

दार्जीलिंग शहर डोंगरउतारावर वसलेले आहे. एका भल्या मोठ्या तिमजली घरासारखे दार्जीलिंग मानले तर अगदी वरचा मजला म्हणजे 'दि मॉल' या नावाने ओळखला जाणारा भाग, असे म्हणता येईल. तेथे श्रीमंती हॉटेले, सुंदर बंगले, आकर्षक दुकाने आणि सुंदर विश्रांतिगृहे आहेत.

ह्या भागात श्रीमंत लोक आणि पर्यटक राहतात. दुसऱ्या मजल्यावर भारतीय पद्धतीची दुकाने व हॉटेले आहेत. या भागात मध्यम स्थितीतले लोक दाटीवाटीने राहतात. स्वच्छता अर्थात कमी. तळमजला म्हणजे नेपाळी, तिबेटी, भूतानी, सिकिमी अशा श्रमजीवी गरिबांचा भाग. या भागात अगदी दाट लोकवस्ती आढळते. हे लोक आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण पोषाखावरून आणि स्त्रिया विशिष्ट अलंकारामुळे ओळखता येतात.

## दार्जीलिंगमधील प्रेक्षणीय स्थळे –

(१) चौरस्ता किंवा चौक हा मॉल रस्त्यावर आहे. नेहरू मार्ग आणि मॉल मार्ग या ठिकाणी एकमेकांना छेदून चौक बनवितात. बहुतेक प्रवासी येथे भेटतात. येथे थोडा वेळ घालविणे फुफ्फुसांना हितकारक असते. येथील हवेत उंच पर्वतराजीतून आलेला ओझोन वायू मिसळलेला असतो. एक प्रकारचा मंद वास हवेला येतो. चौरस्त्यावरून कांचनगंगा व इतर हिमाच्छादित शिखरे फार सुंदर दिसतात. आजूबाजूचे निसर्गसौंदर्य अप्रतिम आहे.

येथून अडीच किलोमीटर अंतरावर बर्च हिल किंवा जवाहर टेकडी आहे. येथे पश्चिम बंगालच्या राज्यपालाचे हिवाळी राजभवन आहे. जवळच वर्द्धमानच्या महाराजाचा उदयमहाल राजवाडा आहे. त्याचा घुमट निळ्या रंगाचा असून नाव उदयमहाल आहे. चौरस्त्यापासून थोड्या अंतरावर तिबेटी निर्वासितांसाठी स्वावलंबन संस्था आहे. सर्व तिबेटी येथेच राहतात आणि गालिचे व इतर शोभेच्या वस्तू बनवून विकतात. तिबेटी लोक भीक मागत नाहीत. कठोर परिश्रम आणि अगदी साधी राहणी ही त्यांची वैशिष्ट्ये. कोणतेही काम हलके मानीत नाही. स्त्रियादेखील मोठमोठी ओझी पाठीवर घेऊन बाजारात जातात. गरीब–श्रीमंत हा भेद मानीत नाहीत. खेळीमेळीने, प्रेमाने एकत्र राहतात.

नॅचरल हिस्टरी म्युझिअम जवळच आहे. तेथे पेंढा भरलेले मृत प्राणी ठेवलेले आहेत. हिमालयात आढळणारे प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, फुलपाखरे यांचे मृतदेह पाहून निसर्गाच्या किमयेचे कौतुक वाटते. हिमालय पशुपक्ष्यांनी आणि वनस्पतींनी किती समृद्ध आहे याची कल्पना येते.

## (२) हिमालयाची गिर्यारोहण संस्था

२९ मे १९५३ रोजी शेरपा तेनसिंग आणि एडमंड हिलरी यानी जगातील सर्वांत उच्च पर्वतशिखर माउंट एव्हरेस्ट ( ८८४८ मीटर ) सर केले आणि त्यांचा हा विक्रम सगळ्या जगभर गाजला. तरुणामध्ये गीर्यारोहणाची हौस वाढावी आणि त्यानी असेच विक्रम करावेत. या हेतूने गिर्यारोहणाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी एक संस्था दार्जीलिंग येथे काढावी, असे भारत सरकारने ठरविले त्याप्रमाणे ४ नोव्हेंबर १९५४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या संस्थेचा शिलान्यास करण्यात आला. शेर्पा तेनसिंग यांच्यावर ह्या संस्थेची जबाबदारी सोपविण्यात आली. आज ही संस्था जोमाने आपले कार्य करीत आहे अनेक तरुण व तरुणी हे शिक्षण घेत आहेत व भिन्न भिन्न शिखरे सर करीत आहेत.

या संस्थेतील पदार्थ संग्रहालयात तेनसिंगांनी वापरलेली आयुधे ठेवलेली आहेत. तसेच हिमालयातील वैशिष्टयपूर्ण वनस्पतींचा आणि प्राण्यांचा केलेला संग्रह.

दार्जीलिंगचे प्राणिसंग्रहालय म्युझियम जवळच आहे. येथे हिमालयातील अस्वले, हरणे, पंडा व चित्ते आपल्या नैसर्गिक अवस्थेत पाहावयास मिळतात व मोठी मौज वाटते

## (३) स्टेप असाइड :

चौरस्त्याहून थोड्या अंतरावर स्टेप असाइड ' हा बंगला पाहावयास मिळतो बंगालचे सुप्रसिद्ध वकील व देशभक्त बॅरिस्टर चित्तरंजन दास यांचा हा बंगला. दासबाबूंचे देहावसान ह्याच बंगल्यात १६ जून १९२५ रोजी झाले व सगळा देश दु:खसागरात बुडून गेला. या बंगल्याच्या तळमजल्यावर सूतिकागृह असून वरचा मजला दासबाबूंचे स्मारक म्हणून त्यांच्या हयातीत होता तसाच ठेवला आहे.

## (४) भगिनी निवेदिता स्मारक .

ही इंग्रज तरुणी स्वामी विवेकानंदांची शिष्या झाली आणि तिचे नाव भगिनी निवेदिता असे ठेवले. तिचा मृत्यू दार्जीलिंग येथे झाला व

तिथेच तिचे दहन झाले १९२४ मध्ये स्वामी अभेदानंदांनी हे स्मारक उभारले आणि जवळच रामकृष्ण वेदान्त आश्रम ची स्थापना केली दर शनिवारी येथे वेदान्तावर चर्चा होते दार्जीलिंग रेल्वे-स्टेशनच्या जवळच हे स्मारक आहे.

## (५) धीर धाम मंदीर

रेल्वे-स्टेशनजवळच धीरधाम मंदिर हे शिवमंदिर आहे हे मंदिर काठमाडू येथील पशुपतिनाथ मंदिराची नक्कल आहे. हे मंदिर इ स. १९३९ साली बांधलेले आहे शिवलिंगाला चार मुखे असून ती चार दिशांकडे वळलेली आहेत

## (६) घूम बौद्ध मठ

दार्जीलिंगपासुन आठ किलोमीटर अंतरावर घूम बौद्ध मठ आहे या मठात तीन मीटर उंचीची बुद्धाची मूर्ती आहे त्याला मैत्रेय बुद्ध म्हणतात. शेराब ग्यानसो नावाच्या लामाने इ स १८७५ साली हे मंदिर बांधले. बुद्धाच्या दोन पट्टशिष्याचेही पुतळे आहेत तिबेटी भाषेत लिहिलेले आणि बुद्धाची शिकवण सांगणारे १०८जुने हस्तलिखित ग्रंथ आहेत तिबेटी शकाचा फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येतो तेव्हा येथे महोत्सव भरतो इतर उत्सवही होतात त्यावेळी लोकनृत्ये होतात येथे सर्वांना प्रवेश असतो कारण बुद्ध धर्म जातिभेद मानीत नाही येथील लामा पिवळपा पोशाखात वावरतात घूम हे रेल्वे-स्टेशन असून जगातले सर्वात उंचीवर असलेले रेल्वे-स्टेशन आहे त्याची उंची २७०० मीटर आहे

## (७) बतासिआ फास ( Batasia Loop ).

दार्जीलिंग रेल्वे-स्थानकापासून पाच किलोमीटर अंतरावर दार्जीलिंगला जाणारी पर्वतीय रेल्वे जवळजवळ वर्तुळाकार जाते व तेव्हा ती फाशीच्या फासाप्रमाणे दिसते स्थापत्यशास्त्राची ही अजब करामत असे वाटते या वर्तुळाकार मार्गाने जाताना गाडी ३०० किलोमीटर खाली उतरते बतासिआ म्हणजे जेथे वारा रात्रंदिवस वाहतो ती जागा येथून डोंगरउतारावर वसलेल्या दार्जीलिंग शहराची शोभा अवर्णनीय दिसते.

शिवाय त्या परिसरातले सृष्टिसौंदर्य आणि मध्येच हा लोखंडी चक्रांचा फास पाहून निसर्ग व मानव यांच्या शक्तीचाही साक्षात्कार होतो.

## (८) व्याघ्र टेकडीवरून सूर्योदयाची शोभा

दार्जीलिंगला भेट देणारा प्रवासी ११ किलोमीटर अंतरावर असलेल्या टायगर हिलला भेट दिल्याशिवाय राहत नाही या ठिकाणाहून सूर्योदयाची शोभा पाहणे फार आनंददायक असते. मात्र त्यासाठी पहाटे उठून सूर्योदया-पूर्वी जीपने जावे लागते सूर्योदय पाहण्यासाठी एक दुमजली इमारत मुद्दाम बांधलेली आहे तिच्या गच्चीवरून सूर्योदय चांगला दिसतो.

सूर्योदयापूर्वी आपण ढगांच्या समुद्रात उभे आहोत असे वाटते ढगांच्या बनलेल्या लाटा जणू काय गोठून जाऊन स्तब्ध झाल्या आहेत असे वाटते सूर्य वर येऊ लागला म्हणजे या लाटा सोनेरी रंगाने रंगविल्या आहेत असे वाटते आकाशात सुंदर रंगाची उधळण होते सूर्य जसा क्षितिजाच्या वर येत जातो तसा हा ढगांचा समुद्र दिसेनासा होतो आणि सभोवतालच्या भयानक दऱ्या आपल्या हिरव्या साजशृंगारात दृष्टीस पडतात थोडेसे कळले की सूर्याच्या कोवळ्या किरणात न्हाऊन सोनेरी बनलेले कांचनगंगा शिखर दृष्टीस पडते. ही दोन्ही दृश्ये पाहून डोळे निवतात व्याघ्र टेकडी समुद्रसपाटीपासून २८०० मीटर उंचीवर आहे

## (९) सेंचल सरोवर

दार्जीलिंगच्या आग्नेयेस १० किलोमीटर अंतरावर हे सुंदर सरोवर आहे हे सरोवर २७०० मीटर उंचीवर असून शेजारीच एक गोल्फ खेळ खेळण्याचे मैदान आहे जगातले सर्वात उंचीवर असलेले गोल्फ क्रीडांगण आणि वनभोजनायोग्य अशी ही जागा समजली जाते. विश्रामधामे बांधलेली आहेत दार्जीलिंगला पाणीपुरवठा या सरोवरातून केला जातो

## (१०) दार्जीलिंगचा बाजार

दार्जीलिंगला आलेला माणूस तेथील बाजारात एकदोन फेरफटके मारतोच चहासाठी दार्जीलिंग प्रसिद्ध असल्यामुळे चहाची दुकाने पुष्कळच. चहाचे दर ५० रुपये किलोपासून २० रु किलोपर्यंत असतात बाजारात लोकरीचे कपडे मोठ्या प्रमाणावर मिळतात. कारण थंडी फार असते

हाताने बनविलेल्या शोभेच्या वस्तू पुष्कळ मिळतात. मऊ व वजनाने हलके लाकूड विपुल मिळत असल्यामुळे लाकडाच्या वस्तू हा लघुउद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो भरतकाम केलेले कापड चांगले मिळते व त्याच्या वस्तूही मिळतात निसर्गचित्रे पुष्कळ मिळतात. बाकीचा बाजार आपल्या इकडच्यासारखाच असतो.

## कालिपाँग

दार्जीलिंगला भेट देणारे प्रवासी कालिपाँगला निदान धावती भेट दिल्याशिवाय राहात नाही कालिपाँग हे आधुनिक शहर असून दार्जीलिंग पासून एकावन्न किलोमीटर अंतरावर आहे. सुप्रसिद्ध पेशोक रस्त्याने आपण जातो आणि वाटेत लेपचूचे प्रसिद्ध चहाचे मळे पाहावयास मिळतात हा रस्ता घूम बौद्ध मंदिरापाशी पूर्वेकडे वळतो आणि हिमालयातील घनदाट जंगलातून उताराला लागतो शेकडो प्रकारच्या वनस्पती आणि वृक्ष पाहून फार बरे वाटते. वाटेत ठिकठिकाणी झाडे तोडून चहाचे मळे लावलेले आहेत या लेपचू मळ्यातील चहा दार्जीलिंगचा उत्तम चहा समजला जातो आणि ५० रु किलो भावाने विकला जातो

या मार्गात तीस्ता आणि रंगीत या नद्यांचा संगम प्रेक्षणीय आहे. वेगाने वाहणाऱ्या या नद्यांचे हिरवे आणि निळे पाणी जेथे मिळते तेथे प्रचंड आवाज होत असतो. या नद्या ज्या अरुंद दऱ्यातून वाहत येतात तेथे घनदाट अरण्ये असून एकंदर दृश्य मोठे रौद्रभीषण दिसते. माणसाच्या मनात हे दृश्य पाहून भीतियुक्त आश्चर्य आणि निसर्गाबद्दल कौतुकयुक्त आदर उत्पन्न होतो शेवटच्या १९ किलोमीटर रस्त्यावर आपण २००० मीटर उतरतो आणि घनदाट जंगल मागे पडून वृक्ष व त्यावर चढलेल्या फुलांनी भरलेल्या वेली आपले स्वागत करतात कालिपाँगला बहुतेक उताराचाच रस्ता आहे कारण कालिपाँगची उंची १४०० मीटर आहे. म्हणजे आपण दार्जीलिंगपासून ७०० मीटर खाली येतो दार्जीलिंगची थंडी ज्यांना मानवत नाही असे श्रीमंत पर्यटक कालिपाँग येथे उन्हाळ्यात राहायला जातात

कालिपाँग येथील बाजारात तिबेट, भूतान, सिक्कीम व नेपाळ येथील

लोक आपापल्या वस्तूच्या व्यापारासाठी आलेले असतात. त्यांचे रंगीबेरंगी पोशाख व त्यानी तयार केलेल्या विविध प्रकारच्या वस्तू प्रवाशाचे मन आकर्षून घेतल्याशिवाय राहत नाहीत १९०० साली स्थापन झालेला डॉ. ग्रॅहम अनाथबालकाश्रम प्रसिद्ध आहे इतर शिक्षक संस्थाही मिशनऱ्यानी स्थापन केलेल्या आहेत

-----

प्रकरण सहावे

# आसाम राज्य आणि काझीरंगा अभयारण्य

भारतातील प्रत्येक राज्यात कोणीतरी सत्पुरुष होऊन गेले असे दिसून येते. गुजराथेत नरसी मेहता प्रसिद्धीस आले राजस्थानात साध्वी मीराबाई, उत्तर भारतात तुळशीदास, महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास हे संत निपजले तर दक्षिणेत कर्नाटकात पुरंदरदास व तामीळनाडू-मध्ये त्यागराज उदयास आले. म्हणूनच भारत हा संतांचा देश आहे अशी जगभर त्याची ख्याती आहे.

आसामात संतकवी शंकरदेव नावाचे संत होऊन गेले व अजूनही आसामातील जनता शंकरदेवाना मानते व त्याची पुण्यतिथी मोठ्या भक्ति-भावाने साजरी केली जाते शंकरदेव १६ व्या शतकात होऊन गेले. इतर सर्व संतांप्रमाणे शंकरदेवाच्या चरित्राभोवती दंतकथा गुंफल्या गेल्या आहेत त्यांचा जन्म झाला तव्हा मंदिरातील घंटा, शंख व नगारे आपोआप वाजू लागले आणि त्यांच्या गावातील घरोघरच्या देव्हाऱ्यातील दिवे पाजळू लागले, आकाशात मेघांची गर्जना सुरू झाली. पाचव्या दिवशी ज्योतिष्याने शंकरदेवाचे भविष्य वर्तविले ते असे :

गुणे नारायणसम गंभीरे सागर
प्रतापे आदित्य अन् धर्मे महेश्वर

शंकरदेव वर्षाचे होण्यापूर्वीच त्यांची आई व वडील, दोघेही स्वर्गवासी झाले व आजीने त्यांचा सांभाळ केला. त्याचे बालपण केवळ शारीरिक शक्ती संपादण्यात गेले. ते इतके बलशाली झाले, की माजलेल्या बैलाची शिंगे धरून त्याला उलटा करून टाकीत. चपळ तर इतके होते, की हरणाचा पाठलाग करून त्याला पकडीत ऐन महापुरात ब्रह्मपुत्र पोहून ओलांडित. पण बाराव्या वर्षी एकदा विद्या न शिकल्याबद्दल आजीने त्याची खूप खरडपट्टी काढली आणि त्याना जंगली म्हटलं ते त्यांच्या मनाला फार लागले आणि त्या दिवसापासून त्यांनी विद्या मिळवायला सुरुवात केली, बुद्धी कुशाग्र असल्यामुळे त्यानी लवकरच संस्कृत, साहित्य,वेदवेदान्त, योगाभ्यास इत्यादीत प्रावीण्य मिळविले तसेच त्यांनी संगीतकला चांगली आत्मसात केली.

नंतर त्यांनी तरुणपणीच कीर्तन करण्यास सुरुवात केली. लोक शिक्षणासाठी आणि लोकसंग्रहासाठी कीर्तन हे फार चांगले साधन आहे एखादा चांगला कीर्तनकार एकाच वेळी हजारो श्रोत्यांवर चांगले संस्कार करू शकतो. त्याचे कीर्तन एखाद्या मूर्तीसमोर होत नसे. ते उघड्या पटांगणात कीर्तन करीत व तेथे सर्वांना मुक्त प्रवेश असे किंबहुना त्यांचे कीर्तन मुख्यत नामसंकीर्तन असे शंकरदेव जातपात मुळीच मानीत नसत.

शंकरदेवांनी अनेक तीर्थयात्रा केल्या तत्कालीन संतांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली. वादात ते फार कुशल होते प्रतिपक्षी त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांच्यासमोर टिकत नसत त्यांनी अनेक भजने व कवने रचली व ती आजही लोक आवडीने गातात त्यांनी लग्न केले, मुलेबाळे झाली, पण तुकाराम महाराजांप्रमाणे ते संसारात राहून संसारापासून अलिप्त राहिले.

शंकरदेवाना दीर्घायुष्य लाभले. ते आपल्या वयाच्या ११९ व्या वर्षी समाधिस्त झाले असे म्हणतात शंकरदेवांचे नाव घेताच आसामी मनुष्य आजही नतमस्तक होतो।

शंकरदेवांच्या या आसाम राज्याने हिंदुस्थानचा ईशान्य कोपरा व्यापला आहे. आम्ही दार्जीलिंगला भेट देऊन छोट्या पर्वतीय रेल्वेने प्रवास

करून पुन्हा न्यू जल पाइगुडीला आलो. हा प्रवास कटाळवाणा झाला. कारण आगगाडीने आठ तास लागले. गाडी अगदी हळू चालते व स्थानकावरून सुटली असली तरी धावत जाऊन पकडता येते सकाळी दहा वाजता दार्जीलिंग सोडले ते सध्याकाळी सहा वाजता न्यू जल पाइगुडीला येऊन पोहोचलो.

न्यू जल पायगुडीहून निघालो ते न्यू बोंगाईगाव जक्शनपर्यंत मोठ्या रेल्वेने प्रवास केला तेथून मीटर गेज लाईनच्या रेल्वेने प्रवास सुरू होतो या रस्त्यावर आसामची राजधानी व पहिल्या प्रतीचे शहर गौहत्ती आहे

न्यू बोंगाईगाव ते गौहत्ती हा आगगाडीचा प्रवास फार रमणीय आहे आगगाडीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवीगार झाडी आहे मध्ये मध्ये घनदाट अरण्ये लागतात. मधून चहाचे मळे कित्येक मैल पसरलेले आढळतात चहाचे मळे डोंगरउतारावर असतात असे आपण भूगोलात वाचतो, पण सपाटीवरही चहाचे मळे असतात ही नवीन माहिती प्रत्यक्ष पाहिल्यावर मिळाली चहाचे झाड पाच फुटांपेक्षा अधिक उंच वाढत नाही. त्यात काम करणाऱ्या स्त्रिया उभ्याने पाने खुडून पाठीवरील टोपलीत टाकतात. चहाच्या मळ्यात उंच वाटणारे काही वृक्ष आढळले. चौकशी करता असे समजले, की या वृक्षाची पाने चहाच्या झाडांना नैसर्गिक खत म्हणून उपयोगी पडतात पश्चिम बंगाल आणि आसाम या दोन्ही राज्यांचा मैदानी प्रदेश जवळजवळ सारखाच दिसतो रेल्वेच्या दोन्ही बाजूंना भाताची सुंदर शेते, बांबूची बने, केळीच्या बागा, लहान-मोठे तलाव व त्यात शिंगाड्याचे वेल दृष्टीस पडतात बऱ्याच ठिकाणी झासिथ नावाची जाड पानाची वनस्पती पाण्यावर आणि पाण्याबाहेरही तलावाच्या काठाकाठाने वाढलेली दिसते ह्या वनस्पतीच्या जाड पानाच्या टोपल्या विणतात आणि त्यांना मागणीही पुष्कळ असते डोंगराच्या उतारावरही भातशेती, केळीचे बाग व बांबूची बने दृष्टीस पडतात. मोकळी पडलेली जमीन अशी बंगाल व आसाममध्ये दिसतच नाही सर्वत्र काहीतरी उगवलेली असते महाराष्ट्रात आगगाडीने प्रवास करताना कित्येक हेक्टर जमीन मुरमाड, खडकाळ व नापीक दिसते. तसे दृश्य आसाममध्ये शोधूनही सापडणार नाही. नद्यांच्या काठी तागाचे

पीक अमाप येते तागाला दरवर्षी नवीन माती असलेली जमीन लागते. हिमालयातून वाहत येणाऱ्या नद्या दरसाल पुराच्या वेळी डोंगराची माती खरडून आणतात व ती दोन्ही तीरांवर पसरतात त्यामुळे जेथे अशी माती पडते तेथे तागाचे पीक उत्तम येते तागाचे पीक देणारा हिंदुस्थानचा भाग १९४७ साली पाकिस्तान झाला व अलीकडे बांगलादेश झाला. त्यामुळे कच्च्या तागाच्या बाबतीत आता पश्चिम बंगाल व आसामवर सर्व भर आहे असम किंवा ज्याला आपण आपण आसाम म्हणतो, तं राज्य भारताच्या ईशान्य कोपऱ्यात वसलेले आहे त्याचे अ– सम– जे सम नाही ते– हे नाव समर्थ आहे हिमालयाच्या पायथ्याचा हा भाग असल्यामुळे उत्तरेकडील भूमी असम म्हणजे चढ–उताराची आहे त्याच्या दक्षिणेला ब्रह्मपुत्रेचे सुपीक खोरे व आसामची बरीच वस्ती या आहे ब्रह्मपुत्र खोऱ्याच्या दक्षिणेला गारो, खाशी, जयनथा इत्यादी नावाने ओळखल्या जाणाऱ्या उंच टेकड्या किंवा डोंगर आहेत तो भूभाग चढ उताराचा आहे

आसामचा भारताच्या इतर भागाशी फारसा संबंध आला नव्हता. आसाम हा जादूटोण्याचा, जंगलांचा, श्वापदाचा, सर्पांचा व भयानक पावसाचा प्रदेश समजला जात असे एकट्यादुकट्या माणसाला तेथील जादूगार गेंडा किंवा बकरा बनवून दावणीला बांधून ठेवतात, असा समज होता मोगलांनी आसाम जिंकण्याचा एकदा प्रयत्न केला औरंगजेबाने अंबरचा राजा रामसिंग याला आसामवर स्वारी करायला पाठविले परंतु आसामचा प्रसिद्ध सेनापती लचितबरफुकम याने रामसिंहाचा पराभव करून परत पिटाळले.

अहोम वंशाचा राजा रुद्रसिंह आणि त्याची पतिपरायण पत्नी जयमती यांना आसामातील लोक फार मानतात त्याचा बेत त्रिपुरा संस्थानाचा राजा इलामाणिक याच्याशी संधान बांधून मोगलांना बंगालमधून हाकलून देण्याचा बेत होता पण त्याच्या अकाली मृत्यूमुळे तो सफल झाला नाही

आसाम हा अनेक संस्कृतीच्या संकराने बनलेला देश आहे. हिंदी, चिनी, बरमी, तिबेटी, नेपाळी आणि ख्रिस्ती संस्कृतीच्या संकरामुळे आसामात अनेक जाती आणि डोंगरी मुलखामुळे टोळ्या निर्माण झाल्या.

अनेक बोलीभाषा ही दुसरी समस्या, जातीजातीतली भांडणे ही तिसरी समस्या भारत स्वतंत्र झाल्यावर या समस्या सुटल्या तर नाहीच,उलट अधिक तीव्र बनल्या प्रत्येक जात व जमात वेगळी राहण्याची इच्छा करू लागली. शेवटी मध्यवर्ती सरकारला असे वाटले की आसामचे तुकडे पाडावे शेवटी १९५६ मध्ये ( Nagaland ) नागा टेकड्याची नागभूमी, १९७० मध्ये खासी, जमनया व गारो टेकड्यांचे मेघालय हे राज्य आणि १९७१ मध्ये मिझोराम हे मिझो लोकांचे स्वतंत्र राज्य, आणि नेफा हा प्रदेश अरुणाचल म्हणून १९७० मध्येच अस्तित्वात आला. त्रिपुरा हे लहानसे संस्थान होते. ते त्याच नावाने स्वतंत्र झाले तसेच अशा रीतीने मणिपूर अखंड आसामची शकले पडली या सर्व नव्या राज्यातील लोक मंगोलियन ब्रम्ही वगैरे पीत-वर्णीय वंशाचे दिसतात. डोळे बारीक, नाक बसके, गालाची हाडे वर आलेली वर्ण पिवळसर गोरा, उंची कमी पण काटक कष्टाळू आहेत ख्रिस्ती, बंगाली, आसामी लोकांशी बऱ्याच मुलींनी लग्ने केल्यामुळे धड पीतवर्णीय नाही, धड आर्यवंशीय नाही असेही लोक आहेत

आताचे आसाम राज्य तीन भागांत विभागले आहे ब्रह्मपुत्रेचे खोरे हा महत्त्वाचा भाग. आसामी भाषा ही मुख्य भाषा आहे काचार हा दुसरा भाग येथे बंगाली भाषेचे प्रभुत्व आहे या कल्पक भागाला बराकचे खोरे म्हणतात तिसरा भाग उत्तर काचार किंवा मिकीरचा डोंगराळ भाग येथे टोळीवाल्याची भाषा आसामातील सर्वात मोठे शहर व आता आसामची राजधानी गोहट्टीजवळ आल्याची खूण म्हणजे ब्रह्मपुत्र नदीवरचा प्रचंड रेल्वे पूल हा होय गोहट्टी प्राचीन नाव प्राग्ज्योतिषपूर मेघालय हे नवीन राज्य अस्तित्वात येईपर्यंत ( इ स १९७० ) शिलाँग ही आसामची राजधानी होती मेघालयाची शिलाँग ही राजधानी १९७० मध्ये झाली तेव्हा गोहट्टी ही आसामची राजधानी झाली गोहट्टी ब्रह्मपुत्र नदीच्या काठी बसले आहे. ब्रह्मपुत्र नदी पाहून अपूर्व समाधान होते. त्याच्या काठाला समांतर एक विस्तृत हमरस्ता आहे त्या रस्त्याने चालत जाण्यात मोठा आनंद आहे

भारतातील नद्यांमध्ये ब्रह्मपुत्रेचा सर्वच बाबतीत पहिला क्रमांक आहे.

तिची लांबी २७०४ कि मी आहे. तिला दरवर्षी सर्वात मोठे पूर येतात. ब्रह्मपुत्रेचा उगम तिबेटमध्ये आहे व त्या भागात तिला सांगपो म्हणतात भारताच्या ईशान्य कोपऱ्यात ती भारतात शिरते व पश्चिम वाहिनी होते गंगा–यमुनेप्रमाणे बाराही महिने तिला भरपूर पाणी असते. आसाम राज्याचा विकास तिच्यावर अवलंबून आहे आसाममध्ये तिला ब्रह्मपुत्र नदी असे पुल्लिंगी नावाने ओळखतात तिची रुंदी गोहट्टीजवळ एक किलो-मीटरपेक्षा जास्त आहे एवढी मोठी नदी आपल्या पाहण्यात नसल्यामुळे आपण आश्चर्यचकित होतो. गोहट्टीचा विस्तार खूपच मोठा पण त्या मानाने प्रेक्षणीय ठिकाणे कमी वाफेच्या बोटीत बसून ब्रह्मपुत्र ओलांडून परत येणे हा एक मजेदार अनुभव आहे. या बोटीच्या फेऱ्या सारख्या चालू असतात.

गोहट्टीच्या प्राणिसंग्रहालयात विशेष म्हणजे नाकावर शिंग असलेला गेंडा पाहणे याचे कातडे जाड व मजबूत असते. शिंगाला चांगली किंमत येते म्हणून या प्राण्याची शिकार फार होत होती पण त्या प्राण्याला आता संरक्षण मिळाले आहे म्हणून त्याची झपाट्याने घटणारी संख्या आता वाढू लागली आहे

ज्याप्रमाणे कलकत्त्याला गेल्यावर कालिमातेचे दर्शन अटळ तसे गोहट्टीला गेल्यावर कामाख्या देवीचे दर्शन अटळ. पूर्वी आसामला कामरूप हे नाव होते आणि कामाख्या ही आसामची राज्यदेवता समजली जाते. ही शक्तीची देवता आहे व शक्तीचे उपासक तिचे भक्त आहेत कामाक्षीचे देऊळ एका टेकडीवर आहे व देवळापर्यंत मोटाररस्ता आहे थोड्या पायऱ्या चढल्यावर आपण देवळात देवीचे रूप अतिशय उग्र आहे नरकासुराने हे देऊळ प्राचीनकाळी बांधले व तिला उत्सवाच्या वेळी नरबळी देत असत. इ. स १५६५ मध्ये पडके झालेले देऊळ राजा नरनारायण याने पुन्हा बांधले त्या वेळी १४० पुरुषांची मस्तके चांदीच्या थाळ्यांमधून देवीला अर्पण केली असे सांगतात स्त्रिया प्रेमळ, दयाळू आणि मृदुहृदयी असतात असे म्हणतात. कालिमाता आणि कामाख्या इतक्या निष्ठुर हृदयाच्या कशा, हे एक कोडे आहे.

गोहट्टीपासून ११ किलोमीटर अंतरावर वसिष्ठाश्रम या नावाचे

एक रम्य ठिकाण आहे तपश्चर्येला आदर्श स्थळ आहे स्वच्छ पाण्याचे तीन झरे आहे वसिष्ठासाठी ते गंगेने निर्माण केले, अशी आख्यायिका आहे. सध्या, ललिता आणि कांता अशी त्याची नावे असून ते बारमहा वाहतात.

नूनमती रस्त्यावर खनिज तेल शुद्ध करण्याचा कारखाना आहे. दिब्रुगड, नाहरकटिआ आणि धुलिआजन इथे खाणीतून काढलेले क्रूड– अशुद्ध तेल नळातून नूनमती येथे येते व शुद्ध होते हा कारखाना १९६१ साली उभारण्यात आला

आसाम हे चहाचे माहेरघर आहे हिंदुस्थानात दरवर्षी सुमारे ५० कोटी कि ग्रॅ. चहा होतो त्यापैकी जवळजवळ निम्मा म्हणजे २५ कोटी कि ग्रॅ. आसामात होतो. १२ लक्ष मजूर चहाच्या मळयात राबतात.

आसाममध्ये वेत, बांबू, ताडाची पाने, हचासिथची पाने याना कुटी-रोद्योगात फार महत्त्व आहे. वेताचे फर्निचर, बांबूची घरे व इतर अनेक वस्तु, ताडाच्या पानांच्या टोपल्या बनवितात घरे बांबूची असल्यामुळे दरवर्षी पुरात वाहून गेली तरी त्याचे विशेष वाटत नाही. नदीकाठच्या लोकांना पुराची सवयच असते आसाममध्ये दारिद्र्य, डास आणि रोगराई फार आहे गरिबाची स्थिती स्वातंत्र्यप्राप्तीनतर सुधारली नाही.

आसाममधील काझीरगा अभयारण्य सगळचा जगभर प्रसिद्ध आहे आसामला भेट देणारे प्रवासी काझीरंगाला भेट दिल्याशिवाय राहत नाही. नाकावर एकच शिंग असलेल्या गेंड्याबद्दल काझीरगा मुख्यत प्रसिद्ध आहे. काझीरंगा जाण्यासाठी गोहट्टी दिब्रुगड रेल्वे लाइनवर मनिआची स्थानका-पर्यंत रेल्वेने प्रवास करावा लागतो मनिआची स्थानकावर टॅक्सी मिळतात. टॅक्सीने साडेचार तास प्रवास केल्यावर काझीरगा टूरिस्ट लॉजवर आपण पोहोचतो वाटेत जोरहाटा हे आसाममधील मोठे शहर व चहाची मोठी व्यापारी पेठ लागते आसाम राज्याच्या ब्रम्हपुत्रा खोऱ्याचे दर्शन होते. अतिशय सुपीक प्रदेशातून आपण प्रवास करीत आहोत याचा प्रत्यय येतो.

एकशिंगी गेंड्याची सख्या बेदरकारपणे केलेल्या शिकारीमुळे फारच रोडावली होती. १९०४ साली फक्त १२ गेंडे शिल्लक होते. १९२६ साली

वनखात्याने शिकारीला बंदी घातली. व या संरक्षणामुळे गेंड्यांची संख्या वाढू लागली १९७२ मध्ये त्यांची संख्या ७०० पर्यंत गेली. १ जानेवारी १९७४ पासून काझीरंगा हे राष्ट्रीय अभयारण्य म्हणून घोषित झाले. काझीरंगा अभयारण्याने ४३० किलोमीटर क्षेत्रफळ व्यापले आहे. उत्तरेकडे ब्रह्मपुत्रा नदी वाहते

एकशिंगी गेंडा हे जरी मुख्य आकर्षण असले तरी इतर प्राणी व पक्षी पुष्कळ आहेत. रानरेडे व म्हशींचे कळप, सांबर व इतर अनेक जातींच्या हरणांचे कळप, हत्तींचे कळप, वाघ, अस्वले, सर्प व इतर सरपटणारे प्राणी, हजारो निरनिराळ्या जातींचे पक्षी, पेलिकन पक्षी वगैरे पशुपक्षी पाहण्याची सोय काझीरंगा अभयारण्यात होते

प्रवाशांना हिंडवण्याकरिता हत्तीची व जीप गाड्यांची सोय आहे. आम्ही गेलो त्या दिवशी हत्ती व जीप गाड्या उपलब्ध नव्हत्या आमच्या टॅक्सींना आत जाण्याची परवानगी मिळाली आम्ही दहा किलोमीटर हिंडून आलो दोन गेंडे, एक रानरेड्यांचा कळप, एक हरणांचा कळप आम्ही पाहिला व काळोख पडू लागल्यामुळे तेवढ्यावरच समाधान मानावे लागले.

आत प्रवास करताना रस्त्याच्या दोन्ही अंगाला उंच गवत दिसते. मध्ये मोकळी मैदाने व पाण्याची तळी दिसतात. नोव्हेंबर महिन्यात ४-३० ला सूर्य मावळतो व ५ वाजता काळोख पडतो आम्ही काझीरंगा ४-३० वाजता सोडले व रात्री ८ वाजता मनिआचीला परत आलो. काझीरंगा नीट पहावयाचे तर निदान दोन दिवस पूर्ण राखून ठेवले पाहिजेत आणि खर्चाला पिशवी सैल ठेवली पाहिजे काझीरंगा नावाचे ठिकाण आम्ही पाहिले व दोन एकशिंगी गेंडे पाहिले इतकेच

अशा रीतीने आसामची धावती भेट आटोपली गोहट्टी हे केवळ आसामचेच प्रवेशद्वार नसून मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम व अरुणाचल प्रदेश या राज्यांचे प्रवेशद्वार आहे मिनिआचीपर्यंत गेल्यावर नागालँड व मणिपूर पाहण्यासाठी दिमापूरला जाणे सोयीचे पडते.

प्रकरण सातवे

# नागभूमी व मणिपूर

## दिमापूर

दिमापूर हे नागालँडमधील महत्त्वाचे शहर असून ते रेल्वे जंक्शनही आहे. येथूनच नागालँडला व मणिपूरला जाण्यासाठी दररोज बसेस ये जा करतात येथे प्राचीन काचारी राजघराण्याच्या राजधानीचे पुष्कळ अवशेष सापडले आहेत. त्यात भग्न मंदिरे, कोरीव काम केलेले खांब आणि पाण्याची टाकी आहेत प्रेते पुरल्याच्या अनेक खुणाही सापडतात. नागा टोळ्यातील लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे आहेत ते मानतात की मनुष्य मरण पावल्यानंतर त्याला प्रथम निरनिराळ्या वनस्पतीचा जन्म लाभतो नंतर प्राण्यांचा लाभतो व शेवटी मनुष्यजन्म लाभतो मनुष्य हा प्राणी वनस्पतींच्या रूपात जन्म घेत असल्याने आपली जमीन सुपीक आहे असे ते मानतात दिमापूरला विमानतळही आहे

दिमापूरहून दररोज नागभूमीची राजधानी कोहिमा व मणिपूरची राजधानी इम्फाळ येथे जाण्यासाठी बसेस सुटतात दिमापूर सोडल्यानंतर लौकरच घाट सुरू होतो दिमापूर ते कोहिमा हे अंतर १२० किलो मीटर आहे कोहिमाची उंची समुद्र सपाटीपासून १४६३ मीटर आहे कोहिमाला पोहोचण्यास ३॥ ते ४ तास लागतात रस्ता चांगला पक्का आहे घाटातला रस्ता असल्यामुळे सारखी वळणे लागत असतात ४० मैलावर घासपाणी हे खेडेगाव लागते. तेथे काही दुकाने आणि पऱ्याची घरे दिसतात

या रस्त्यावरून कोहिमाकडे जाताना घनदाट अरण्ये, केळींच्या बागा, बांबूची बेटे, डोंगर उतारावरील भात–शेती, आणि सतत बदलणारे देखावे इत्यादीमुळे प्रवासाचा कंटाळा येत नाही चोहीकडे हिरवेगार दिसते एका अंगाला खोल दरी व दुसऱ्या अंगाला हिरवेगार दिसणारे डोंगर असे दृश्य मधून मधून दिसते माल वाहून नेणाऱ्या ट्रक्स मधेच भेटतात. स्वातंत्र्य प्रिय

व सुदृढ आणि चपळ नाग तरुण पाहिले म्हणजे बरे वाटते. नाग भूमीतले लोक जे वेगळे राज्य मागत होते, ते भाषिक किंवा धार्मिक ऐक्य भावनेने नव्हे खरे तर सोळा मुख्य टोळ्या नाग लोकात आहेत प्रत्येकीची वेगळी वैशिष्टये आहेत नाचगाणी वेगळी, बोली भाषा वेगळी, कपड्यांची रंगसंगती वेगळी पण आपण सर्व या नाग डोंगराच्या प्रदेशाची लेकरे आहोत ही भावना प्रबळ आणि नागभूमीबद्दल विलक्षण प्रेम व अभिमान म्हणून वेगळे राज्य हवे खरे म्हणजे नागा लोकाना पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे होते व ही मागणी करणारा नेता फिजो तो आता लंडनमध्ये राहतो व तेथून स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे हलवितो. अजून पुष्कळसे नागा भूमिगत आहेत व अधून मधून उपद्रव देतात त्यांना कोणत्या तरी बाहेरच्या देशाची फूस व गनिमी पद्धतीने हल्ले करून नुकसान करण्याचे शिक्षण दिले जात असले पाहिजे एरवी वर्षानुवर्ष लढा चालू ठेवता आला नसता

१ डिसेंबर १९६३ रोजी कोहीमा येथे भारताच्या राष्ट्रपतींनी, एका भव्य समारंभात भारतातले सोळावे राज्य नागालँड अस्तित्वात आले आहे अशी घोषणा केली त्यावेळी नागालँडची लोकसंख्या ५ १६ लक्ष होती. क्षेत्रफळ १६,००० चौरस किलोमीटर आहे. अर्थात काही खास अधिकार त्यांना मिळाले आहेतच ख्रिस्ती मिशनऱ्यानी नागालँडमध्ये आपले पाय फार पूर्वीपासून रोवले त्यानी नागा लोकाना बाटवले हे खरे, पण काही चांगल्या गोष्टीही केल्या एकमेकांचा खून करणारे नागा माथेफिरू बायबलच्या शिकवणुकीने पुष्कळसे शांत झाले व त्याच्या मधील बंधुभाव वाढीस लागला

मिशनरी लोकांनी शाळा, कॉलेजे व दवाखाने काढले त्यांना रोमन लिपी दिली त्याच्यामध्ये पाश्चात्य वाङ्मयाचा प्रसार केला यंत्रशास्त्र, तंत्रविद्या, सामाजिक शास्त्रे यांची शिकवण दिली, पोषाख दिला आणि त्यांची पुष्कळ सुधारणा केली. सोळा जमातीचे लोक एकत्र काम करू लागले नागालँडमध्ये सत्तर टक्के लोक ख्रिस्ती झालेले आहेत

कोहिमा हे राजधानीचे शहर अतिशय सुंदर आहे. डोंगर उतारावर बांधलेली दुमजली टुमदार व प्रमाणबद्ध बांधणीची बंगलेवजा घरे, घरा-

पाशी छोटासा बगीचा, स्वच्छ व शांत परिसर प्रवाश्याची मने आकृष्ट करतो यात नवल नाही. नागा लोक मंगोलियन वंशाचे पण फार काटक, कष्टाळू, शूर आणि गनिमी युद्धात तरबेज आहेत कोणताही त्याग करण्यास ते सिद्ध असतात भूमिगत नागांनी अनेक वर्षे वनवासात राहून भारतीय सैन्याशी लढा दिला. नुकतेच बहुतेक नागा लोक शस्त्रासहित शरण आले. भारतीय जीवनाशी एकरूप होण्याचे त्यांनी मान्य केले आहे त्यांच्याकडे जी शस्त्रास्त्रे होती ती चिनी बनावटीची होती यावरून त्यांना चीनची फूस असावी आणि गनिमी युद्धाचे शिक्षणही मिळत असावे असे दिसते. नुकतेच भारत-चीन संबंध सुधारू लागल्यामुळे परिस्थिती सुधारण्यास मदत होईल असे वाटते नागालँड भारतीय सरहद्दीजवळ असल्यामुळे तेथे शांतता राहणे भारताच्या दृष्टीने अगत्याचे आहे सर्व मुलूख डोंगराळ असल्यामुळे सुव्यवस्था व कायद्याचे राज्य राखणे अवघड जाते.

## इम्फाळ किंवा मणिपुर

इम्फाळ ही मणिपूर राज्याची राजधानी इम्फाळला मणिपूर असेही म्हणतात इम्फाळ हे कोहिमा प्रमाणे डोंगर उतारावर वसलेले शहर नाही. ते सपाटीवर किंवा डोंगर पठारावर वसलेले शहर आहे शहराच्या नवीन भागात प्रशस्त सुंदर रस्ते आहेत. जुना भाग सामान्य आहे सायकल रिक्षा हे येथील स्वस्त वाहन काही ऑटोरिक्षाही दिसतात

श्री मारवाडी धर्मशाळा नावाची उत्तम पक्क्या बांधणीची धर्मशाळा जुन्या भागात आहे. तेथे सर्व सुविधा आहेत चार दिवस राहावयास खोल्या मिळतात जवळच मारवाडी हॉटेल आहे तेथे शाकाहारी जेवण ताटाला रु ३ या दराने बरे मिळते चहाच्या ग्लासला २५ पैसे पडतात पण कॉफीच्या ग्लासला ७५ पैसे पडतात. मणिपूरला पाव चांगला मिळतो दूध मात्र मिळत नाही मद्याची दुकाने आढळली नाहीत. बाजार चांगला आहे व बहुतेक सर्व तयार माल विकत मिळतो. काही दुकाने बायकाच चालवितात.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५१
दा. क्र

मणिपूर हातामागाच्या कापडासाठी प्रसिद्ध आहे. येथे आलेला प्रवासी दोदोडशे रुपयाचे कापड विकत घेतल्या शिवाय परत जात नाही विशेष खप ५–६ वारी साड्या आणि अथरण्याच्या व पांघरावयाच्या चादरींचा असतो कापसाच्या कापडाच्या शाली व मफलर चांगले मिळतात प्रत्येक मणिपुरी स्त्रीच्या व पुरुषाच्या अगावर पांढरे पट्टे असलेली काळया रंगाची नक्षीदार शाल लपटलेली दिसते थडी निवारण्यासाठी या शालीचा उपयोग होतो थडीतले पाघरूण म्हणून कापूस भरलेल्या नक्षीकाम असलेल्या रजया हेही मणिपूरचे एक वैशिष्टय आहे त्याचा खपही चांगला होतो चांगल्या रजईला ४०–५० रुपये पडतात या पेक्षाही महाग माल अर्थातच मिळतो. हातमागाच्या साड्याची किंमत रु १५ व पुढे मालाच्या दर्जानुसार मूल्य पडते हातमागाच्या कापडाखेरीज मणिपूरचे वैशिष्टय असे काही दिसत नाही विडी वा सिगरेट ओढण्याचे व्यसन येथील, जवळ जवळ प्रत्येक पुरुषाला दिसते बऱ्याच स्त्रियाही धूम्रपान करतात. स्त्रिया आपली लहान मुले पाठीवर वाहून नेतात मूल कडेवर घेण्याची प्रथा दिसत नाही. त्यामुळे ओझे उचलण्यास दोन्ही हात मोकळे राहतात

मणिपूरमध्ये सर्वच दुकाने बायका चालवतात व तेथे स्त्रीराज्य आहे असे जे म्हटले जाते ते खरे नाही हातमाग कापडाची मोठ मोठी दुकाने पुरुषच चालवितात.

हातमागाचे कापड चांगले असते व त्यावरील कलाकुसरही उच्च दर्जाची आढळते आसामच्या सुप्रसिद्ध गेंड्याचे चित्र काठ पदरात गुंफलेले आढळते मणिपुरी नृत्य तर भारतभरच नव्हे तर पाश्चात्य देशातही प्रसिद्ध आहे ते आम्हाम पाहावयास मिळाले नाही परंतु मणिपुरी संगीत ऐकावयास मिळाले मणिपूरमध्ये एकच प्रसिद्ध मंदिर आहे त्याला श्री गोविंदजीचे मंदिर म्हणतात पूर्वीच्या राजेसाहेबांनी ते आपल्या राजवाड्यासमोरच बांधवून घेतले आहे जवळच महाराजांनी स्थापन केलेले महाराज बुधाचंद्र महाविद्यालय आहे हे केवळ कला महाविद्यालय आहे ( Arts College ) त्यात १००० पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी आहेत. कॉलेजची इमारत एक मजलीच असल्यामुळे दुबार कॉलेज भरते. तेथे समे-

लनाची तयारी चालू असल्याचे दिसल्यामुळे सहज आत गेलो. तेथे मणि-पुरी संगीताची रंगीत तालीम चालू होती. मुले मुली मिळून गात होती अर्थ कळला नाही पण संगीताचे सूर कर्णमधुर वाटले महाविद्यालयाचे शिल्पकार महाराज बुधाचंद्र यांच्या स्तुतिपर पद होते असे चौकशी अंती समजले. हे महाविद्यालय सतत प्रगतिपथावर राहो आणि मणिपूरमधले सर्वश्रेष्ठ महाविद्यालय ठरो अशी सदिच्छा प्रगट केली होती

मणिपरमध्ये पुण्यामुंबई प्रमाणे अनेक मजली प्रचंड इमारती नाहीत हायकोर्टाची इमारत केवळ एक मजली आहे तर सचिवालय दुमजली आहे. गरीब लोकाची घरे बांबूची अथवा फळकुटाची आढळतात

येथील गायी आणि बैल लहानखुरे आहेत दूध आणि दही अथवा लस्सीची दुकाने नाहीत. भोजनालयात वेगळे पैसे दिल्यास वाटीभर दही मिळते

## मोइरांग कांगला

मणिपूर पासून टॅक्सीने ताल दीड तास प्रवास केल्यावर आपण मोइरांग या गावी येतो येथे नेताजी सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद सेनेचे स्मारक आहे व नेताजीचा पूर्णाकृती पुतळा आहे इमारतीत आझाद हिंद सेनेच्या संचलनाचे फोटो, निरनिराळ्या जपानी पुढाऱ्याबरोबर घेतलेली नेताजींची छायाचित्रे, काही कात्रणे, आझाद हिंद सेनेच्या ज्या जवानांना देशद्रोही म्हणून ब्रिटिशानी देहान्त शासन दिले त्यांच्या नावाची यादी इत्यादि स्फूर्तिदायक वस्तू ठेवलेल्या आहेत इमारतीत एक ग्रंथालयही आहे.

ग्रंथालयासमोर एक छोटासा स्तंभ आहे. या ठिकाणी भारताचा तिरंगी झेंडा आझाद हिंद सेनेने दि १४-४-१९४४ रोजी फडकावला व एक स्तंभ उभारला या स्तंभाचे उद्घाटन खुद्द नेताजींनी ८-७-१९४५ रोजी केले सदर झेंडा व स्तंभ ब्रिटिशांनी उखडून टाकला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर येथे नवीन स्तंभ उभारला व त्याचे उद्घाटन २१-१०-१९६८ रोजी श्री के के. शहा त्यावेळचे केन्द्रिय माहिती व नभोवाणी मंत्री यानी केले. मोइरा येथील वरील स्मारकाचे उद्घाटन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानी २३-९-१९६९ रोजी केले. नेताजींच्या पुतळ्याचे अनावरण त्यावेळचे राष्ट्रपती

वराहगिरी व्यंकटगिरी यांनी २१-१०-१९७२ रोजी केले अशा रितीने स्वर्गवासी नेताजींना केन्द्रिय मन्त्री, पतप्रधान आणि राष्ट्रपती यांनी आपली श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या लोकोत्तर कार्याचा गौरव केला हे उचितच झाले ब्रिटिशांच्या मगरमिठीतून पठाणाच्या वेषात निसटून जाणे जर्मनी गाठणे, पाणबुडीमधून जपान गाठणे आणि ब्रह्मदेशात स्वतन्त्र भारतीय लोकसत्ताक शासनाची स्थापना करणे या सर्वच घटना तेजस्वी आणि स्फूर्तिदायक आहेत मोइरांग कागालाची उंची ९१४ मीटर किंवा ३०००फूट आहे.

मोइरांग मध्ये लोकताल लेक नावाचे विशाल सरोवर आहे. उन्हाळ्यात पाण्याचे क्षेत्रफळ १०५ चौ कि. मि. असते तर ऐन पावसाळ्यात २६२ चौ कि मि असते तेथे एका टेकाडावर अतिथीगृह व उद्यान आहे तेथून सभोवतालचा देखावा अप्रतिम दिसतो. सभोवताली वृक्षाच्छलित डोंगराचे कडेच आहे तेथील सृष्टिसौंदर्य व निसर्ग पाहून पर्यटक स्वतःला विसरून निसर्गाशी एकरूप होऊन जातात

---

## प्रकरण आठवे

# " मिझोराम "

मिझोराम हा नवीनच निर्माण केलेला केंद्रशासित प्रदेश भारताच्या ईशान्येला आहे येथील बहुतेक मूळचे मिझो रहिवासी ख्रिश्चन झालेले आहेत आसाम बंगालमधून येऊन स्थायिक झालेल्या लोकांना वॉईज असे म्हणतात आणि ते सपाटीवर राहणे पसंत करतात. " मिझोराम " हा तीन शब्दांचा मिळून बनलेला शब्द आहे ' मि ' म्हणजे माणूस ' झो ' म्हणजे डोंगर, राम म्हणजे प्रदेश म्हणून मिझो याचा अर्थ डोंगरनिवासी असा होतो हे लोक मंगोल वंशाचे आहेत यापैकी बहुसंख्य लोकाना लुशाई असे म्हणतात कारण येथील डोंगराचे नावच लुशाई असे आहे. चकमा, लाखर

आणि पावी ही इतर जमातींची नावे आहेत. चकमा लोक बंगाली आणि आसामी यांची मिश्र भाषा बोलतात बाकीचे मिझो लोक मिझो भाषा बोलतात

मिझोरामचे क्षेत्रफळ अंदाजे २१,००० चौ कि मी आहे त्याच्या पूर्वेला ब्रह्मदेश, पश्चिमेला बांगला देश, उत्तरेला आसामचा काचार जिल्हा आणि ईशान्येला मणिपूर आहे. डोंगराळ मुलूख असल्यामुळे लोकसंख्या अगदी विरळ आहे एकूण लोकसंख्या ३ लक्ष आहे. म्हणजे दर चौ. कि. मी. ला फक्त १५ लोक असे प्रमाण पडते मिझोराममध्ये तीन जिल्हे आहेत. १) ऐजाल २) लीगली ३) चीमयुप्पी, डोंगराच्या ओळी दक्षिणोत्तर आहेत आणि अनेक नद्या व ओढे त्यातून वाहतात पावसाळ्यात त्यांना मोठाले पूर येतात हिवाळ्यात फारच थोडे पाणी असते. काही भाग सोडले तर मीझोराममध्ये बाराही महिने वसंत ऋतू असतो व हवा समशितोष्ण व उत्साहवर्धक असते मिझोरामच्या डोंगराळ भागाचे सृष्टिसौन्दर्य अपूर्व आहे येथील लोक आनंदी, उत्साही, नाच आणि गाण्याचे मोठे प्रेमी, आणि कष्टाळू आहेत. प्रेम करणे आणि करून घेणे हे स्त्री पुरुषाना फार आवडते. म्हणून मिझोरामला काही लोक मदनाचे राज्य असे म्हणतात प्रत्येक तरुणाला आपल्या आवडीच्या मुलीचे प्रेमाराधन करण्याची व त्यासाठी भेटण्याची परवानगी असते ही भेट काळोख पडल्यानंतर होती. तरूण संध्याकाळचे जेवण झाल्यानंतर आपल्या प्रेयसीच्या घरी जातात, तिने स्वत च्या केसाने बांधलेली सिगारेट करून दिली म्हणजे तिला तो तरूण पसंत आहे असा अर्थ केला जातो तरुणही आपल्या प्रेयसीला गोड गोळ्या आणि प्रसाधने देतात लग्न हा एक पवित्र करार मानला जातो आणि पातिव्रत्य पाळले जाते नवरदेव नवरीच्या बापाला रु ५०० ते १००० इतका हुंडा देतो आणि तो हुंडा मुलीचे नातेवाईकामध्ये वाटला जातो त्यामुळे मुलीला जर काही अडचण आली तर तिला मदत करणे हे आपले कर्तव्य आहे असे मानतात बायकोच्या आहारी जाणे हा तरुणाच्या बाबतीत मोठा दोष समजला जातो आणि त्याला सर्वजण बाईलबुध्या म्हणून चिडवतात, मिझो भाषेत शिव्या-वाचक शब्द जवळ जवळ नाहीत. परंतु बायल्या पा

अर्थाचा शब्द मात्र आहे.

मिझोराममध्ये अद्याप उद्योगधंदे निघालेले नसल्याने बहुतेक लोक शेती, जगलातली कामे आणि मासे मारणे हे उद्योग करतात. कापड विणण्याची कलाही या लोकानी चांगली प्राप्त केलेली आहे. मिझो लोक विनोदी स्वभावाचे असतात आणि स्वत:लाही विनोदाचा विषय बनवून भरपूर हसून घेतात त्यांच्या जीवनामध्ये नाच व गायन या कलांना फार महत्त्व आहे त्याच्यामध्ये अनेक प्रकारचे नाच प्रचलित असून ते प्रसगनिष्ठ असतात. विशिष्ट सणाला किंवा उत्सवाला विशिष्ट नाच नाचण्याची पद्धत आहे मिझोराममध्ये स्त्रियाना राजकारणात स्थान नाही घर सांभाळणे, शेतात काम करणे आणि मुले सांभाळणे यात त्याचा वेळ चांगल्या रितीने जातो

इ स. १८९८ पूर्वी हे लोक अतिशय क्रूरपणाने वागत. माणसाची हत्त्या करीत जनावरे मारत आणि दरोडे घालत माणसाचा मोठेपणा त्याने ठार केलेल्या माणसाच्या आणि प्राण्याच्या संख्येवरून मोजला जाई. आपआपल्या प्रियकरांना अशा रितीने हत्त्या करून आपले शौर्य दाखविण्यात पोरी उत्तेजन देत या त्रासाला कंटाळून ब्रिटीशांनी इ स १८९८ मध्ये मिझोरामचा प्रदेश ताब्यात घेतला आणि आपआपसातील भांडणे मिटविली. ब्रिटीश मिशनरी लोकानी भराभर दवाखाने व शाळा काढल्या. त्यांची भाषा सुधारली त्यांच्या भाषेत बायबलचे भाषांतर केले. जवळ जवळ सर्व लोकाना बाटऊन ख्रिश्चन केले. नेहमी हाणामारी खून दरोडे करणाऱ्या मिझो लोकांना शांतता प्रेमी ख्रिश्चन धर्म आवडला आणि त्यांची स्थिती सुधारू लागली ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नामुळे मिझोराममध्ये साक्षरतेचे प्रमाण केरळ खेरीज इतर राज्याच्या पेक्षा जास्त आहे. मिझोराममधील नाच :– मिझोराममध्ये चेरॉ खुल्लम, सुलाकीया, राल्‌, राम इत्यादी नावांचे नाच प्रचारात आहेत. चेरॉ हा नाच मृत्यूचा नाच आहे आणि तो मृत माणसाला त्रासणाऱ्या भूत पिशाच्याना शांत करण्यासाठी नाचतात. हा नाच जरी मृत्यूचा नाच असला तरी तो आनंदाने आणि उत्साहाने केला जातो हा नाच पॅसिफिक महासागरातील फिलीपाईन्स बेटातही प्रचलीत आहे असे

समजते. यात दोन आडवे धरलेले बांबू असतात. आणि नर्तक त्यातून आत बाहेर मोठ्या कौशल्याने हालचाली करतात यावेळी तालही धरलेला असतो आणि त्या तालानुसार बांबू मधील अतर कमी जास्त केले जाते. काही वेळेला बांबूच्या अनेक जोड्याही वापरतात आणि नाचणारांचे कौशल्य चांगलेच पणास लागते.

सुलाकीया हा शिकाऱ्यांचा नाच आहे आणि त्यात मुख्य पाच हाल-चाली असतात यामध्ये उजवा पाय डाव्या पायाकडे झुकवला जातो आणि गुडघा वाकवला जातो. हा नाच फार लोकप्रिय आहे आणि एखादा मनुष्य शिकार करून परत आला म्हणजे लोक हा नाच करतात. याशिवाय वीरांचा नाच, मुलांचा नाच, सामुदायिक नाच असे नाचाचे निरनिराळे प्रकार आहेत.

मिझोराममध्ये मानवी शक्ती ही मोठी शक्ती आहे मिझोलोक नवीन गोष्टी शिकायला, नवी तत्रविद्या आत्मसात करायला उत्सुक आहेत. आणि वेगाने प्रगती करीत आहेत ते महत्वाकाक्षीही आहेत भूतपिशाच्चावरील विश्वासावर आधारलेल्या जुन्या चालीरीती नष्ट होत आहेत आणि पाश्चात्याची राहाणी ते स्विकारीत आहेत

राजधानी ऐजाल :—ऐजाल हे शहर लुशाई या डोंगरी जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आणि मिझोरामची राजधानी आहे. आसाममधील सिलचर पासून १८० कि मी अतरावर ऐजाल असून बसने तेथे जावे लागते ऐजाल हे लहान गाव आहे आणि लोक सख्या ६००० च्या आसपास आहे ऐजालमध्ये अनेक रुग्णालये आणि शाळा आहेत लहान असले तरी गाव फार सुदर आहे. रेशीम काढणे हा एक महत्वाचा व्यवसाय आहे व त्यामुळे एक रेशीम-सशोधन सस्थाही तेथे चालू आहे. ऐजाल येथे पाण्याचे दुर्भिक्ष आहे म्हणून पावसाचे पाणी तलावात साठवून ठेवण्याची पद्धत आहे सरकारी विश्रामधाम आणि डाक बगला यामध्ये डेप्युटी कमिशनरच्या परवानगीने राहण्याची सोय होऊ शकते बाजारात मिझोराममध्ये तयार होणारे कमरेभोवती गुडाळ-ण्याचे रगी बेरगी कापड, परकर इत्यादी वस्तू मिळतात

— — —

प्रकरण नववे

# त्रिपुरा

त्रिपुरा हे नवीनच निर्माण केलेले राज्य आहे पूर्वी हे टिपेरा नावाचे छोटेसे संस्थान होते तेथील राजे आणि प्रजाजन शौर्याबद्दल आणि युद्ध-कौशल्याबद्दल प्रसिद्ध होते १३ व्या शतकात रत्नमाणिक्य आणि त्रिलोचन हे दोन पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांच्या नावावरून ते हिंदूधर्मीय होते हे सिद्ध होते

त्रिपुरा राज्याचे क्षेत्रफळ १०,६८० चौ. किमी आहे. त्रिपुराच्या उत्तर, पश्चिम आणि दक्षिणेला बांगला देशाची अंदाजे ८३७ कि मी लांबीची सरहद्द आहे पूर्वेला मिझोराम आणि आसाम ह्यांच्या सीमारेषा आहेत आणि त्यांची लांबी २९० कि मी आहे.

त्रिपुरामध्ये डोंगराच्या ६ रांगा उत्तर दक्षिण पसरलेल्या आहेत आणि त्याच्यामधील सरासरी अंतर १९ कि. मी आहे. त्यांची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत गेली आहे सर्वात उंच डोंगर जाम्पूईची उंची ९६५ मी आहे या डोंगरावरून अनेक लहान लहान नद्या वाहतात आणि त्यामुळे येथील सृष्टीसौंदर्य प्रेक्षणीय झाले आहे घनदाट अरण्यांनी अंदाजे शे. ६० क्षेत्र व्यापलेले आहे आणि राज्याच्या चारी बाजूनी डोंगर आहेत येथील लोकात तिबेटी आणि ब्रह्मी वंशाचे मिश्रण दिसते हिंदी लोकांचेही त्यात रक्त मिसळलेले असावे. बंगाली आणि आसामी लोकांची वस्तीही पुष्कळ आहे व हे लोक नद्यांच्या खोऱ्यातून राहतात. मूळच्या लोकांना बोडो म्हणतात व ते डोंगराळ भागात राहाणे पसंत करतात त्रिपुरातील लोक प्राचीन काळी मूर्तीची पूजा न करता झाडे, दगड, किस्तव इत्यादींची पूजा करीत हिंदी लोकांच्या संपर्कामुळे ते आता मूर्तीपूजक बनले आहेत, ख्रिस्ती आणि बौद्ध धर्माचे लोकही त्रिपुरात आढळतात नाचण्यागाण्याचे वेड ईशान्य भारतातील इतर राज्यांप्रमाणे त्रिपुरामध्येही आढळते प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगासाठी वेगवेगळे नाच असतात उदा. सुगीचा, जन्माचा,

विवाहाचा नाच इत्यादी हाताने विणलेल्या रंगीबेरंगी कपड्यांची बायकांना फार आवड असते तसेच फुलांच्या अलंकाराचीही त्याना फार आवड आहे, मुलीना भेटीदाखल बाहुल्या देण्याऐवजी छोटे छोटे हातमाग देण्याची प्रथा आहे त्यामुळे खेळता खेळता त्यांना विणकामाची सर्व माहिती समजते. जसजशी मुले मोठी होतात तसतसे अधिक मोठे आणि गुंतागुंतीचे हातमाग देण्यात येतात वनस्पतीपासून ते स्वतःच विविध रंग बनवतात. त्रिपुरामधील लोक अतिशय कुशल हातमाग विणकर आहेत तसेच ते भांडी तयार करणे, लाकूड कोरणे वगैरे सारख्या विविध कलामध्ये व मूर्ती घडविण्याचे कलेतसुद्धा प्रवीण आहेत. गरम कपडे तयार करण्यातही ते फार कुशल आहेत येथील लोक शांतताप्रिय आणि समाजातील इतर लोकांशी गोडीगुलाबीने राहाणे पसंत करतात

## विवाह पद्धती

येथील विवाह पद्धती मोठी गमतीची होती या पद्धतीनुसार भावी जावयाला एक वर्षभर शिकाऊ उमेदवार म्हणून वधूचे घरी राहावे लागत असे तेथे त्याचे काम बघून मुलगी द्यायची की नाही हे ठरवित असत. मुलगी न दिल्यास काही भरपाई द्यावयाची पद्धत असे. अगदी कुचकामी निघाल्यास हाकलून देत असत या परिस्थितीत काही जोडपी प्रेमात पडत आणि पळून जात मुलीचे वडील हा आपला मोठा अपमान झाला असे मानीत व जोडपे सापडल्यास त्याला शिक्षाही करीत वराने जर मुलीच्या बापाला हुंडा दिला तर त्याची वर्षाची उमेदवारी चुके व तावडतोब लग्नही होत असे आता ही पद्धत पुष्कळ कमी झाली आहे भारतातील हिंदू लोकांच्या प्रभावामुळे हल्ली हिंदू पद्धतीनेच विवाह होऊ लागले आहेत

त्रिपुरामधील बहुसंख्य लोक लाकडी फळ्यांनी बनविलेल्या घरात राहतात आणि भिंती बांबूच्या तट्ट्यांच्या असतात बरीच घरे जमीनीपासून मीटर दीड मीटर उंचीच्या खांबावर उभारलेली असतात घराला खिडक्या अशा नसतातच हवेसाठी लहान लहान झरोके असतात. ते लहान असल्यामुळे भुताना आत येता येत नाही अशी समजूत आहे येथील स्त्रिया फार कष्टाळू आहेत पहाटे उठून कामाला लागल्या म्हणजे रात्रीशिवाय

त्यांना विश्रांती मिळत नाही घरकाम, शेतातले व जंगलांतले काम, नवऱ्याची बडदास्त ठेवणे, मुलांची काळजी घेणे यात त्यांचा दिवस केव्हाच निघून जातो. बायकांच्या मनाने पुरुष थोडेसे आळशीच असतात आणि बायकाही प्रेमाने असो वा भितीने असो त्यांचा आळशीपणा खपऊन घेतात

जंगलातले लाकूड व इतर पदार्थ ही त्रिपुराची मोठी धनदौलत आहे. तेथील जंगलखाते जंगलाची निगा अतिशय काळजीपूर्वक राखते नवीन नवीन झाडे लावतात आणि फळबागाही तयार करतात

आगरतळा ही त्रिपुराची राजधानी तेथून राज्याच्या सर्व भागात रस्ते गेले आहेत आणि आसाममधील काचार जिल्ह्याला ही राजधानी जोडलेली आहे पूर्वसीमेवरील धर्मनगरपर्यंत रेल्वे गेलेली आहे अगरतळा हे लहान-सेच पण सुंदर शहर आहे तेथे युद्धकाळासाठी तयार केलेले विमानतळही आहेत तेथे मोठे लष्करी ठाणे आहे आणि लष्करी सामानाची आणि जवानांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर चालू असते आगरतळ्याला बसने अथवा विमानाने जावे लागते. त्रिपुरा हे तीनही बाजूनी बांगला देशाला भिडत असल्याने त्याचे राजकीय आणि लष्करी महत्त्व वाढत आहे. नैसर्गिक समृद्धीमुळे विकासाची वाटचाल वेगाने होत आहे

----

## प्रकरण दहावे

# मेघालय आणि त्याची राजधानी शीलाँग

शाळेत भारताचा भूगोल शिकताना आसाममध्ये ब्रह्मपुत्र नदाच्या दक्षिणेला गारो, खासी आणि जयन्तिया या डोंगरांची एक रांग आहे असे वाचल्याचे सर्वांना स्मरत असेल या डोंगराळ भागात ब्रिटिशांनी आपला अंमल बसविल्यावर बहुसंख्य जनतेला बाटवून खिस्ती धर्माची दीक्षा दिली.

या भागातील खासी ही मुख्य जमात बव्हंशी ख्रिस्ती आहे या खासी लोकांनी ख्रिस्ती झाल्यावरही आपल्या जुन्या चालीरीती व संस्कृती सोडली नाही ब्रिटिशांनी त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची धमकी दिली परंतु याचा परिणाम उलटा झाला आणि आपली जुनी संस्कृती, भाषा व रीतीरिवाज टिकविण्याचा त्यांच्या उत्साह वाढला खासी साहित्यिकांनी आणि कला॰ वंतानी या चळवळीला पाठिंबा दिला आपले वेगळेपण टिकविण्यासाठी वेगळ्या राज्याची मागणी पुढे आणली आणि त्यासाठी अहिंसात्मक लढा सुरू केला हल्लीचे मेघालयाचे मुख्य मंत्री श्री विलिअमसन संगमा हे या लढ्यात एक प्रमुख पुढारी होते अखेर मध्यवर्ती सरकारला नमावे लागले. २ एप्रिल १९७० रोजी 'मेघालय' या नव्या राज्याची स्थापना झाली. तोपर्यंत आसामची राज्याची राजधानी असलेले 'शीलाँग' हे सुंदर शहर मेघालय राज्याची राजधानी बनले

मेघालयात दोनच जिल्हे आहेत १) संयुक्त खासी आणि जयन्तिया आणि २) गारो पर्वत

मेघालयाचे क्षेत्रफळ अंदाजे २२,६०० चौ कि. मी आहे. आणि लोकसंख्या अवघी १० लक्ष आहे लोकसंख्या विरळ म्हणजे दर चौ. कि मी. ला ४४ आहे साक्षरता शे २९. या राज्याला दिलेले मेघालय हे सुंदर नाव अगदी सार्थ आहे मेघालयातील आकाश वर्षातील बहुतेक महिने मेघाच्छादित असते. हवामान दमट आणि सम असते. कडाक्याची थंडी ही नाही आणि रणरणता उन्हाळाही नाही. शीलाँग हे थंड हवेचे ठिकाणही आहे पण त्याचे वैशिष्ट्य असे की ते बारमाही थंड हवेचे ठिकाण आहे महाबळेश्वर, माथेरान इत्यादी ठिकाणी फक्त उन्हाळ्यात थंड हवेसाठी लोक गर्दी करतात इतर आठ महिने फक्त स्थानिक लोकांची वस्ती. शीलाँग येथे मात्र बाराही महिने थंड हवेसाठी आणि सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठी प्रवाश्यांची वर्दळ असते मेघालयाची जवळ जवळ दीडशे मैलाची भूसरहद्द बांगला देशला लागून आहे शीलाँग पठाराचा सर्वात उंच भाग २००० मीटर उंचीचा असून त्याला शीलाँग पीक म्हणतात. चेरापुंजी हे जगातले जास्तीत जास्त पाऊस पडण्याचे ठिकाण मेघालयात आहे. तेथे दरवर्षी

५०० इंच किंवा १२५० सेंटीमीटर पाऊस पडतो व तोही केवळ सहा–सात महिन्यांच्या काळात ! मेघालयाचा मैदानी भाग सुपीक असून तेथे तांदुळाचे पीक चांगले येते

पावसाच्या विपुलतेमुळे घनदाट जंगलांनी पुष्कळ भाग व्यापलेला आहे. गारो पर्वतराजीत तर इतकी घनदाट जंगले आहेत की हिंस्र श्वापदांनाही ती पार करता येत नाहीत आसाम आणि मेघालय दोन्ही राज्यांत डासांचा फार उपद्रव आहे. मलेरियाचा प्रसारही पुष्कळ आहे.

मेघालयातील लोक निसर्ग फारसा बदलू शकत नाहीत म्हणून त्यांनी आपली मने निसर्गास अनुकूल अशी बदलली आहेत जंगली जनावर निर्दोष व्यक्तीला कधीही अपाय करीत नाही एखाद्या माणसाला वाघाने खाल्ले तर त्या माणसाला त्याच्या पापाची शिक्षा मिळाली असे ते मानतात. एखादा मनुष्य पाण्यात बुडून मरण पावला तर त्यांना वाटते की कोण्या जलपरीचे त्याच्यावर प्रेम बसले म्हणून तिने त्याचा आत्मा काढून नेला व शरीर मागे ठेवले त्या आत्म्याशी ती विहार करते

प्राचीन काळी हे खासी लोक पुष्कळ प्रगत होते असे दिसते पहिला मुसलमान प्रवासी काजिम याने या प्रदेशाचे वर्णन केले आहे तेथील रसीली फळे, तांब्याच्या वस्तु, रेशमी वस्त्रे तयार करण्याची कला, बंदुकीची दारू तयार करण्याचे शास्त्र, चीनशी त्याचा होत असलेला व्यापार इत्यादींचे त्याने वर्णन केले आहे खासी लोकांची स्वत.ची टाकसाळ होती असेही तो म्हणतो

खासी आणि गारो या जाती जरी वेगळ्या असल्या तरी जातीय भेदभाव नाहीत. सामाजिक भेदभाव मात्र आहेत.

[illegible] आहेत. गाल चेहरा, मस्तक चपटे, नाक रुंद आणि डोळे बारीक वर्ण पिवळसर आणि उंची बेताची जमीन प्रत्येकापाशी असते. येथे जमीनदार नाहीत शोषणकर्ते नाहीत आणि दारुगुत्त्याचे ठेकेदार नाहीत. नाच, गायन, मद्यपान आणि मांसाशन यांची या लोकांना फार आवड आहे पानसुपारी आणि तंबाखू खाणे यांना फार आवडते पाहुण्यांचे स्वागत मद्य आणि पानतंबाखू देऊन करतात. सुपारीला [illegible]

## मातृनिष्ठ समाज

' स्त्रीपासून जाती बनतात ' अशी या लोकात एक म्हण आहे संपूर्ण मेघालयात आज मातृसत्ताक समाज आहे घराची व्यवस्था आणि उत्तराधिकार मातृपक्षाला मिळतात स्त्री ही घराची आणि संपत्तीची देखभाल करते पुरुष सल्लागार व मदतनीस म्हणून काम करतात स्त्रीसत्ताक पद्धती ब्रह्मदेशातून येथे आली असावी.

विवाह झाल्यानंतर वधू सासरी जात नाही वरच सासुरवाडीस येऊन राहतो एक दोन मुले होईपर्यंत तो सासुरवाडीस राहतो व नंतर वेगळा संसार थाटू शकतो जयन्तिया जमातीत वर सासुरवाडीस राहावयास जात नाही केवळ रात्री वस्तीला जातो गारो जमातीत मामाच्या मुलीशीच मुलाचा विवाह होतो लहान बहिणीशी विवाह ठरला व वडील बहीण अविवाहित असली तर प्रथम तिच्याशी विवाह करावा लागतो.

गारो जमातीत सासरा मरण पावला तर जावयाला सासूशी विवाह करावा लागतो तसेच पत्नीच्या घरातल्या इतर विधवाही त्याच्या पत्नी बनतात. आजकाल थोडा दंड भरून सासूबाई आपल्या जावयाशी विवाह करणे टाळू शकतात बहुपत्नीत्व जरी रूढ असले तरी बहुपतित्व मात्र मान्य नाही घटस्फोट घेण्याची मुभा असते

[illegible]नंतर तिची संपत्ती सर्वात धाकट्या मुलीला मिळते. मामा सल्लागार आणि उत्तराधिकारी बनतो

## पर्वतांची राणी शीलाँग

मेघालयाची राजधानी शीलाँग हे अतिशय सुंदर आणि निसर्गरमणीय शहर आहे शीलाँगला छोटासा भारत असेही म्हणतात. कारण भारतातील सर्व राज्यांचे लोक येथे दृष्टीला पडतात.

गोहाटीपासून शीलाँग १०४ कि मी अंतरावर आहे. उत्तम डांबरी रस्ता आहे बसने ३–३॥ तास लागतात. शीलाँग ही भारतातली पाचापैकी एक अशी राजधानी आहे की जेथे आगगाडी जात नाही जवळजवळ सर्व रस्ता वळणावळणांचा आणि चढाचा आहे पण कोठेही धोक्याचा नाही. रस्त्याची

वस्तुमाल सतत दळणवळण चालू असते. रस्त्याची रुंदीही चांगली आहे. शीलाँगला जाताना रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षाच्छादित हिरवेगार डोंगर दिसतात. डोंगर उतारावर बांबू, केळी आणि पोफळी यांची लागवड मोठ्या प्रमाणा- दिसते. काही डोंगर उतारावर पायऱ्या पायऱ्यांची भातशेतीही आढळते. जसजसे वर जावे तसतशा वृक्षांच्या जाती बदलतात.

बहुतेक खेड्यातून बांबूची घरे दिसतात. बांबूच्या भिंती मातीने लिंपलेल्या असतात आणि वर गवताचे छप्पर असते. काही झोपड्या बांबूच्या जाड वाशावर आधारलेल्या आढळतात. वाटेत नाँगपोह हा एकच थांबा आहे. येथे चहा फराळाची आणि फळांची दुकाने आहेत. पेरू, पोपया, चकरचंद, केळी आणि विशेषत: अननस ही फळे स्वस्त मिळतात.

नाँगपोह सोडल्यावर 'बडा पानी' नावाचे सुंदर सरोवर दिसते. या सरोवराची रुंदी थोडी पण लांबी मात्र कित्येक कि. मी. आहे. त्यामुळे ही एक नदीच असावी असे वाटते. शीलाँग जवळ येऊ लागले की जंगले अधिक घनदाट होऊ लागतात आणि चेड, पाइन, साग इत्यादी सरळसोट वृक्ष कवायतीच्या तयारीत उभ्या राहिलेल्या सैनिकाप्रमाणे दिसतात.

शीलाँगमध्ये प्रवेश करताच आपण एखाद्या स्वप्ननगरीत प्रवेश केल्या- सारखे वाटते. जिथे जिथे सपाटी आहे तेथे पाचूसारखी हिरवळ आढळते. इतरत्र चीड व पाइनचे वृक्षराज खडी ताजीम देण्यासाठी उभे. हवा अत्यंत उत्साहवर्धक, आनंददायी आणि प्रदूषणरहित व स्वच्छ. सभोवार निळे पहाड. गोहाटीसारख्या बकाल शहरातून आलेल्या माणसाला शीलाँग ही स्वप्ननगरीच वाटल्यास आश्चर्य ते कोणते ? शीलाँगमध्ये झोपड्या आहेत. तशी पक्की बांधलेली घरेही आहेत. आधुनिक पद्धतीचा पोषाख केलेले स्त्री पुरुष दिसतात तसे रंगीबेरंगी परंपरागत पोषाख केलेले खासी व गारो स्त्री पुरुषही दिसतात. थंड हवेमुळे रसरशीत दिसणारी गणवेषातील शाळकरी मुले व मुली पाहून फार बरे वाटते. पाठीवरील ओझ्यामुळे वाकून चालणारे पण आरोग्यसंपन्न आणि समाधानी आदिवासीही दिसतात.

शीलाँगच्या मध्यभागाला 'पुलीसबझार' म्हणतात. या भागात प्रमुख सरकारी कचेऱ्या, सचिवालय, विधानसभा, सेंट्रल लायब्ररी आणि

पोलीस चौकी आहे लाबान मोहल्ला हा भाग आसामी संस्कृतीचे केंद्र आहे. लायटमुखरा भागात आसामचे महान संत शंकरदेव यांच्या स्मरणार्थ स्थापिलेले शंकरदेव विद्यालय आहे

विष्णपूर हा नवीनच वसविलेला भाग आहे बांगलादेशातून निर्वासित होऊन आलेल्या बंगाली लोकांची पुनर्स्थापना येथे केलेली आहे

दक्षिणेकडील विभागात पोलो ग्राऊंड आणि गोल्फ लिंक–गोल्फ खेळण्याचे क्रीडांगण आहे पोलो ग्राउंडवर घोड्याच्या शर्यती होतात. क्रिकेटचे सामनेही होतात.

मेघालय विधान सभेपाशी विशाल बोटॅनिकल गार्डन आहे या वन-स्पतीशास्त्र उद्यानात भारतात होणारी बहुतेक सर्व प्रकारची झाडे आहेत. वनस्पतीशास्त्र विषयक संशोधन येथे चालते या उद्यानाच्या शेजारील रस्त्याच्या पलीकडे 'वॉर्ड लेक' नावाचा नालाकृती कृत्रिम तलाव आहे. तलावात हात हात लांबीचे विविध रंगाचे सुंदर मासे अगदी पाण्याच्या पृष्ठ भागाजवळ पोहत असलेले दिसतात तलावात नौका विहाराची सोय आहे तलावाबाहेर सुंदर सुंदर फुलझाडे आहेत आणि इतरत्र हिरवळ आहे. वन भोजनासाठी अगदी आदर्श असे हे ठिकाण आहे एका घरवजा पिंजऱ्यात मोठ्या आकाराच्या घुवडांचे एक जोडपे ठेवलेले आहे तलावाच्या आस-मतात बसल्यावर तेथून हालूच नये असे वाटते मुख्य प्रधानाचा अगदी छोटेखानी बंगला ह्याच भागात आहे तेथे एकच सैनिक रक्षक आढळला.

शीलाँगमध्ये सेंट मेरी चर्च नावाचे अत्यंत सुंदर व प्रेक्षणीय असे ख्रिस्ती प्रार्थना मंदिर आहे भव्य व देखणी इमारत, विशाल व सुसज्ज प्रार्थनागृह, कमालीची स्वच्छता व शांतता पाहून मन प्रसन्न होते प्रार्थना-गृहातील खिडक्यांना रंगी बेरंगी काचेची तावदाने आहेत ख्रिस्ताचा क्रूसा-वर चढवलेल्या स्थितीतला पुतळा, माता मेरीचा पुतळा, ख्रिस्त चरित्रातील प्रसंगाची उठावाची चित्रे, इतर तैलचित्रे, प्रार्थनेच्या वेळी वाजवावयाचा भला मोठा ऑर्गन इत्यादी गोष्टी प्रेक्षणीय आहेत सर्व धर्मांच्या लोकांना आत जाऊन हे चर्च पाहता येते

शीलाँगच्या आसमंतात अनेक धबधबे आहेत परंतु त्यांचे सौंदर्य

पाहण्यासाठी पावसाळ्यातच गेले पाहिजे आम्ही एकच धबधबा–एलेफंट फॉल्स पाहिला. परंत नोव्हेंबर महिना असल्यामुळे तो प्रेक्षणीय वाटला नाही. मोसमाई धबधब्यात ६०० मीटर उचीवरून पाणी कोसळते असे म्हणतात आम्ही तो पाहिला नाही शीलांगमध्ये स्वीट व्हॅली नावाचे ठिकाण आहे तेथून ५ कि मी. अतरावर स्वीट धबधबा आहे तो फारच सुदर दिसतो असे ऐकण्यात आले

शीलांगचा बडा बाजार पाहण्यासारखा आहे. विक्रीचे काम बहुतेक महिलाच करतात. मुले पाठीवर बाधलेल्या आणि डोक्यावर अवजड ओझे घेतलेल्या महिला आपापला माल विकण्यासाठी येतात. लोकरीचे तऱ्हेतऱ्हेचे स्वेटर व इतर कपडे येथे मिळतात व त्याचा खपही चांगला आहे.

चेरापुजी हा सयुक्त खाशी–गारो जिल्ह्याचा एक तहशील किंवा तालुका आहे. शीलांग ही राजधानी होण्यापूर्वी चेरापुंजी ही आसामची राजधानी होती शीलांग पासून चेरापुंजी ६० कि मी. दूर असून तेथे जाण्यासाठी सर्वांकार पक्की सडक आहे चेरापजी हे गाव जगातील सर्वात जास्त पावसाचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे वस्तुतः हे खरे नाही. चेरापुजी पासून तीन कि. मी अतरावर असलेल्या ' मोस्मीराम ' ह्या गावी चेरापुजी पेक्षा थोडा जास्त पाऊस पडतो आठ आठ दिवस एका क्षणाचीही विश्रांती न घेता मुसळधार पाऊस कोसळत असतो एका वर्षी येथे ३,००० सेंटीमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे.

शीलांग येथे आकाश नेहमीच अभ्राच्छादित असते कोठूनही वारे आले तरी ते बाष्पसमृद्ध असतात उच चढल्यामुळे ते थड होतात व त्यामुळे मेघ बनतात शीलांग हे भारतातले एक अति सुदर शहर आहे यात शंका नाही

क्र. २७२४६

## प्रकरण अकरावे

# नेफा किंवा अरूणाचल प्रदेश

ऑगस्ट १५, १९७५ रोजी अरूणाचल प्रदेश हे ५ लक्ष लोकसंख्येचे नवीन राज्य जन्मास आले. अरूणाचल प्रदेश म्हणजे उगवत्या सूर्याचा प्रदेश अरूणाचल प्रदेशाचे क्षेत्रफळ ८२,००० वर्ग कि मी आहे अरूणाचल प्रदेशालाच 'नेफा' ( नॉर्थ ईस्ट फ्रांटिअर एजन्सी ) म्हणत असत उत्तरेला तिबेटच्या पर्वतराजी, पश्चिमेला भूतान, दक्षिणेला ब्रह्मपुत्रा नदीचे खोरे आणि पूर्वेला ब्रह्मदेश आहे अरूणाचल प्रदेशात लहान मोठ्या ५० नद्या वाहतात म्हणून याला ५० नद्यांचा प्रदेश असेही म्हणतात अरूणाचल राज्यात पाच प्रमुख नद्या आहेत व त्यांचीच नावे पाच जिल्ह्यांना दिलेली कामेंग, सुबनसारी सीआंग लोहित आणि तिराप हे अरूणाचल प्रदेशाचे पाच जिल्हे. हारीने उभ्या असलेल्या उंच वृक्षांच्या घनदाट अरण्या-तून या नद्या वाहतात विविध रंगी फुलांनी या अरण्यांची शोभा अधिकच खुलते बघावे तिकडे डोंगरांच्या रांगाच रांगा दिसतात.

परशुरामाचा पराक्रम वडिलांच्या आज्ञेवरून परशुरामाने आपली आई रेणुका हिचा शिरच्छेद केला ही कथा सर्वांना परिचित आहे. मातृहत्येचे भयंकर पाप आपल्या हातून घडले याचे परशुरामाला मनस्वी दु.ख झाले पापक्षालन करील अशी नदी तो शोधीत होता अनेक घनदाट अरण्ये तुडवूनही त्याला अशी नदी सापडली नाही त्याने आपल्या धारदार परशूने एका ठिकाणी खडकावर सतत मारा सुरू केला आणि अखेर खडकातून पाण्याचा प्रचंड प्रवाह वाहू लागला त्याचाच पुढे ब्रह्मपुत्र नद झाला अशी दंतकथा आहे दंतकथा म्हणण्याचे कारण असे की ब्रह्मपुत्र नदीचा उगम तिबेटमध्ये आहे हे भौगोलिक सत्य आहे परशुरामाने हा पराक्रम लोहित जिल्ह्यात केला. ते स्थान आजही ब्रह्मकुंड किंवा परशुराम कुंड या

नावाने प्रसिद्ध आहे माघातल्या मकर संक्रांतीला स्नानासाठी तेथे हजारो यात्रेकरू आजही जातात आणि कुंडात स्नान करून पापमुक्त झाल्याचे समाधान मानतात, परशुरामाने या कुंडात स्नान केले आणि त्याचे मन शांत झाले अशी आख्यायिका आहे

कृष्णाची पट्टराणी रूक्मिणी हिचा पिता भीष्मक हा याच प्रदेशात राज्य करीत असे अशी समजूत आहे. तो मोठा पराक्रमी राजा होता. त्याच्या राजधानीचे नाव 'भीष्मक नगर' होते आणि ते कौटिल्याने सांगितलेल्या पद्धतीने बांधले होते अशी समजत आहे लोहित जिल्ह्यात इ. स १८४४ मध्ये कर्नल एस एफ हॅने यांनी केलेल्या उत्खननात एका अति प्राचीन किल्ल्याचा शोध लागला किल्ल्याचा विस्तार १५ वर्ग कि मी आहे किल्ल्यात १,८७० वर्ग मीटर क्षेत्रफळाचा राजवाडा होता पूर्वेला आणि पश्चिमेला मजबूत विटांची भली मोठी व देखणी प्रवेशद्वारे आहेत. नागालँडमधील दिमापूर शहरातील उत्खननात सापडलेल्या विटा, फरशा, भांडी आणि भीष्मकाच्या किल्ल्यात सापडलेल्या अशाच वस्तू यात बरेच साम्य आढळते प्राचीन रस्त्याचा शोध लागलेला आहे आणि या रस्त्याला 'रुक्मिणी आळी' असे आजही संबोधिले जाते. कालिका पुराण नावाच्या [illegible] कृष्ण या भागात [illegible] करीत असत असा उल्लेख आहे येथूनच कृष्णाने रूक्मिणीचे हरण केले आणि तिला द्वारकेला नेले अशी समजूत आहे भगवान शिव आणि पार्वती यांनीही या भागाला भेट दिली होती नदीचे एक पडके मंदिरही उत्खननात सापडले

या प्रदेशाला गेली अनेक शतके दरवर्षी नद्यांच्या पुरांना तोंड द्यावे लागत आहे इ स १८६३, १८९७ आणि १९५० या वर्षी प्रचंड भूकंप झाले १८६३ चा भूकंप अर्धा तास चालू होता असे म्हणतात. किती प्रचंड उलथा-पालथ झाली असेल याची सहज कल्पना करता येईल त्या काळात हल्लीसारखी मदत मिळण्याची अजिबात शक्यता नव्हती ईशान्य भारत हा अगदी अलीकडच्या काळापर्यंत भारतापासून वेगळा असल्यासारखाच होता. जवळ जवळ अज्ञातच होता

अश्मयुगातील दगडी हत्यारांचे अवशेष अरूणाचलात सापडले आहेत. यावरून अश्मयुगापासून येथे लोकवस्ती होती हे सिद्ध होते आजही हा प्रदेश मागासलेला आहे अजूनही पंच महाभूतांना देव मानण्याची प्रथा आहे येथील गिरीजनात अनेक टोळ्या आहेत व त्या आपापली वैशिष्टये सांभाळून आहेत शेती, शिकार आणि मासे मारणे हे मुख्य व्यवसाय आहेत. शेती जुन्या पद्धतीने चालते. तांदूळ हे मुख्य पीक मका आणि ज्वारी थोडया प्रमाणात पिकवतात प्रत्येक टोळीतील लोकांच्या पोशाखात थोडा थोडा फरक असतो. काही पंचावरही भागवतात स्त्रिया परकर नेसतात आणि अंगावर शालीसारखे उत्तरीय घेतात गवताचे रेनकोट वापरण्याची पद्धत आहे. दागिन्यांची आवड स्त्रियात आहेच. कवडया, मणी, हाडापासून बनविलेल्या बांगडया हे यांचे मुख्य दागिने वाहतुकीची सोय होईल तशी त्यांची राहणी बदलू लागेल रस्ते घडविण्याचे काम जोरात चालू आहे आणि मोटार गाडया हळूहळू या प्रदेशात संचार करू लागल्या आहेत. हेलीकॉप्टरनेही वाहतूक होऊ लागली आहे प्रदेश अतिशय डोंगराळ आणि दऱ्याखोऱ्यांचा असल्यामुळे रस्ते बनविणे फार कष्टाचे व खर्चाचे होत आहे. अरूणाचल प्रदेश भारताचे घटक राज्य बनविल्यामुळे केंद्र सरकारच्या मदतीने व मार्गदर्शनाने वेगाने प्रगती होईल अशी अपेक्षा आहे. अरूणाचला-तल्या लोकांच्या टोळ्या पूर्वीपासूनच लोकशाही पद्धतीने आपला कारभार चालवीत असल्यामुळे भारतीय लोकशाही आत्मसात करण्यास त्यांना वेळ लागणार नाही.

ग्रामोद्योगांना या पर्वतीय राज्यात पुष्कळ वाव आहे सूत कताई, विणकाम, शिवणकाम, लाकडाच्या कलाकुसरीच्या वस्तू बनविणे, बांबूकाम व वेतकाम, गालिचे विणणे इत्यादी अनेक लहान उद्योगधंदे या भागात घरोघर चालू शकतील जे चालू आहेत ते सुधारू शकतील आणि त्यांना बाहेरची बाजारपेठ मिळू शकेल पाहणी केल्यावर खनिज संपत्तीचाही शोध लागू शकेल. विपुल जंगल संपत्तीच्या आधारे कागद तयार करण्यासारखे उद्योगधंदे निघण्याची शक्यता आहे

इतर गिरीजनांप्रमाणे अरूणाचल प्रदेशातील लोक नाच गाण्याचे फार

शौकीन आहेत मक्यापासून बनविलेले मद्य नाच गाण्याच्या वेळी बांबूच्या भांड्यातून आवडीने घेतले जाते काही नाच चित्र विचित्र रंगाचे मुखवटे घालून करतात नाच गाण्यात बेभान होणे हाच त्यांचा सांस्कृतिक आनंद. आपण पांढरपेशे लोक नाचायला लाजतो आणि मोठ्या आनंदाला मुकतो. नाचण्यामुळे अंगी एक लयबद्धता येते असे वाटते. स्त्री पुरुष एकत्र नाच करतात शरीराला व्यायाम होतो तो निराळाच

अरुणाचलमधील लोक साधे, स्वाभीमानी, भारदस्त वागणारे आणि आपल्या भूमीवर प्रेम करणारे खरेखुरे भूमिपुत्र आहेत तथाकथित सुधारका-प्रमाणे आत एक बाहेर एक असे त्यांच्यात नाही जीवनाबद्दल त्यांना प्रेम आहे, जिद्द आहे, तृप्ती आहे म्हणूनच ते मुक्तपणे नाचू व गाऊ शकतात परमेश्वरावर त्याची श्रद्धा आहे. सूर्य आणि चंद्र परमेश्वराने निर्माण केले आणि हे दोन सेवक निष्ठेने आणि नेकीने त्याची अखंडपणे सेवा करीत असतात काही कल्याणकारी आणि काही विध्वंसक अमूर्त शक्ती मानवाच्या जीवनाचे नियंत्रण करतात असे ते मानतात पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास आहे त्यांना मंदिरांची अथवा पवित्र स्थळांची जीवनात आवश्यकता वाटत नाही काही भागात शिवभक्तीचा प्रसार झाला आहे व तेथे तुरळक शिवमंदिरे आहेत

विविध प्रकारची व रंगाची ऑर्चिड नावाची सुंदर फुले ईशान्य भारतातील सर्व राज्यात विपुल प्रमाणात आढळतात, फुलांचे हार आणि गजरे अतिशय लोकप्रिय अलंकार आहेत पुष्कळशी ऑर्चिडचे गुच्छ कानावर मिरवतात

[illegible] नावाच्या फ्रेंच धर्मोपदेशकाने इ स १८५३ मध्ये सीआंग जिल्ह्याला भेट दिली तो म्हणतो, 'लोक कायदे करतात, जनतामंडळ त्यांना मंजूरी देते आणि टोळी प्रमुख त्यांची अंमलबजावणी करतो. दररोज सायंकाळी सर्व पुरुष एकत्र जमतात प्रत्येकजण दिवसभरात आपण काय काय पाहिले व ऐकले ते सांगतो एखाद्याने काही प्रश्न पुढे मांडल्यास त्यावर चर्चा होते, दुसऱ्या दिवशीचा खेड्याने करावयाच्या कामाचा तपशील ठरविला जातो. बहुमताने तो पक्का केला जातो.' क्रेहिड क्रॉट नावाच्या

इंग्रजाने इ. स. १८२५ मध्ये या भागात संचार केला होता त्या काळी घनदाट जंगले असलेल्या, रस्ते नसलेल्या या डोंगराळ भागात किती कष्टाने या लोकांनी प्रवास केला असेल याची कल्पना करता येईल. सर्व प्रवास पायी करावयाचा, लोक अगदी परके आणि भिन्न वंशाचे आणि भाषेचा गंध नाही अशी परिस्थिती ! पण पाश्चात्य मिशनरी लोक जिद्दीचे आणि ध्येयवादी हेच खरे अरुणाचल प्रदेशातील लोक मंगोल वंशाचे. तिबेटी चिनी आणि बर्मी लोकांचे संकर होऊन येथील जनता बनलेली आहे. ईशान्य भारतात सर्वत्र हीच स्थिती आढळते

## अरुणाचल प्रदेशाची राजधानी 'इटानगर'

ही तात्पुरती किंवा हंगामी राजधानी नुकतीच बसविलेली आहे जंगल तोडून ही राजधानी इ स १९७३ मध्ये निर्माण करण्यास प्रारंभ झाला व तिची प्रगती वेगाने सुरू आहे. मे १९७४ मध्ये सरकारी अधिकारी तेथे जाऊन राहू लागले जुलै १९७४ मध्ये २०० मुलांची शाळा सुरु झाली आणि स्टेट बँकेची शाखा सुरू झाली. ऑगस्ट १९७४ मध्ये ऐन पावसाळ्यात पूर आलेला ब्रह्मपुत्र ओलांडून राज्याचे मुख्य सचिव ८० लक्ष रुपयांची रोकड स्टेट बँकेसाठी घेऊन गेले सिनेमागृह निर्माण झाले बाजार रहाट सुरू झाला स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकौशल्याच्या वस्तूंना भारतीय जवानांकडून आणि कर्मचाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळतो शाली, रेशमी कापड, लाकूड, बांबू आणि वेत यापासून बनविलेल्या विविध रंगाने नटविलेल्या शोभेच्या व उपयोगाच्या वस्तू बाजारात मिळतात तऱ्हे-तऱ्हेची फुले सर्वांचे लक्ष वेधून घेतात. विकासाची कामे वेगाने पार पाडण्याचे काम चालू आहे आणि स्थानिक जनतेचे उत्तम सहकार्य मिळत आहे आपल्या जीवनात काहीतरी मोठा आणि आपला विकास घडविणारा, आपले शारीरिक कष्ट कमी करणारा बदल होऊ घातला आहे असा विश्वास उत्पन्न झाला आहे.

---

## प्रकरण बारावे

# सिक्कीम

सिकीम १९७५ मध्ये भारताचे बावीसावे घटकराज्य बनले आणि तेथील वंशपरंपरागत राजेशाही ( चोग्याल शाही ) नष्ट करण्यात आली. सिक्कीम हे नाव शिजिन् ( तुरा असलेला ) या शब्दाचा अपभ्रंश होऊन बनले आहे असे काही मानतात. सिक्कीमचे तिबेटी नाव डेनझाँग आहे व त्याचा अर्थ तांदुळाचे खोरे किंवा कोठार असा आहे सबंध सिक्कीममध्ये एक किमी लांबीचीही अगदी सपाट भूमी नाही पूर्व हिमालयाच्या कुशीत असलेले सिक्कीम हे पूर्णतया पर्वतीय राज्य आहे

सिक्कीमच्या उत्तरेला तिबेटच्या विशाल पठाराचा भाग आहे. पश्चिमेला नेपाळचे सार्वभौम राष्ट्र आहे. पूर्वेला सार्वभौम भूतान आहे आणि दक्षिणेला भारत आहे. सिक्कीमचे क्षेत्रफळ ७,००० चौ कि मी असून, लोकसंख्या १,७२,००० आहे दक्षिणोत्तर लांबी ११२.६५ कि मी आणि पूर्व पश्चिम लांबी अंदाजे ६५ कि मी. आहे समुद्र सपाटीपासून सर्वात जास्त उंची ८,५३४ मीटर आहे आणि पायथ्याची उंची २४४ मीटर आहे. शे. ९० लोकसंख्या खेड्यात राहणारी व सांपत्तिक दृष्ट्या गरीब आहे.

सिकीमची जनता मूलत: लेपचा जमातीची आणि मंगोल वंशाची. लेपचा हे शांतता प्रेमी स्वच्छंदी लोक. स्त्रिया नाजूक आणि देखण्या व मर्यादशील. १३ व्या शतकात तिबेटातून भोटिया लोक येथे आले या दोन्ही जमाती बौद्ध धर्मी होत्या आणि अजूनही आहेत. गेल्या शतकात बहुपत्नीक नेपाळी लोकांना सिकीममध्ये जाऊन तेथे स्थायिक होण्यास उत्तेजन देण्यात आले. नेपाळी लोक धर्माने हिंदू त्यांची संख्या वाढता वाढता इतकी वाढली की आता लेपचा आणि भोटिया हे अल्पसंख्य झाले आहेत.

सिकीम राज्यातील हिमालयाचा भाग आपल्या भव्यतेबद्दल, दिव्यतेबद्दल आणि सौंदर्याबद्दल फार प्रसिद्ध आहे जगात उंचीने तिसऱ्या क्रमाकाचे असलेले कांचनगंगा हे हिमालयाचे ८,५९१ मीटर उंचीचे शिखर

सिकीममध्ये आहे हे शिखर कायमचे बर्फाच्छादित असते अद्याप ते अजिंक्य राहिलेले आहे १९३० आणि १९५५ मध्ये हे शिखर पादाक्रांत करण्याचा प्रयत्न पाश्चात्य गिर्यारोहकांनी केला १९५५ मध्ये केलेल्या प्रयत्नात गिर्यारोहक शिखराच्या अगदी जवळ गेले होते पण शिखरावर गेले नाहीत. तुकडीचे नेते चार्लस इव्हॅन्स म्हणतात, " सिकीमच्या जनतेच्या धार्मिक भावनांचा आदर करण्यासाठी आम्ही पुढे गेलो नाही " सिकीमच्या जनतेची अशी श्रद्धा आहे की त्याचा देव शिखरावर राहतो आणि त्याने शिखराभोवती एक मर्यादा घालून दिली आहे ती मर्यादा ओलांडून कोणीही पुढे जाता कामा नये असा त्याचा आदेश आहे एव्हरेस्ट विजेता एडमंड हिलरी म्हणतो की एव्हरेस्ट चढून जाण्यापेक्षा कांचनगंगा चढून जाणे अधिक अवघड आहे

कांचन गंगा शिखरावर राहणारा हा देव तांबड्या तोंडाचा आणि भयानक चेहऱ्याचा असून त्याचा किरीट पाच मानवी कवट्याचा बनलेला आहे. त्याचे वाहन हिमधवल सिंह असून देवाच्या हातात विजयाचे निशाण आहे. प्रचंड पूर आणि बर्फाचे भयानक कडे याचा मारा करून तो मानव जातीचा नाश करू शकतो कांचनगंगा शिखर पाच शिखरांचे बनलेले आहे ही पाच शिखरे म्हणजे पाच खजीने आहेत असे ते मानतात. मीठ, पवित्र रत्ने आणि धातु, धार्मिक लेख, औषधे आणि धान्य आणि अजिंक्य ढाली यांचे हे खजीने आहेत ही पाच शिखरे म्हणजे देवाच्या सिंहासनाचे पाच आधार होत. उन्हात ही शिखरे अतिशय सुंदर दिसतात. जणू सोन्याची बनविलेली आहेत असे वाटते यावरून वरील कल्पना केलेल्या असाव्यात. गेल्यावर्षी कांचनगंगा शिखर जिंकले गेले.

सिकीममधील हिमालयाच्या भाग हिमाच्छादित शिखरांनी, वैडूर्य या नीलवर्ण रत्नासारख्या पाण्याच्या सरोवरांनी व नद्या ओढ्यांनी, दऱ्या खोऱ्यांनी भयानक खिंडीनी, घनदाट जंगलांनी भरलेला आहे. सिकीममधील मुख्य नदी 'तीस्ता' ही आहे. या नदीचे खोरे अतिशय सुंदर व विस्तृत आहे. सिकीममध्ये अनेक बुद्धमंदिरे, मठ व स्तूप आहेत. प्रत्येक पवित्र स्थानाजवळ विशिष्ट पद्धतीची निशाणे फडकत असतात. ती धर्मसूचक

असतात मंदिरात राहणाऱ्या पूजाऱ्यांना लामा म्हणतात लामा लोक आपला बहुतेक वेळ जप करण्यात आणि मंदिराची देखभाल करण्यात घालवतात त्यांची राहणी साधी असते आणि ते बौद्ध धर्माची तत्वे आपआपल्या कुवतीनुसार आचरणात आणीत असतात. लामांचे मठ अतिशय स्वच्छ आणि शांत असतात.

## सिक्किमचा इतिहास

सिक्कीममध्ये वंशपरंपरागत राजेशाही होती. तेथील राजाला चोग्याल असे म्हणत [illegible]

वर चालून आले आणि त्यांनी सिक्कीमचा तराई भाग जिंकून घेतला इस्ट इंडिया कंपनीला नेपाळचे हे अतिक्रमण आवडले नाही तिने इ. स. १८१४ मधे सिक्कीम पुन्हा जिंकुन घेतले आणि चोग्याल पुन्हा राजे झाले. अगदी अलीकडे म्हणजे १९५५ मधे सिक्कीममध्ये कायदे मंडळाची स्थापना झाली आणि लोकशाहीचा पाया घातला गेला त्यावेळचे युवराज अमेरिकेत शिक्षण घेत होते त्यांनी एका श्रीमंत अमेरिकन तरुणीशी इ स १९६० मध्ये सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे बौद्ध पद्धतीने विवाह केला परंतु लोकांना हा विवाह काही मनापासून आवडला नाही व चोग्याल राजवंशाबद्दल लोकांच्या मनात अप्रीती उत्पन्न झाली. हे युवराज नामग्याल वडिलांच्या मृत्यूनंतर राजे झाले आणि अमेरिकन राणीच्या हातातले बाहुले बनले हे लोकांना आवडले नाही. त्यांनी आम्हाला चोग्याल नकोत [illegible] त्याच स्वतंत्र राज्य करावे अशी

मागणी केली. राजवाड्यापुढे प्रचंड निदर्शने झाली आणि भारताला मध्ये पडून चोग्याल यांची राजसत्ता नष्ट करावी लागली. आता पूर्वीचे चोग्याल एक सधन सामान्य नागरिक बनले आहेत. राजवाड्यात राहतात पण सत्ता काही नाही. नुकताच त्यांनी झोपेच्या जास्त गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला बेशुद्ध अवस्थेतच त्यांना कलकत्याला आणण्यात आले पण सुदैवाने ते त्यातून वाचले. ते तरुण आहेत. अमेरिकन सुंदरी त्यांची पत्नी आहे, श्रीमंती आहे परंतु राजपद गेल्याचे त्यांना फार दुःख झाले असावे असे वाटते. क्वचित त्यांचे [illegible]

कारण राणी म्हणून मिरवणाऱ्या तरुणीला सामान्य स्त्रीचे जीवन जगावे लागत आहे आता सिक्कीम हे भारताचे एक राज्य असून तेथे कायदे मंडळ स्थापन झाले आहे जिगमे ल्हेंडुप दोरजी हे सिक्कीमचे पहिले मुख्य प्रधान म्हणुन काम करीत आहेत चोग्यालचे ते जवळचे नातेवाईक आहेत राज-घराण्यातील आहेत परंतु त्यांना लोकशाहीचे प्रेम आहे असे दिसते. पश्चिम बंगालमधील, सिलीगुरी, आणि न्यू जलपायीगुरी या दोन अगदी एकमेकांजवळ असलेल्या मोठ्या रेल्वे स्थानकापासून सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे जाण्यासाठी बसेस मिळतात हा रस्ता अतिशय चांगला आहे आणि १२० कि मी अंतर जाऊन चार तासात आपण सिक्कीमची राज-धानी गंगटोक येथे पोहोचतो वाटेत रोंगफू आणि सिंगटम ही दोन महत्त्वाची शहरे लागतात रोंगफू हे सिक्कीमच्या सिमेवरच आहे या प्रवासात सिक्की-मची सुप्रसिद्ध तीस्ता नदी आपली सतत सोबत करते हा सगळा रस्ता चढाचा आहे आणि जसजसे उंच जावे तसतशी वनश्री बदलत जाते रस्त्याच्या बाजूला घनदाट जंगले दिसतात व डोळे सुखावतात आम्ही गेलो तेव्हा नदीला फारसे पाणी नव्हते पण जोराचा खळखळाट मात्र ऐकू येत होता. कारण उतार असल्यामुळे पाण्याला वेग असतो सिक्कीमला तीस्ताचे खोरे असेच म्हणतात तीस्ता नदीवर अनेक छोटेछोटे पूल आहेत ती कधी आपल्या उजवीकडे तर कधी डावीकडे अशी दिसत राहते रोंगपू या शहरा-मध्ये मद्य तयार करण्याचा मोठा कारखाना आहे आणि अनेक प्रकारची उंची दारू तयार होते. या भागात अतोनात संत्री होतात व त्यापासून ही दारू तयार होते

बसच्या रस्त्यावर ठिकठिकाणी सत्र्यांची दुकाने दिसतात. संत्री आकाराने लहान पण चवीला गोड व स्वस्त मिळत. सिंगटम या गावी फळे टिकविण्याचा मोठा कारखाना आहे तेथेच सर्व सिक्कीमला वीज पुरवणारे बिजली घर आहे. कुक्कुटपालन हा व्यवसायही सिक्कीममध्ये मोठा प्रमाणा-वर चालतो राजधानी गंगटोक जवळ आली आहे याचा प्रथम बोध होत नाही कारण ती चढाच्या आड दडलेली असते. आपण जवळ पोहोचलो

म्हणजे ती एकदम दृष्टीस पडते आणि प्रवास संपला या जाणीवेने प्रवाशाला बरे वाटते

## गंगटोक

गंगटोक हे एक डोंगर उतारावर बसलेले फार सुंदर शहर आहे. शहराचा मुख्य भाग उंच सखल अशा पठाराने बनलेला आहे ज्या ठिकाणी गंगटोकचा बाजार आहे. तेथे थोडा भाग सपाटीचा आहे. सिक्कीममधली घरे बाहेरून मोठी सुंदर दिसतात कारण घरांच्या पुढच्या भागावर रंगी-बेरंगी नक्षी करण्याची तेथील लोकांना आवड आहे. [illegible]

सपाटीपासून १७६७ मीटर आहे त्यामुळे हवा चांगलीच थंड असते गंगटोक येथील बौध्दमठ बांधण्यासाठी इ. स १७१६ मध्ये गंगटोकची टेकडी पाडून जागा साफ केली आणि मठ बांधला असे इतिहासात नमूद आहे. काही घरांची छपरे पॅगोडा नावाच्या बह्मी मंदिरासारखी असतात. गंगटोकच्या बाजारात इम्पोरटेड मालाची चलती आढळली. गंगटोकमधे पाहावयाचे म्हणजे निसर्ग सौंदर्य. टुमदार व नक्षीदार घरे, हिरवेगार दृश्य, लांबवर दिसणारी बर्फाची शिखरे व त्यांना वेढणारे धुके, डोंगरशिखराच्याही खाली [illegible]

### प्रेक्षणीय स्थळे

(१) सुक्लखाग : राजघराण्याचे पूजामंदिर हे मंदिर राजवाड्या-च्या आवारातच आहे. याच पूजामंदिरात महत्वाचे धार्मिक समारंभ होतात राज्यारोहणसमारंभ, विवाह समारंभ, मंत्रिमंडळाचे शपथविधी येथेच साजरे होतात लोण्याचा नंदादीप तेवत असतो आणि धूपाचा सुवास दरवळत असतो मंदिराच्या चारी कोपऱ्यांना हिमसिंहाचे भलेमोठे लाकडी डोके दिसते. बुद्धवाङ्मयाचा भला मोठा संग्रह येथे आहे भिंतीवर बुद्धाच्या [illegible] बुद्धधर्म हा सिक्कीमचा राष्ट्रधर्म आहे.

(२) दुलदुल चोटान आणि संग क्लब चोटान ही स्तूपांची नावे आहेत व दोन्ही स्तूप देवराली बाजारजवळ आहेत यातला पहिला भगवान बुद्धाच्या स्मरणार्थ बांधलेला आहे आणि दुसरा बुद्धाचा आधुनिक शिष्योत्तम

'ख्लशिक' याच्या स्मरणार्थ बांधलेला. ख्लशिक हा बौद्ध वाङ्मयाचा गाढा अभ्यासक आणि उत्कृष्ट प्रवचनकार होता इ. स. १९५८ मध्ये त्याचे निर्वाण झाले

(३) नामग्याल इन्स्टिटयूट ऑफ टिबेटॉलजी तिबेटी भाषेतील महायान बौद्धधर्म विषयक वाङमयाचा अभ्यास व संशोधन करणारी ही जगातील सर्वात मोठी संस्था आहे ओक,अॅश आणि बर्च या देखण्या वृक्षांच्या सुंदर अरण्यात ही संस्था आहे लाकडावरील कोरीव काम आणि भव्य भित्तिचित्रे (mural painting) प्रेक्षणीय आहेत मंदिरात बुद्धाच्या, बोधिसत्वाच्या आणि तांत्रिक देवताच्या मूर्ती आहेत २८००० पोथ्या, भाषांतरे आणि भूर्जपत्रे कपाटातून सरक्षिलेली आहेत

---

## प्रकरण तेरावे

### भूतान

भारताचे दोन शेजारी पर्वतीय देश नेपाळ व भूतान. हे दोन देश नेहमीच स्वतंत्र व सार्वभौम राहिलेले आहेव ते एकदा पाहावे अशी मनात प्रबळ इच्छा होती पशुपतीच्या यात्रेच्या निमित्ताने नेपाळ पाहिला होता; पण भूतान पाहण्याचा योग ईशान्य भारताच्या प्रवासाच्यावेळी नोव्हेंबर १९७६ मध्ये आला

सर्वस्वी हिमालयाच्या कुशीत असलेला हा देश १८००० चौ. मैल किंवा ४५००० चौ कि मी क्षेत्रफळाचा आहे हा देश हिमालयाचे हृदय म्हणता येईल असा आहे. हजारो वर्षे जगापासून तुटलेला हा देश गेली फक्त ५०–७५ वर्षे हिंदुस्थानातील लोकांशी संबंध ठेवून आहे

भूतानी लोकांचा तिरदाजी हा राष्ट्रीय खेळ आहे. नाच आणि गाणी ही त्यांची राष्ट्रीय करमणूक आणि आदरातिथ्य हा राष्ट्रीय स्थायीभाव

आहे. नाचाच्या वेळी भूतानी लोक भयानक दिसणारे मुखवटे घालतात. भूतानी लोकाना विविध रंगांची फार आवड, आणि याचे कारण त्यांच्या भोवती उमलणारी विविध रंगी फुल हे असावे.

उत्तरेला हिमाच्छादित पर्वतशिखरे व त्यांच्या पलीकडे तिबेट, पश्चिमेला सिकीमचे राज्य, पूर्वेला नवीनच निर्माण केलेला भारताचा अरुणाचल प्रदेश आणि दक्षिणेला घनदाट अरण्यानी व्यापलेला हिमालयाचा पायथा व त्याला लागून असलेला भारत देश, अशा भूतानच्या चतुःसीमा आहेत

भूतानी लोक बौद्धधर्मी आहेत. अनेक लहानमोठे बौद्धमठ भूतान-मध्ये आहेत व तेथे लामांच्या प्रार्थनेची कुजबूज सतत ऐकू येते बौद्धधर्मी असले तरी भूतानी लोकांना मांसाहार वर्ज्य नाही, ‘अहिंसा परमो धर्म.’ असे मानणाऱ्या बौद्ध धर्माला हे विसंगत नाही का असे एका तरुणाला विचारले असता तो म्हणाला, “ आम्ही स्वत प्राणी मारीत नाही इतरांनी मारलेल्या प्राण्यांचे मास आम्ही खातो.” डोंगरदऱ्यानी व्यापलेल्या या अतिशय थंडीच्या प्रदेशात मांसाहार अटळ असावा तीच गोष्ट मद्यपानाची. थिंपू या राजधानीत साध्या व उंची मद्याची दुकाने आढळली व त्यांना लोकाश्रयही बरा आढळला.

भूतानी लोक आनंदी, हसतमुख, मोकळ्या मनाचे आणि आतिथ्य-शील आहेत. भाषेची अडचण भासते, कारण त्याना हिंदी येत नाही. इंग्रजी बोलणारा माणूस भेटला तर तो मोकळेपणाने बोलतो व माहिती पुरवितो. जगातील घडामोडींसबधी त्यांना फारसे माहीत नसते बाह्यजगाशी त्यांचा फारसा सबधच येत नसावा शिक्षणाचे प्रमाण कमी आहे ख्रिस्ती मिशन-ऱ्यांचा भूतानमध्ये प्रवेश झाला नाही. हे त्याच्या अलिप्तपणाचे एक कारण असावे. परदेशी प्रवासी एवढाच त्यांचा परदेशाशी येणारा सबध भूतानचा ४० किलोमीटर रुंदीचा उत्तर भाग सडकाळ अतिशय थंडीचा व हिमाच्छादित शिखराचा भाग असल्यामुळे कायम वास्तव्याला अनुकूल नाही. दक्षिणेकडील ४८ किलोमीटर रुंदीचा भाग घनदाट अरण्याने व्यापलेला व अतिशय पावसाचा भाग असल्यामुळे विरळ वस्तीचाच भाग

आहे मध्यभाग ६४ किलोमीटर रुंदीचा व डोंगराळ आहे, पण पाऊस बेताचा, डोंगराची उंची ३००० मीटरच्या आसपास व चढ उतार सौम्य आहेत भूतानची बहुसंख्य जनता या मध्यभागातच राहते. पुनाखा हा सुंदर प्रदेश आणि पारो व थिंपू या नद्यांची सुंदर खोरी या भागातच आहेत. पुनाखा हे शहर भूतानची जुनी राजधानी पारो शहर ही भूतानची व्यापारी राजधानी व थिंपू ही नवीन राजधानी. ही तीनही शहरे अतिशय सुंदर आहेत, निसर्गसौंदर्याने नटलेली, प्रदूषणरहित, आरोग्यदायक, थंड हवा-मानाची ठिकाणेच जणू

भूतानचे प्रवेशद्वार म्हणजे ( Phuntsoling ) फुन्सोलिंग हे शहर. पश्चिम बंगालमधील प्रसिद्ध रेल्वेस्थानक न्यू जलपाइगुरी येथून फुन्सो-लिंगला जाण्यासाठी बरेच मिळतात साडे तीन-चार तासांनी आपण फुन्सोलिंगला पोहोचतो हे शहर लहानसेच आहे पण हॉटेले पुष्कळ आहेत. येथे एक सुंदर व भव्य प्रवेशद्वार आहे ते भारत भूतान सरहद्दीवर आहे फुन्सोलिंग शहराचा काही भाग भारतात पश्चिम बंगालमध्ये व काही भाग भूतानमध्ये आहे प्रवेशद्वारात एक पाटी आहे तिचा भारताच्या बाजूला मजकूर आहे You are leaving India, au revoir तुम्ही भारताबाहेर जात आहात शुभास्ते पन्थाना सन्तु। पाटीच्या भूतानच्या बाजूला मजकूर आहे You are entering India, Welcome आपण भारतात प्रवेश करीत आहात, सुस्वागतम् प्रवेशद्वाराच्या एका बाजूला सार्वभौम भारत व दुसऱ्या बाजूला सार्वभौम भूतान हे पाहून मोठी मौज वाटते.

एक गणवेशधारी भूतानी शिपाई पहाऱ्यावर असतो पण नावाला-लोकांचा संचार मुक्तपणे चालू असतो भूतान हद्दीत परवाना कचेरी आहे-तेथे जाऊन परवाना काढावा लागतो पहिल्या दिवशाला माणशी रु १८० भरावे लागतात त्यात जातायेताचा बसने प्रवास, थिंपू येथील सरकारी बादशाही हॉटेलमध्ये जेवण, चहा, नास्ता, निद्रा व गाइड यांचा समावेश असतो.

परवाना आणायला गेलो तेव्हा तरुण भूतानी अधिकारी दिसले.

भूतानी लोक दिसायला पिवळसर गोरे, उंचीने थोडेसे लहानखुरे, हसतमुख व काटक वाटले काही माहिती विचारली तर अदबीने सांगतात हिंदी येत नाही हे प्राजळपणे मान्य करतात भूतानी अधिकाऱ्यांना इंग्रजी येत होते म्हणून अडचण पडली नाही. आता भारतीय लोक भूतामध्ये येऊ लागले आहेत तेव्हा आम्हाला हिंदी शिकावे लागेल, असे ते अधिकारी म्हणाले. फुन्सोलिंग येथे एक रात्र हॉटेलमध्ये राहावेच लागते. कारण मोटारी नेहमी सकाळी सुटतात.

फुन्सोलिंग हे सीमेवरील शहर असल्यामुळे टुमदार आहे रस्ते रुंद व पक्के डांबरी आहेत दुकानात भरपूर माल दिसतो. लोकसंख्या विरळ आहे जीप्स, टॅक्सी, मालमोटारी यांची वर्दळ फार दिसते अनेक लहानमोठी हॉटेले आहेत भारतातील मध्यम स्थितीतल्या माणसालाही परवडण्यासारखी आहत फुन्सोलिंग शहराजवळ तोर्सा नदी वाहते तिचे पात्र खूपच रुंद आहे पण नोव्हेंबर महिन्यात आम्ही पाहिले तेव्हा भल्यामोठ्या वाळवटात एखादा ओहोळ वाहत असावा, असा देखावा दिसतो. ठराविक वेळात सकाळ-संध्याकाळ नळाचे पाणी मिळते

खरबंदा मोनॅस्टरी नावाचे एक बुद्धमंदिर चार मैलांवर डोंगरावर आहे तेथे एकच लामा राहतो आजूबाजूच्या इमारतींत काही सरकारी नोकर राहतात मंदिराभोवती सुंदर बगीचा आहे देवळात मुख्य मूर्ती भगवान बुद्धाची आहे त्यांच्या शिष्याच्या दोन दोन मूर्ती दोन्ही बाजूंना दिसतात. चांदीची निरांजने तेवत असतात लामापाशी चांदीच्या अनेक थाळ्याही दिसल्या भूतान हे निखळ बौद्धधर्मी राष्ट्र आहे याची प्रचीती हे मंदिर पाहून येते आम्ही गेलो तेव्हा वृद्ध लामा चांदीच्या थाळीमधून कबूतरांना तांदळाचे दाणे भरवीत होता मंदिर बंद होते, पण बाहेरची घंटा वाज-विल्यावर तो आला व त्याने मंदिर उघडले.

टेकडीवरून एका बाजूला भारतातील पश्चिम बंगालचा मैदानी प्रदेश आणि दुसऱ्या बाजूला भूतानचा पर्वतीय प्रदेश, असा मोठा सुंदर देखावा दिसतो तोर्सा नदीचे विशाल पात्र महाराष्ट्रातील लोकांना एक अनोखे दृश्य वाटते कारण इतके विशाल पात्र महाराष्ट्रात आढळत नाही.

भूतानच्या पर्वतीय प्रदेशात घनदाट झाडी आहे त्यामुळे ते दुरून तसेच जवळून मोठे साजिरेगोजिरे दिसतात दुरून डोंगर साजरे ही म्हण येथे लागू पडत नाही फुन्सोलिंग ते थिंपू हा २०८ कि मी. लांबीचा ( १२९ मैल) राष्ट्रीय हमरस्ता आहे चढ-उताराचा व वळणाचा हा रस्ता काही ठिकाणी ३०४८ मीटर (१०००० फूट) उंचीपर्यंत जातो रस्ता चांगला रुंद आहे, त्यामुळे अपघात सहसा होत नाहीत

## पारो नदीचे खोरे

भूतानमध्ये जी प्रेक्षणीय ठिकाणे आहेत त्यांत पारो नदीच्या खोऱ्याचा पहिला क्रमांक लागतो

फुन्सोलिंगहून थिंपूला जाताना १३० कि मी अंतर गेल्यावर पारो नदीच्या खोऱ्याचा रस्ता लागतो छोटी छोटी शेते, सुंदर दऱ्या, खळखळ आवाज करीत वाहणारे जलप्रवाह आणि विखुरलेली खेडी यांमुळे पारो खोऱ्यात शांततेचे आणि स्वच्छतेचे वातावरण असते प्रदूषणरहित हवा कशी असते हे पाहावयाचे असेल तर या खोऱ्यात जावे भूतानमध्ये अद्याप कारखान्यांची वाढ झालेली नाही आणि लोकवस्तीही विरळ आहे. शिवाय घनदाट जंगलामुळे हवा स्वच्छ होण्यास मदत होते म्हणून प्रदूषित हवा शोधूनही सापडत नाही पारो भागाला आठव्या शतकात भेट देणारा पहिला सुप्रसिद्ध बौद्ध संत म्हणजे पद्मसंभव हा होय. याला भूतानमध्ये गुरू रिंपोचे असे म्हणतात कोणीतरी एका टेकडीवर थोडी जागा दिली व तो तेथे राहू लागला. पुढे येथे मोठा बौद्ध मठ स्थापन झाला हा मठ प्रेक्षणीय आहे. तेथे अनेक पवित्र धार्मिक पोथ्या आहेत. चित्रे आहेत जवळच २०० वर्षांपूर्वी बांधलेली एक इमारत आहे त्या इमारतीत भूतानचे राष्ट्रीय पदार्थसंग्रहालय आहे जवळच काही अंतरावर गुरू रिंपोचे यांच्या स्वर्गातील वसतिस्थानाच्या धर्तीवर बांधलेला एक राजवाडा आहे तेथे भूतानी चित्रकला व शिल्पकला यांचे उत्तमोत्तम नमुने पाहावयास मिळतात भूतानमध्ये पाहावयाचे म्हणजे बौद्ध मठ, तेथील कारागिरी, जुन्या पोथ्या व इतर वस्तू आणि अप्रतिम सृष्टिसौंदर्य. फुन्सोलिंग ते थिंपू या प्रवासात भूतानचे सृष्टिसौंदर्य भरपूर

पाहून घेता येते फुन्सोलिंगपासून थिपूला जाताना प्रथम तोरसा नदी आपली सोबत करते नतर पारो नदीच्या काठाकाठाने प्रवास होतो आणि शेवटी थिपू नदीच्या काठाने जात जात आपण थिपू येथे पोहोचतो पारो आणि थिपू या लहान नद्या आहेत परंतु पाण्याला जोर पुष्कळ असतो आणि पाणी अगदी स्वच्छ असते.

## थिपू

थिपू ही भूतानची नवीन राजधानी. ही राजधानी दिवंगत राजेसाहेब जिग्मे दोरजी वांगचुक यांनी बसविली. त्यापूर्वी पुनाखा ही राजधानी होती थिपू ही राजधानी बसविताना आधुनिक स्थापत्य शास्त्राचे सर्व नियम पाळलेले आहेत प्रशस्त डांबरी रस्ते, दोन्ही बाजूंना पादचारी पथ (Foot-paths) आणि आकर्षक पद्धतीने बांधलेली दुमजली घरे, अशी थिपूची रचना आहे चोहोबाजूंनी हिरवेनिळे डोंगर आहेत या डोंगराच्या कोंदणात हिऱ्यासारखे थिपू आहे व ते उताराच्या घाटरस्त्यावरून येताना एकदम दृष्टिपथात येते दिवंगत राजेसाहेबांच्या स्मरणार्थ बांधलेला पांढऱ्याशुभ्र घुमटाचा स्तूप दुरूनही ठळकपणे लक्ष वेधून घेतो छोट्याशा राष्ट्राची ही अगदी छोटीशी राजधानी फार सुंदर दिसते राजे जिग्मे दोरजी वांगचुक हे १९७२ साली युरोपच्या सफरीवर असताना मरण पावले जुलै १९७२ मध्ये सध्याचे राजेसाहेब गादीवर आले त्या वेळी ते ऑक्सफोर्ड येथे शिकत होते. त्यांचे नाव जिग्मे सिग्या वांगचुक असे आहे

मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकाने आहेत दुकानांवर मोठमोठ्या पाट्याही नाहीत जाहिरात करण्याची प्रवृत्ती दिसत नाही. रस्त्याने चालताना ती घरेच वाटतात दुकानात सर्वत्र भारतीय माल दिसतो. त्याला ते इंपोर्टेड माल म्हणतात

खुद्द थिपूमध्ये बनणारा अथवा भूतानमध्ये बनणारा असा खास माल दिसत नाही भूतानी हस्तोद्योगातून निर्माण झालेल्या हस्तकलाकृतींचे एक दुकान (Handicraft Emporium) आहे लाकडाची भांडी, गालिचे, काही वाद्ये, नाचाच्या वेळी वापरावयाचे उग्र मुखवटे, लहघांच्या माळा इत्यादी माल या दुकानात मिळतो, पण त्याची किंमत परवडत नाही.

आमच्या गटातल्या खरेदीविशारद भगिनींनीही काही खरेदी केली नाही.

थिंपू येथील दिवंगत राजेसाहेब यांच्या स्मरणार्थ बांधलेला स्तूप तिमजली आहे प्रत्येक मजल्यावर काल्पनिक राक्षसी प्राण्यांचे (Dragons) पुतळे आहेत. भगवान बुद्धाचे पुतळे आहेत असत् प्रवृत्तींवर सत्प्रवृत्तीने मात केली पाहिजे असेच जणू हे पुतळे सुचवितात भूतानमधील लोक गौतम बुद्धालाच आपला एकमेव देव मानतात राजाबद्दल त्यांना प्रेम व अपार आदर आहे. तिन्ही मजल्यांवर तुपाचे दिवे सतत तेवत असतात. डालडासारखे दिसणारे तूप एका पसरट भाड्यात भरलेले असते व मध्ये वात तेवत असते स्तूपाचा तिसरा मजला चढून गेले म्हणजे थिंपू शहराचे विहंगम दर्शन होते

भूतान हॉटेल हे सरकारी हॉटेल मोठे सुंदर बांधलेले आहे एका इमारतीत स्वागतकक्ष, भोजनगृह, स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह वगैरे जागा आहेत. शेजारी थोड्या अंतरावर सुंदर तिमजली इमारत आहे दोन खाटा असलेल्या सुंदर खोल्या आहेत त्यात संडास-बाथरूम, टेलिफोन, स्पीकर, कपाट, हीटर इत्यादी सर्व सोयी आहेत प्रत्येक खोलीला स्वतंत्र गॅलरी आहे. अथरूणपांघरूण अगदी राजेशाही असते नास्ता, जेवण, चहा, कॉफी, दही, दूध यथास्थित असते सेवक विनम्र व कष्टाळू आहेत सर्व सेवक गोरे गोमटे, हसतमुख तरुण आहेत.

स्नानगृहामध्ये थंड व गरम पाणी, टब व शॉवर बाथची सोय असते. प्रत्येक खोलीत सुंदर दिवे, पडदे, मोठमोठ्या काचांच्या खिडक्या आहेत. मध्यम स्थितीतील माणसांना आपण एखाद्या राजवाड्यातल्या खोलीत आल्याचा भास होतो फुन्सोलिंग ते थिंपूपर्यंत जाण्यायेण्याचा खर्च आणि चोवीस तास राहण्यायेण्याचा खर्च माणशी रु १८०|- येतो यावरून येथे उतरणे किती महागाईचे आहे, याची कल्पना येईल जास्त दिवस राहिल्यास दररोज माणशी रु ८० द्यावे लागतात. भारतात स्थलदर्शनासाठी अद्याप तरी फारसे कोणी येत नाही गेल्या वर्षी आठ प्रवासी आले होते आणि या

वर्षी आम्ही वीसजण काय ते आलो. २० लोकांचे एक दिवसाचे रु ३६००/ फुन्शोलिंगहून निघतानाच भरावे लागले त्याशिवाय परवानाच मिळत नाही. फुन्सोलिंगहून सकाळी साडेसात वाजता बस निघते ती दुपारी अडीच वाजता थिंपूला पोहोचते त्यामुळे दुपारच्या जेवणाची वेळ टळून गेलेली असते गेल्याबरोबर चहा व पाव आणि बिस्किटे मिळाली रात्री जेवण मिळाले त्यात भात, भाजी, डाळ, पुऱ्या आणि दही मिळाले दुसऱ्या दिवशी सकाळी चहा मिळाला व सात वाजता नास्ता मिळाला त्यात टोस्ट, जाम, लोणी, वेफर्स, थंड पेय, चहा किंवा कॉफी असा बेत होता सर्व पदार्थ चांगले व चवदार होते. थिंपूहूनही सकाळी साडेसातला बस निघते व दुपारी दोन वाजता फुन्शोलिंगला परत येते

थिंपू ही राजधानी थिंपू नावाच्या नदीकाठी आहे. नदीची रुंदी आपल्याकडील सामान्य ओढ्याइतकीच आहे पण पाण्याला जोर फार आणि खळखळाट मोठा थिंपू येथे नोव्हेंबरअखेर चांगलीच थंडी असते या बाजूच्या प्रवासाला सप्टेंबर–ऑक्टोबर हे महिने उत्तम एप्रिल–मे व अर्धा जून हा काळ त्यापेक्षाही चागला

थिंपूमध्ये रस्त्यावरची रहदारी अगदी कमी आढळली मोटारी व जीप यांची वदळ मात्र फार रात्री तर कमालीची शांतता असते

भूतानी लोकांना रंगीबिरंगी कपड्याची आणि नक्षीदार खिडक्यांची फार आवड दिसते नाचगाण्यातही हे लोक फार रसिक आहेत भूतानी गायन रेडिओवर ऐकायला मिळाले व ते वेगळे असले तरी कानाला गोड लागले हे लोक मुखवटे लावून नाच करतात, परंतु आम्हाला नाच पाहावयास मिळाला नाही

पुरुषाचा पोषाख म्हणजे गुडघ्याच्या थोडासा वर असा लांब डगला आणि तुमान किंवा गुडघ्यापर्यंत पोचणारे पायमोजे व बूट. पुष्कळाचे गुडघ्याखालचे पाय उघडेच असतात

राजेसाहेब नेहमी याच पोशाखात असतात भारतात आले तरी एकंदरीत भूतान व तेथील हसरे लोक पाहून बरे वाटले. थिंपूहून पुन्हा फुन्सोलिंग. तेथून न्यू जलपाइगुरी, नतर हावरा. हावऱ्याहून मुंबई व तेथून

पुण्याला आम्ही १–१२–७६ रोजी सुखरूप येऊन पोहोचलो. अशा रीतीने आमची ईशान्य भारताची सहल ३१ दिवसांत संपन्न झाली.

भूतानची नाणी भारतातील टाकसाळीतच तयार होतात व तशीच दिसतात १९५६ मध्ये पहिले चांदीचे नाणे पाडण्यात आले त्याचे नाव टिकचुंग. हे लोकप्रिय नाणे आहे आणि मजुराचा पगार याच नाण्यात दिला जातो. हे नाणे आपल्या अधेलीसारखे दिसले व त्याची किंमत ५० चिदाम किंवा पैसे इतकी असते. एक चिदाम म्हणजे एक पैसा १०० जिदाम म्हणजे एक नूतम किंवा रुपया १०० नूतम म्हणजे एक सरटम. सरटम हे सोन्याचे नाणे असते. भूतानमध्ये नोटा नाहीत भारतीय नाणी व नोटा कायदेशीर चलन समजले जाते

## काही परिमाणे

| | |
|---|---|
| ८ किलोमीटर | = ५ मैल |
| १६ चौ. कि. मीटर | = १० चौ. मैल |
| ८८४८ मीटर | = २९०२८ फूट (एव्हरेस्ट शिखराची उंची) |
| १० मीटर | = ३३ फूट व १$\frac{१}{२}$ इंच |
| १०० चौ. मीटर | = १ आर |
| १०० आर | = हेक्टार = २$\frac{१}{२}$ एकर |
| १००० हेक्टार | = १ चौ. कि. मी. |

---

## प्रकरण चौदावे

# आमचा कर्नाटकचा प्रवास

भाऊबीजेच्या नंतरचा दिवस ता २३–१०–७९ सकाळी ६ वाजताची वेळ शनिवारवाड्यासमोर श्री ट्रॅव्हलसची खास आरामगाडी (बस) उभी होती श्री ट्रॅव्हलसच्या संचालिका सौ सुमन बेलसरे सभासदांना त्यांच्या राखून ठेवलेल्या जागा दाखवीत होत्या. १५–१६ तरुण जोडपी, काही

वृद्ध जोडपी, काही सडे स्त्री पुरुष असे ४५ प्रवासी होते शिवाय कर्मचारी अशी ५० माणसे गाडीत बसली सामान वर व्यवस्थित बांधून टाकले आणि ६।। वाजता मंगलमूर्तीच्या गजरात आमची आरामगाडी १२ दिवसांच्या प्रवासाला निघाली सर्वांचे चेहरे आनंदाने व उत्साहाने उजळले होते दिवाळीत पतीकडून पाडव्याची भावाकडून भाऊबीजेची ओवाळणी मिळाल्याने महिला वर्ग खुशीत होता नोकरीवर जाण्याची रोजची गर्दी नसल्यामुळे पुरुषवर्ग व नोकरी करणाऱ्या महिला आनंदात होत्या नवीन गोष्टी पाहावयास मिळणार म्हणून सर्वांच्या मनात औत्सुक्य होते.

आरामगाडीही चांगली होती आसने आरामशीर (ड्रायव्हर) चक्रधर आपल्या कामात वाकबगार त्यामुळे वेग चांगला व अपघाताची भीती नाही गाडीत रेडिओ व टेपरेकार्डरची सोय असल्यामुळे गाणी, भजने, सिनेसंगीत व क्रिकेटचे धावते वर्णन ऐकण्याची चांगली सोय होती त्यामुळे कंटाळा कुठेच आला नाही सर्व प्रवासी मोकळ्या मनाचे व हसतमुख. प्रत्येकापाशी दिवाळीचे फराळाचे भरपूर, त्यामुळे खातखात प्रवास चालू झाला

साताऱ्याच्या रजताद्री उपाहारगृहात पोटपूजा झाली आणि गाडी पुढे निघाली काही वेळाने उंब्रज गावावरून चाफळफाट्याकडे गाडी वळली तेव्हा सर्वांना आनंदाचा व आश्चर्याचा धक्का बसला आनंद अशासाठी की चाफळ गाव पाहावयास मिळणार व श्रीरामाचे पवित्र दर्शन होणार म्हणून आश्चर्य अशासाठी की चाफळ हे कार्यक्रमात नव्हते ते घेतले म्हणून. चाफळचे मंदिर आता पूर्ण झाले आहे व नवीन सुंदर मूर्तीची प्रतिष्ठापना झाली आहे चाफळ आडबाजूस आहे पण नव्या मंदिरामुळे तेथील रहदारी वाढली आहे श्री नवीनचंद्र मफतलाल यांच्या मनात श्रीरामानेच प्रेरणा दिली म्हणून लक्षावधी रुपये खर्च करून त्यांनी मंदिर उभारले व नवीन मूर्ती बसविल्या सर्व सभासदांनी दर्शनाचा आनंद घेतला व गाडी पुढे निघाली

दुपारी मध्यान्हानंतर कोल्हापुरात आमच्या आरामगाडीने प्रवेश केला व करवीर निवासी श्री अंबाबाईच्या मंदिरापाशी ती उभी राहिली. काही महिलांनी पुण्याहून ओटीची तयारी करून आणली होती. सर्व महिला

वर्ग दर्शनासाठी व ओटी भरण्यासाठी मंदिराकडे वळला. मंगळवार हा देवीचा वार असूनही देवळात गर्दी नव्हती देवीला सर्व दागिन्यांनी सजविली होती व विद्युत्प्रकाशात ते दागिने चमचमत होते निवांतपणे सर्व भगिनींना ओटी भरता आली व मनातले हितगुज देवीला सांगता आले. देऊळ प्रशस्त व स्वच्छ दिसले कोल्हापूर हे बरेचसे पुण्यासारखे आहे पुणे विद्यापिठाप्रमाणे कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ आहे पुण्याप्रमाणे शाळा कॉलेजाची गर्दी आहे पुणेरी पगडीप्रमाणे कोल्हापुरी फेटा प्रसिध्द आहे पुण्यासारखीच कोल्हापूरला गर्दी वाढत आहे

दुपारी ३ वाजता आमच्या गाडीने कोल्हापूर सोडले व ती बेळगावच्या रस्त्याला लागली. वाटेत निपाणी गावी गाडी थांबली निपाणी हे गाव तंबाखूसाठी प्रसिध्द असून सधन आहे मेहेरचंद महाजन आयोगाने निपाणी हे गाव महाराष्ट्रातला द्यावे अशी शिफारस केलेली आहे परंतु महाराष्ट्राला ही सूचना पसंत नाही महाराष्ट्राला बेळगाव हे आपल्याकडे यावे असे वाटते. या वादाचा निकाल अजून लागावयाचा आहे बेळगाव जसजसे जवळ येऊ लागले तसतसा हवेत थोडा गारवा जाणवू लागला आणि सृष्टीचे रूप अधिकाधिक हरित बनू लागले. सायंकाळी ७ वाजता बेळगाव आले एका मोठ्या विश्रांतिगृहात येऊन आम्ही उतरलो भोजनाची सोय होती पण तयारी नव्हती कारण एकदम ५० लोकांना तयार जेवण कोठून मिळणार ? पथाऱ्या पसरून जेवणाची मार्गप्रतिक्षा करीत बसलो. ९ तासांच्या प्रवासाने अंग बरेच दुखत होते तेव्हा विश्रांतीची गरज होतीच

बुधवार ता २४–१०–७९ रोजी जेवण आटोपून बेळगावचे द्यावते दर्शन घेण्यासाठी ११ वाजता विश्रांतिगृह सोडले बेळगावी मिलिटरीचे शिवमंदिर पाहिले हे शिवमंदिर दोन नदी असलेले फारच टुमदार आहे सभोवती मोठा बगीचा आहे त्यात तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे फुलांनी बहरलेली दिसली बेळगावला फुलांचा सुकाळ आहे काही महिलांना फुले पाहून फुलवरचा भास झाला, इतकी मोठी फुले ! मिलिटरी शिवमंदिरात एक सैनिक उभा असतो हे साहजिकच. दुसरे ठिकाण जे पाहिले ते माता

कलावती देवीचे हरिमंदिर व मठ. माता कलावतींच्या फोटोची रोज पूजा होते माता कलावती ह्या आदिवासी जमातीत जन्मलेल्या, त्याच संस्कारात वाढलेल्या दैवयोगाने हुबळीच्या सिध्दारूढ स्वामींची गाठ पडली व त्यांच्या उपदेशाने पूर्ण परिवर्तन होऊन भजनपूजनात मग्न झाल्या, धर्मग्रंथाचे वाचन, चिंतन व मनन सुरू झाले भक्तसमुदाय गोळा होऊ लागला. अशा रीतीने आधुनिक स्त्रीसंत बनल्या. गोरगरिबाची सेवा म्हणजेच ईश्वरसेवा आणि भजन व हरिनाम संकीर्तन हे चित्तशुद्धीचे उपाय अशी सोपी शिकवण त्यांनी दिली.

दुपारी १ वाजता बेळगाव सोडले ते सध्याकाळी ५-३० वाजता गोकर्ण येथे पोहोचलो हा सबंध रस्ता दाट जंगलामधून गेला आहे. उन्हाचा त्रास मुळीच होत नाही. गोकर्ण गावाजवळ आल्यावर मिठागरे व खाडी दृष्टीस पडते आम्ही पोहोचलो तेव्हा ओहोटी होती. जिकडे तिकडे नारळाच्या व सुपारीच्या बागा, आंबे, फणस याची हिरवीगार झाडे कोकणची वनश्री फारच सुंदर दिसते.

सर्व सभासद प्रथम समुद्र दर्शनाला गेले व सर्वांनी शहाळी खाल्ली, काही नुसत्या पाण्याची, काही कोवळ्या मलईसारख्या खोबऱ्याची आणि काही मध्यम जून खोबऱ्याची १। ते १॥ रुपयाला एक या भावाने शहाळी मिळत. गुरुवार ता. २५–१०–७९ रोजी सुप्रभाती गोकर्ण दर्शनाचा कार्यक्रम झाला गोकर्ण हे भारतातील अति प्राचीन क्षेत्रापैकी एक क्षेत्र आहे. भूदेवी ही गाय मानतात व गोकर्ण हा तिचा कर्ण मानला जातो. गोकर्णचे महत्त्व आहे ते तेथील शिवाच्या आत्मलिंगामुळे रावणाने घोर तपश्चर्या करून शंकराला संतुष्ट केले व आत्मलिंग मिळविले आत्मलिंगाची प्राप्ती होऊन रावणाचे सामर्थ्य वाढून देवांना व पृथ्वीला अपायकारक ठरणार हे ओळखून देवानी ते रावणापासून दूर करण्याचा निश्चय केला "लिंग जमिनीवर ठेवलेस तर ते तेथेच स्थिर होईल" असे शंकराने रावणाला बजावले होते देवानी गणपतीला बटुरूप देऊन रावणाच्या दृष्टीस पाडले ते नेमके सध्याकाळच्या आन्हिकाच्या वेळी 'आन्हिक आटोपेपर्यंत लिंग हातात धरून संभाळ, जमिनीवर ठेवू नको' असे रावणाने गणपतीला

बजावले गणपतीने मात्र आन्हिक आटोपण्यापूर्वीच त्याला गडबडीने तीनदा हाक मारून लिंग जमिनीवर ठेवून दिले रावणाने आन्हिक आटोपल्यावर रागाने गणपतीच्या मस्तकावर मुष्टिप्रहार केला व हातचे लिंग गेले म्हणून हळहळत तो लंकेला निघून गेला गणपतीच्या मंदिरातील मूर्ती द्विभुज असून मस्तकावर रावणाच्या प्रहारामुळे झालेला खळगा आहे मंदिर प्राचीन व सुंदर आहे

गोकर्णात गेल्यावर प्रथम गणपतीचे दर्शन घेऊन मग आत्मलिंगाचे दर्शन घेतात आत्मलिंगाच्या मंदिराला महाबळेश्वर मंदिर म्हणतात हे मंदिर समुद्राभिमुख असून मोठे आहे आत्मलिंगाचे वरचे टोक अंगुष्ठमात्र दिसते बाकीचा भाग शाळिग्राम पिठाखाली आहे साठ वर्षांनी एकदा शाळिग्राम पीठ बाजूस करतात तेव्हा संबंध लिंग दिसते ताम्रगौरी पार्वतीचे मंदिर याच आवारात आहे तिच्या हातात तराजू आहे व गोकर्णाचे पारडे काशीच्या पारड्यापेक्षा खाली झुकले आहे समुद्र सान्निध्यामुळे गोकर्ण हे काशीपेक्षा श्रेष्ठ आहे असे ध्वनित केले आहे लिंगाजवळ जाऊन स्पर्शपूर्वक अभिषेक करता येतो उत्तम रीतीने बांधून काढलेला कोटितीर्थ नावाचा तलाव स्नान करण्यास चांगला आहे. काही सभासदांनी पुन्हा एकदा समुद्र दर्शन घेतले, फोटो काढले आणि आपली गोकर्ण यात्रा संपविली

९ वाजता गोकर्ण सोडून आमची गाडी जोग फॉल्सकडे निघाली १० वाजता कुमठा या गावी चहा व नास्ता उरकून ११ वाजता गाडी निघाली. ती अनेक वळणे घेत कधी चढ कधी उतार असे करीत १२ वाजता जोग-फॉल्स येथे पोहोचली रस्ता चांगला आहे आणि दुतर्फा सुपारीचे उंच उंच वृक्ष रखवालदारासारखे उभे होते काही भागात अरण्य अगदी घनदाट आढळले जोग फॉल्सलाच गिरसप्पाचा धबधबा असे म्हणतात व तो जगभर प्रसिद्ध आहे या ठिकाणी शरावती नदी ९६० फूट उंचीवरून खाली उडी घेते व ही उडी घेताना तिचे चार भाग पडले आहेत त्यांना राजा, गर्जक अग्निबाण आणि धवलसुंदरी अशी अन्वर्थक नावे दिलेली आहेत गिरसप्पा धबधब्याची शोभा अलीकडे कमी झाली आहे, पाणीही फार पडत नाही कदाचित वर धरण बांधून जलविद्युत्योजना आखल्यामुळे असे झाले असेल.

महात्मा गांधी पॉवर-हाऊस बघण्यासाठी इलेक्ट्रिक ट्रॉलीने १२० फूट खाली जावे लागते एक ट्रॉली खाली जाते त्याच वेळी दुसरी वर येते एका वेळी २५ माणसे ट्रॉलीमधून प्रवास करतात. महात्मा गांधी पॉवर-हाऊस मोठे आहे व येथे उत्पन्न होणारी वीज भद्रावती, हरिहर व दावणगिरी येथील कारखान्याना पुरविलेली आहे गिरसप्पा धबधब्याचा परिसर निसर्ग-रमणीय आहे प्रदूषणापासून अलिप्त अशी स्वच्छ हवा येथे अनुभवास येते गिरसप्पा येथील विश्रामगृहात रात्रीचा मुक्काम करून सकाळी ताजेतवाने झालेले सर्व सभासद इडली-डोसाचा पोटभर नास्ता करून ता. २६–१०–७९ रोजी सकाळी ९ वाजता शृंगेरीकडे आद्यशंकराचार्यांच्या पीठाच्या दर्शनाकडे निघाले,

शृंगेरीला निघालो तेव्हा एकच विचार सगळ्यांच्या मनात घोळत होता. आद्य शंकराचार्य हा एक चमत्कार आहे. अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यात अद्वैत वेदान्ताचे विवरण आसेतु हिमालय पायी प्रवास चार दिशाना चार शांकर पीठाची स्थापना. सगळेच अपूर्व! गिरसप्पा ते शृंगेरी या प्रवासात सागर, शिमोगा व तीर्थहळ्ळी ही महत्वाची गावे लागली. पुष्कळसा रस्ता दाट जंगलातून जातो दुपारी ४ वाजता शृंगेरी येथे पोचलो. शृंगेरीला जायला अजून रेल्वेमार्ग नाही. मंदिरे बंद होती. ती सायंकाळी ६ वाजता उघडणार असे समजले विश्रामगृह चांगले प्रशस्त असून पाण्याची सोय चांगली आहे गाव मात्र अगदी लहान खेडे. कर्नाटकात वीज अगदी लहान खेड्यात देखील गेली आहे प्रथम सर्व सभासद तुंगा नदीवर गेले. याच नदीत आद्य शंकरचार्यांचा पाय नक्राने पकडला. आईने सन्यास घेण्यास अनुमती दिल्यावर शंकरचार्यांची सुटका झाली. अर्थात ही माया शंकराचार्यांचीच आईने परवानगी द्यावी म्हणून मायावी नक्र निर्माण केला. नदीच्या दुसऱ्या तीरावर आद्य शंकरचार्यांची गादी आहे. पण सध्या गादीवर असलेले शंकरचार्य परगावी गेलेले असल्यामुळे हे आदिपीठ पाहण्याचे सौभाग्य सभासदाना लाभले नाही. नदी पार करण्यासाठी होडी आहे शंकरचार्यांचे दोन हत्ती सध्याकाळी नदी ओलांडून मंदिराच्या आवारात उभे करतात. ते सारखे येणाऱ्या जाणाऱ्याला सोंड उंचावून सलाम करीत

असतात माहुतांना बरी कमाई होते

६ वाजता मंदिरे उघडली मुख्य दोन मंदिरे आहेत. एक शारदाम्बेचे म्हणजे शंकराचार्यांच्या आईचे व दुसरे शिवाचे शारदाम्बेचे मंदिर अतिभव्य व सुंदर आहे आत चित्र आहेत. आद्य शंकराचार्यांच्या जीवनातील प्रसंग चित्रित केले आहेत शिवाचे मंदिर थोडे लहान आहे या मंदिरापुढे नदी नाही मंदिराचे आवार खूपच भव्य व प्रशस्त आहे आद्य शंकराचार्य यांचे वाङ्मय विकत मिळण्याची काही चांगलीशी सोय दिसली नाही. तसेच त्यांच्या अद्वैतवादी विचारांचा प्रचार करण्याची काही यंत्रणा दिसली नाही हल्लीच्या भोगवादी जनतेला आद्य शंकराचार्यांची त्यागवादी शिकवण कशी काय मानवणार हा प्रश्नच आहे शृंगेरीला रात्री खूपच पाऊस पडला पण सकाळ उगवली ती कोरडी

शनिवार, ता. २७–१०–७९ रोजी सकाळी ६ वाजता शृंगेरीहून प्रयाण केले शनिवारी मोठी मजल मारावयाची होती. बेलूर येथील विष्णुमंदिर, हळेबीड येथील शिवमंदिर व श्रवणबेळगोळा येथील गोमटेश्वर पुनळा साव-काशपणे पाहून मुक्कामाला म्हैसूरला जावयाचे होते शृंगेरी सोडल्यापासून आरामगाडी वाऱ्यासारखी धावत होती तरी बेलूर यायला दुपारचे १२ वाजले मध्यंतरी ९ वाजण्याच्या सुमारास चहा व नाश्ता घेण्यासाठी तास-भर गाडी थांबली होती तेवढीच कोणालाही गाडी लागत नव्हती एवढे बरे. नाहीतर आतडी पिळवटून निघाली असती

बेलूर हे आता लहान गाव आहे पण इसवी सन ११०० – १२०० च्या सुमारास काही वर्षे होयसालाच्या यादवांच्या साम्राज्याची राजधानी होती प्रथम हे चालुक्यांचे मांडलीक होते पण विष्णुवर्धन नावाच्या राजाने चालुक्यांची सत्ता झुगारून देऊन स्वतंत्र साम्राज्याची स्थापना केली विष्णु-वर्धनानेच चन्नकेशवाचे मंदिर बांधण्यास प्रारंभ केला. हा राजा उत्कृष्ट मुत्सद्दी, शूर योद्धा, कलेचा मोठा आश्रयदाता आणि प्रजेवर मुलासारखे प्रेम करणारा होता

बेलूर मंदिराच्या प्रवेशद्वारी दक्षिणेतील इतर मंदिरांप्रमाणे एक उत्तुंग गोपुर आहे या गोपुराला पाच मजले असून ते तीन मैलांवरून दृष्टोत्

पडते ते ६५ फूट उंच आहे पूर्वाभिमुख आहे आत प्रवेश केल्यावर गरुडाची साडेतीन फूट उचीची सुंदर मूर्ती आहे [illegible]

मूर्ती दुसरी नाही हा गरुड एका उंच खांबाच्या तळाशी आहे चन्न (सुंदर) केशवाचे (विष्णूचे) मंदिर ४ फूट उंच, १७६ फूट लांब आणि १५६ फूट रुंद अशा तारकाकृती चौथऱ्यावर उभे आहे. दगडाखेरीज दुसरा कोणताही पदार्थ बांधकामात वापरलेला नाही. बाहेरच्या भिंती खालपासून वरपर्यंत उत्कृष्ट शिल्पाकृतींनी भरलेल्या आहेत अगदी तळाला सहस्त्रावधी हत्तींची मालिका दृष्टोस पडते हत्ती हा बलशाली प्राणीच एवढे मोठे मंदिर आपल्या पाठीवर तोलायला समर्थ आहे असा याचा अर्थ असावा त्याच्या वरती मण्यांच्या विविध रचनांची मालिका. मध्ये डोकावणाऱ्या पौराणिक प्राण्यांच्या आकृती, पुन्हा एक विविध आकृतींची ओळ, त्यावरती मणिमय रचनांची ओळ, त्याच्यावरती पुढे आलेल्या कोनाड्यात अप्सराच्या व यक्षाच्या सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. सर्वांत वरती चौकटीत कोरलेल्या अनेक देवदेवतांच्या सुंदर मूर्ती आढळतात. या सर्वांच्या वर ४० खिडक्या आढळतात. त्या खिडक्यांवरही सुबक कोरीव काम आहे दहा खिडक्यांवर [illegible]

[illegible] आहेत विष्णूच्या अनेक अवतारांच्या सुबक आकृती भिंतीवर विखुरलेल्या आहेत शिलाबालिका नावाच्या ४२ आकृती आहेत व त्या या मंदिराचे एक वैशिष्ट्य मानतात ३८ आकृती बाहेरच्या भिंतीवरलहान लहान खांबांवर बसविल्या आहेत व चार आकृती मंदिराच्या छताला आधारभूत असलेल्या चार खांबांवर बसविलेल्या आहेत या मूर्ती

[illegible] तत्कालीन स्त्री सौंदर्यविषयक कल्पनांवर प्रकाश टाकतात, बारीक कंबर, उन्नत उरोभाग, वैशिष्ट्यपूर्ण केशभूषा, विविध व विपुल अलंकार सर्व मूर्तींमध्ये आढळतात.

काही स्त्रिया वाद्ये वाजवीत आहेत, काही नर्तनात मग्न आहेत एक स्त्री वस्त्र परिधान करीत आहे व एक डाव्या हातात आरसा घेऊन आपला थाट कसा काय जमला आहे ते पहात आहे. काही स्त्रिया हातात धनुष्य-बाण घेऊन शिकारीसाठी सज्ज आहेत व एकीने तर पक्ष्यावर नेम धरला

आहे एकीला आपल्या वस्त्रावर विंचू दिसल्यामुळे ती घाबरून आपले वस्त्र दूर फेकीत आहे. एकीचे वस्त्र माकड ओढीत असून शेजारी उभा असलेला तरुण आपले तिकडे लक्ष नाही असे दर्शवीत पण कानाडोळा करून हसऱ्या चेहऱ्याने तिची गमत पाहत आहे. हस्तीदंती अथवा चदनी कलाकृती पाहून आपण आश्चर्यचकित होतो. पण हस्तीदत व चदन कोरायला मऊ असतात पण काळवत्री दगडावर तितकेच सुबक कोरीव काम करणारे बेलूर व हळेबीड येथील प्राचीन शिल्पकार खरोखरच धन्य होत

बेलूर मदिराला तीन दरवाजे आहेत तेही सर्वत्र कोरीव कामाने भरलेले आहेत एक तरुण वाघाची शिकार करीत आहे हे होयसाला वशाचे राजचिन्ह प्रत्येक दरवाजावर आहे. चन्नकेशवाची मूर्ती ६ फूट उचीची असून काळ्या कुळकुळीत पाषाणाची अतिशय गुळगुळीत केलेली आणि सुबक आहे. हे मदिर पुरे करण्यास अनेक वर्षे लागली असतील व शिल्पकारांच्या अनेक पिढ्या तेथे राबल्या असतील त्यांचे कौशल्य, त्यांची चिकाटी, त्याचा दीर्घोद्योग आणि त्याचे सूक्ष्म निरीक्षण पाहून अभिमानाने उर भरून येतो

## हेळबीड

हे गाव बेलूरपासून १४ मैलावर आहे येथील होयसालेश्वर मदिर हे शिवमदिर आहे. हे मंदिर काहीसे अपूर्ण राहिलेले दिसते याला गोपुर नाही. या मदिराच्या भितीवर कोरलेल्या चित्राच्या सात ओळी आहेत. अगदी तळच्या ओळीत माहुतासहित सजविलेले हत्ती दिसतात त्याच्या वरच्या ओळीत शार्दूल आहेत तिसऱ्या ओळीत साधू आणि असख्य पशुपक्षी चौथी ओळ घोडेस्वाराची, पाचव्यात पुराणातील प्रसगाची चित्रे, सहाव्या ओळीत समग्र रामायण चित्रित केले आहे. सातवी ओळ पशू, पक्षी, देवता व पुराणातील प्रसगानी खच्चून भरलेली आहे या सात ओळींच्यावर पूर्णाकृती मूर्ती कोरलेल्या असून त्या सर्व देवदेवताच्या विविध अवतारांच्या आहेत तत्कालीन लोकजीवनाचेही अनेक देखावे चित्रित केले आहेत.

राजा वीरबल्लाळ दुसरा आणि त्याची धाकटी राणी अभिनव केथल-

देवी यांनी इ स  १२१९ मध्ये केदारश्वराचे मंदिर बांधले मंदिराच्या पुआतही कलाकुसरीचे अनेक नमुने पाहावयास मिळतात

आवारातच एक पुराण वस्तुसंग्रहालय आहे तेही प्रेक्षणीय आहे

गोमटेश्वर . सुमारे ४५ मैल प्रवास केल्यावर आपण श्रवणबेळगोळा येथे पोहोचतो साधारणपणे ५ मैलांवरून गोमटेश्वराच्या पुतळ्याचा छातीपासून वरचा भाग दिसू लागतो हा पुतळा एका उच टेकडीच्या भितीवर घडविला आहे पुतळा नग्न आहे आणि त्याची उंची ५७ फूट आहे दोन खांद्यामधील अतर २६ फूट आहे. इतकी प्रचंड मूर्ती असूनही प्रमाणबद्ध आहे चेहरा गोल असून त्यावर सात्त्विक भाव, शांती व प्रसन्नता डोळ्यात भरण्याइतकी स्पष्ट दिसून येते डोक्यावर कुरळी झुलुपे दाखविली आहेत आणि हाताभोवती व कमरेभोवती वेल दाखविले आहेत मूर्ती घडवून १००० वर्षे तरी झाली. पाऊस, वारा, थंडी याचा अखंड मारा चालू असून तळ्याचा सौंदर्यात यत्किंचित उणेपणा नाही जणू काय नकताच बनविला आहे असे वाटते प्रदक्षिणेच्या वाटेवर निरनिराळ्या नाथपंथी साधूच्या पूर्णाकृती मूर्ती आहेत पुतळ्यापर्यंत जाण्यासाठी ६२१ पायऱ्या चढाव्या लागतात. आदीश्वर स्वामींच्या दर्शनासाठी आणखी २३ पायऱ्या चढाव्या लागतात. गोमटेश्वराच्या पुतळ्याच्या पायाशी मराठीतला जुन्यात जुना शिलालेख आहे तो असा "श्री चामुण्ड राये करवियले श्री. गंगराजे सुत्ताले करवियले ॥" श्री हे अक्षर दीड फूट उंचीचे आहे बाहुबल तर पाहिजेच पण बाहुबलापेक्षा त्यागाबद्दल अधिक श्रेष्ठ भोगापेक्षा त्याग श्रेष्ठ मिळवायचे ते देण्यासाठी असा गोमटेश्वराला संदेश आहे. दर १२ वर्षांनी गोमटेश्वरास महामस्तकाभिषेक होतो फेब्रुवारी १९८१ मध्ये हा अभिषेक आहे त्यासाठी आतापासून तयारी चालू आहे कारण दाटीवाटीने राहणाऱ्या सतरा हजार वस्तीच्या गावात पंधरा लाखांची यात्रा भरणार आहे जगाच्या कानाकोपऱ्यातून जैन लोक येतात शिवाय हा अभिषेक विशेष महत्त्वाचा आहे कारण एक हजार वर्षे पुरी होत आहेत महामस्तकाभिषेकाच्या दिवशी पुतळ्याला दुधा-दह्याचे स्नान घालण्यात येईल पहाड बांधून दुधा दह्याच्या घागरी पुतळ्याच्या मस्तकावर रिकाम्या करण्यात येतील. नतर

तुपाचा, गुळसाखरेचा, सुका मेव्याचा व रत्नांचे स्नान घालण्यात येईल दिगंबर जैनांचे मुख्य साधू विद्यानंद मुनी एका बैठकीवर कशालाही न टेकता विवस्त्र बसतील व आशीर्वाद देतील.

पुतळा पाहून प्रसन्न झालेले सभासद सायंकाळी ६–३० ला निघाले आणि रात्री ९ वाजता विजेच्या झगझगाटाने उजळून निघालेल्या म्हैसूर शहरात नियोजित विश्रामगृहात येऊन पोहोचले त्या दिवशी शुक्रवार होता म्हैसूर पाहण्यासाठी शनिवार व रविवार हे दिवस चांगले.

शनिवार, ता. २७–१०–७९ रोजी सकाळी आम्ही म्हैसूर दर्शनासाठी निघालो

१) चामुंडी देवी ही म्हैसूरच्या राजघराण्याची कुलस्वामीनी तिचे मंदिर एका उंच टेकडीवर आहे मंदिरापर्यंत पक्की मोटार सडक आहे. प्रवेशद्वारापाशी महिषासुर राक्षसाचा मोठा पुतळा आहे मंदिराचे आवार प्रशस्त असून मंदिर सुंदर आहे प्रवेशद्वारावर लहानसे गोपुर आहे. दर्शनासाठी मोठी ओळ होती.

दक्षिणेकडील मंदिरे खूप मोठी व एका आत एक अशी आवारे असलेली असतात आत आत जावे तशी हवा कमी होते व गर्मी जाणवू लागते. गाभारा अगदी आत व लहान असतो दर्शन दुरूनच घ्यावयाचे अशी पद्धत आहे. दर्शनासाठी अर्धा तास लागला कापूर आरती केली म्हणजे देवी व तिचे अलंकार स्पष्ट दिसतात चामुंडी टेकडीवरून म्हैसूर शहराचे विहंगम दृश्य फार सुंदर दिसते म्हैसूर हे नगर रचनेच्या तत्वावर उभारलेले आहे विस्तृत पक्क्या सडका, रेखीव इमारती, टोलेजंग राजवाडे, सरकारी इमारती इत्यादींमुळे म्हैसूर फार भव्य दिसते. चामुंडीच्या वाटेवर एकाच दगडातून घडवलेला मोठा नंदी फार प्रेक्षणीय आहे

२) पशु–पक्षी संग्रहालय–भू भारतातील हे एक उत्कृष्ट संग्रहालय आहे ऑस्ट्रेलियातील अनेक सुंदर पक्षी येथे पाहावयास मिळतात. बर्फासारखे पांढरे मोर, अनेक प्रकारचे पोपट, लांडगे, अस्वले, गेंडे, वाघ, सिंह, हत्ती, हरणे, सायाळ, सुसरी, नाना प्रकारची माकडे, चिंपाझी व इतर वानरे, घुबडे, किंग कोब्रा किंवा नागराज, पाणघोडे, नीलगाय नीलवृषभ,

काळा चित्ता वगैरे अनेक प्राणी सुस्थितीत ठेवले आहेत. वाघ मोकळे फिरताना पाहावयास मिळाले सिंहिणीची माजरासारखी पिले पाहायला मोठी गमत वाटली.

आवारात एक छोटेसे म्युझियम आहे. तेथे पेंढा भरलेले प्राणी ठेवले आहेत मोठेमोठे हस्तीदंत आहेत. पशु–पक्षी संग्रहालय पाहायला माणशी एक रुपया फी आहे

१) आर्ट गॅलरी चित्रशाळा ही जगमोहन राजवाड्यात आहे. येथेही माणशी एक रुपया तिकिट पडते. हीही अत्यत प्रेक्षणीय आहे. वडियार राजघराण्यातील राजेलोकांच्या तैलचित्रांचा मोठा सग्रह येथे आहे. राजा रविवर्मा याच्या चित्राचे दालन अत्यत प्रेक्षणीय आहे. राजा रविवर्मा मूळचे केरळचे–त्रावणकोरचे म्हैसूरच्या महाराजांनी त्याना चित्रे काढण्या साठी तीन वर्षे म्हैसूरला मुद्दाम बोलावून घेतले होते तेथे त्यांनी जटायूवध, मत्स्यगधा, कृष्णशिष्टाई, कसवधानंतरची कृष्णाची व वसुदेव–देवकीची भट सैरध्री, इद्रजित रावणाला आसरा देतो असा एक प्रसंग, पूतनास्तन्य शोषण, चंद्रप्रकाशात सीता, स्त्री–गायिका इत्यादी मूळ चित्रे पाहून मन आनदाने व अभिमानाने भरून येते. जणूकाय नुकतीच तयार केल्यासारखी ही चित्रे दिसतात. गोंडस सात्त्विक चेहरे, प्रमाणबद्ध अवयव, भावयुक्त मुद्रा, वेचक प्रसग, उत्कृष्ट रगसंगती यामुळे रविवर्माची चित्रे अद्याप लोकप्रिय आहेत त्यांच्या चित्रांच्या छापील प्रती लाखांनी भारतभर खपलेल्या आहेत युरोपियन चित्रकारांनी काढलेली काही चित्रे आहेत तीही पाहाण्यासारखी आहेत याशिवाय श्रेष्ठ भारतीय चित्रकारांची चित्रेही आहेत. उदा गगनीन्द्रनाथ ठाकूर, नंदलाल वसू, कनू देसाई, हळदणकर इत्यादी

महाराजांना भेटीदाखल मिळालेल्या लाकडी, चंदनी, हस्तीदंती, शिपाच्या, चिनी, जपानी, ब्रह्मी, जयपुरी कलावस्तू प्रेक्षणीय आहेत सर्व प्रकारची वाद्य एका दालनात आहेत. जुनी शस्त्रे बरीचशी पाहाण्यायोग्य आहेत शिंपाची शिवमूर्ती, हस्तीदंतावर राम–रावण युध्द, तांदळाच्या दाण्यावर कोरलेली मूर्ती, टिपूचा चांदी–सोन्याचा हौदा, चामडीची पालखी

हस्तीदंती व चंदनी पेट्या, आरसे; राजवाड्याची संगमरवरी प्रतिमा, ताज-महालची सुबक प्रतिकृती, चिनी मातीच्या सुबक वस्तू किती म्हणून सांगावी ! प्रत्यक्ष पाहणे हाच यावर एकमेव उपाय.

४) राजवाडा म्हैसूरचे माजी महाराज जेथे राहतात तो राजवाडा गावातच आहे त्याचा काही भाग पाहावयास मिळतो. येथही माणशी १ रुपया तिकिट पडते दरबार हॉल, शस्त्रालय, विवाहमहाल व महाराजांनी केलेल्या शिकारी हे भाग दाखवितात.

दरबार महालात राजा रविवर्मा याची काही मूळ चित्रे आहेत. सुंदर झुंबरे, नक्षीदार स्तंभ, सिंहासने वगैरे वस्तू प्रेक्षणीय आहेत. शस्त्रालय फारच सुंदर आहे तेथे अनेक प्रकारच्या तलवारी, खंजीर, भाले, बर्च्या, बाण, पिस्तुले व बंदुका दृष्टीस पडतात टिपू सुलतानची तलवार, हैदर-अल्लीची तलवार, शिवाजीची वाघनखे ही ऐतिहासिक महत्त्वाची शस्त्रे लखलखत असतात.

शिकार महालात पेंढा भरलेले अनेक ढाणे वाघ, रानरेडे, सुसरी, चित्ते वगैरे हिंस्त्रश्वापदे दिसतात एक वाघ तर हल्ला करण्याच्या पवित्र्यात उभा आहे तीन तीन फूट लांबीचे हस्तीदंत अनेक आहेत. व्याघ्रचर्मे भिंतीवर लावून ठेवली आहेत राजवाड्याच्या आवारातच एक मंदिर आहे व त्याच्या प्रवेशद्वारावर गोपुर आहे वाड्याचे आवार खूपच प्रशस्त असून चोहोबाजूनी भिंतीचा कोट आहे

५) कृष्णराजसागर व वृंदावन उद्यान म्हैसूर शहरापासून ११ मैलावर कृष्णराज सागर हे कावेरी नदीवर बांधलेले प्रचंड धरण आहे. धरणाच्या एका बाजूस धरणामुळे बनलेला प्रचंड जलाशय असून दुसऱ्या बाजूस वृंदावन उद्यान आहे हे धरण श्री विश्वेश्वरअय्या हे मुख्य इंजिनिअर असताना बांधले १९११ साली बांधावयास आरंभ झाला व १९३२ साली काम पूर्ण झाले खर्च अडीच कोटी रुपये आला धरणाची लांबी पावणेदोन मैल असून उंची १३० फूट आहे

धरणाच्या प्रवेशद्वारापाशी टिपू सुलतानच्या फर्मानातील एक उतारा दिला आहे. त्यात गरिबांच्या व शेतकऱ्यांच्या हिताची काळजी दिसून येते.

या धरणाची कल्पना टिपू सुलतानाला प्रथम सुचली इ स १७९४ मध्ये धरणाच्या कामास प्रारंभही झाला होता टिपू सुलतानचे हे ऋण विश्वेश्वर-अय्यांनी मान्य करून आपली न्यायबुद्धी प्रकट केली आहे ' गुणी गुण वेत्ती न वेत्ति निर्गुण '। हेच खरे धरणाच्या बागेकडील भिंतीवर कावेरीची मूर्ती बसविलेली आहे व तिच्या हातातून पाण्याची सतत धार पडत असते

वृंदावन उद्यान . वृंदावन उद्यान हे म्हैसूरचे भूषण आहे, हे उद्यान जवळजवळ धरणाइतकेच लांब असून त्याचे दक्षिण वृंदावन व उत्तर वृंदावन असे दोन भाग आहेत. उद्यान पायऱ्या पायऱ्याचे ( Terrace garden ) आहे या उद्यानात सुरू, गुलमोहर व दुराडच्याची झाडे आहेत सगळाकडे पाणी खेळविले असून कारंजी निर्माण केली आहेत पाण्याखाली विविध-रंगी विद्युदीप बसविले असून ते लागले म्हणजे कारंजाचे पाणी विविधरंगी दिसू लागते कारंजीही विविध प्रकारची आहेत पाण्यात बसविलेले विद्युद्दीप येथेच प्रथम पाहिले एका हौदात झगझगीत नांबडा प्रकाश कारंज्यातील पाण्यावर पडल्यामुळे पाण्याचे फवारे पेटले आहेत असे वाटते. बागेत सर्वत्र फ्लड लाइटस्‌ची व्यवस्था केल्यामुळे ऐन काळोखात लख्ख प्रकाश पडलेला असतो एका हौदात तर ९५ कारंज्याचे फवारे उडताना दिसतात वीज व पाणी याची विपुलता असली म्हणजे पृथ्वीवर नंदनवनाचा आभास निर्माण करता येतो याची हे उद्यान पाहिले म्हणजे खात्री पटते उद्यानाशेजारीच एका तलावात नौकाविहाराचीही सोय आहे उद्यानात विद्युद्दीपांची रोषणाई शनिवार आणि रविवारी असते

६) चंदनाच्या तेलाची गिरणी म्हैसूरच्या आसमतात चंदनाची झाडे वाढतात तेथून चंदनाचे ओंडके कारखान्यात येतात. नंतर त्याचे प्रथम बारीक तुकडे व नंतर भुगा करतात हा भुगा पाण्याच्या वाफेत तापवून ऊर्ध्वपातनाने तेल गोळा केले जाते, शिमोग्यालासुद्धा एक लहान कारखाना आहे चंदनाच्या तेलाला परदेशातून विशेषत अमेरिकेतून विशेष मागणी असते असे समजले. चंदनाची खोडे गंध करण्यासाठी वापरतात मात्र वरून चंदनाचा वास असलेली खोडे घेऊन लोक फसतात. पारशी लोकांच्या अग्यारित विस्तव अखंड राहावा म्हणून चंदन वापरतात मोठ्या लोकांच्या

दहनाला चंदनाची चिता रचतात.

७) रेशमी कापडाची गिरणी या गिरणीत तीन विभाग आहेत (१) रेशीम देणाऱ्या किड्यांची वाढ करून त्यांची निगा राखणे (२) रेशमी किड्यांनी बनविलेल्या कोशापासून धागा काढणे (३) रेशमाचा धागा रंगविणे व त्यापासून कापड विणणे रेशमाचे किडे तुतीच्या पानावर उपजीविका करतात. त्याना दुसरे अन्न चालत नाही यासाठी तुतीच्या झाडांची एक बागच केली आहे प्रथम खसखशीसारखी अंडी, नंतर आळया, नंतर किडे किडे स्वतःच्या अंगाभोवती रेशमाचा कोश विणतात नंतर कोश फोडून फुलपाखरू बाहेर पडते शेवटची अवस्था फारच थोडया किड्यांच्या नशिबी येते कारण तसे झाल्यास रेशीम वाया जाते कोश तयार झाले की ते धागा काढण्याच्या भागात नेले जातात. तेथे ते पाण्यात उकळून किंवा वाफाळून घेतात. त्यामुळे आतला निद्रिस्त किडा आतल्या आत मरतो. नतर कोशाचे रेशीम कुशलतेने उलगडून त्याचा लांबच लांब धागा चाकावर गुंडाळतात रेशीम काढल्यावर आतील किड्याचा मृतदेह कावळे व गिधाडे मटकावून टाकतात. त्यांची एक वसाहतच आसमंतात आढळते रेशमाचा धागा हळुवार हाताने हाताळावा लागतो कारण तो फार नाजूक असतो, नंतर त्याच्या प्रती ठरवितात त्याचे विरजन केले की तो पांढरा शुभ्र होतो अशा धाग्याच्या लडी कारखान्याच्या तिसऱ्या भागात जातात तेथे त्यांना निरनिराळे रंग दिले जातात व नतर कापड विणले जाते म्हैसूरचे रेशमी कापड खऱ्या रेशमाचे असते म्हणून ते महाग असते. ते अतिशय मऊ, चिवट, हलके आणि नाजूक असते चागली साडी ८०० रु पर्यंत मिळते एक मीटर रेशमी कापडासाठी हजारो किडे मारावे लागतात. परंतु त्याच्या जीवनाचे साफल्य कोश तयार केला की होते व त्यानतर त्यांना मारण्यात हिंसा होत नाही असा युक्तिवाद केला जातो

वंश सातत्यासाठी काही नरांना व माद्यांना कोश फोडून फुलपाखराच्या अवस्थेपर्यंत पोचू द्यावेच लागते. प्रत्येक मादी ३०० ते ४०० अंडी



ग्रंथालय ठाणे

घालते म्हैसुरी किडे उत्तम रेशीम तयार करतात पण कोश पुरा करण्यास त्यांना ४० दिवस लागतात परंतु म्हैसुरी मादी व परदेशस्थ नर यांच्या संयोगाने जी अंडी तयार होतात ती २२ दिवसानी कोशावस्थेस पोहोचतात व रेशीमही गुणाने चांगले व भरपूर मिळते आळया थाळ्यातून ठेवलेल्या असतात व मोठी आळी इंच दीड इंच लांबीची असते मध्यंतरी ती कात टाकते व त्यामुळ रेशीम उत्पन्न करणाऱ्या तिच्या ग्रंथी वाढतात

८) दि २९-१०-७१ सोमवारी बंडीपूर अभयारण्यातून उटकमंडलम किंवा उटी या थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा कार्यक्रम होता उटी हे ठिकाण तामीळनाडू राज्यात येते ते नीलगिरी पर्वतावर आहे बंडीपूर अभयारण्यात अंगावर ठिपके असलेल्या सुंदर हरणाचे कळप पाहिले ते अगदी मोटार रस्त्याच्या जवळ येऊन उभे राहिले गड्डालूरपासून घाट सुरू होतो वाटेत चहाचे व कॉफीचे मळे दिसतात निलगिरी तेल ज्यापासून काढतात ती युकॅलिप्टसची झाडे पाहिली तशीच सिंकोनाची झाडे पाहिली. या झाडाच्या सालीपासून कोयनेल काढतात वाटेत पायकारा धरण लागते. येथे जलविद्युत्केंद्र आहे व ही वीज निलगिरी पठारावरील वस्तीला मिळते उटी समुद्रसपाटीपासून ७५०० फट उंच आहे उटी येथे सरकारी बोटॅनिकल गार्डन पाहण्यासारखी आहे हिंदुस्थानातील एक सुंदर उद्यान म्हणून याची प्रसिद्धी आहे या उद्यानात एका मोठ्या झाडाचा बुंध्याचा अश्मीभूत अवशेष आहे तो दोन कोटी वर्षांचा जुना आहे गव्हर्नराचे निवासस्थान—राजभवन या उद्यानाशेजारीच आहे

उटी सरोवर हे कृत्रिम सरोवर आहे हे बांधावयास १८२४ मध्ये सुरवात झाली येथे नौकाविहाराची सोय केलेली आहे दोड्डाबेट्टा शिखर हे तामीळनाडूमधील किंबहुना दक्षिणेमधील सर्वात उंच शिखर याची उंची ८६४० फुट आहे उटीपासून १० मैलांवर असून मोटारीचा रस्ता आहे. दोड्डा म्हणजे मोठे, बेट्टा म्हणजे शिखर. आकाश निरभ्र असल्यास एथून उटी, कुन्नूर, वेलिंग्टन व म्हैसूरचे पठार दिसते.

निलगिरीचे आदिवासी अद्याप मागासलेलेच आहेत तोडा, कोटा, कुरुबा, पानिया आणि इरूलस या नावानी ते ओळखले जातात मळ्यात

मजुरी, शेती, हमाली, दूध–दुभते वगैरे व्यवसाय ते करतात बायकांना मध्याच्या दागिन्यांची फार हौस. उटीला पर्वतीय छोट्या रेल्वेनेही जाता येते Blue Mountain Express असे गाडीचे नाव आहे.

निलगिरी जिल्हा हा तामीळनाडू जिल्ह्याचा अगदी लहान जिल्हा आहे उटकमंडल हे या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण या भागात पश्चिमघाट व पूर्वघाट एकमेकात मिळतात उटी, कुन्नुर व कोटागिरी ही तीन थंड हवेची ठिकाणे उटीच्या पठारावरच आहेत, नीलगिरी जिल्ह्याची लोकसंख्या फक्त पाच लक्ष आहे देवाला या गावी ३०० सें मी अथवा २०० इंच पाऊस पडतो. या गावाला दक्षिणेकडील चेरापुंजी म्हणतात बावीस हजार हेक्टर क्षेत्रात चहा पिकवितात वर्षाला तीन कोटी पन्नास लक्ष किलोग्रॅम उत्पन्न येते अठ्याऐंशीशे हेक्टरमध्ये कॉफीचे मळे आहेत उत्तम, आरोग्यदायी, व प्रदूषणरहित हवेचा जिल्हा अशी नीलगिरीची ख्याती आहे उन्हाळ्यात तपमान २५ सें वर सहसा जात नाही हिवाळ्यात ते ० सें खाली जात नाही या तर्वे जिल्ह्यालाच सुदर हवेचे वरदान लाभले आहे उटकमंडळाला आगगाडीने गेल्यास अपूर्व सृष्टिसौंदर्य दृष्टीस पडते. पण गाडीला वेग अगदी कमी असतो व त्यामुळे वेळ फार मोडतो. एखादा चांगला धावणारा आगगाडीबरोबरच धावू शकतो ज्याला वेगाने प्रवास करण्याची सवय आहे त्यांना या खेळातल्या गाडीने ( Toy Train ) प्रवास करणे संकट वाटते.

उटकमंडलाला व आसमनात पाहण्यासारखी स्थळे पुष्कळ आहेत पण ज्यांनी सिमला, दार्जिलिंगसारखी थंड हवेची ठिकाणे पाहिली आहेत अशा आमच्या सारख्या प्रवाशाना विशेष काही वाटत नाही उटकमंडलला थंड हवेच्या ठिकाणाची राणी म्हणतात

उटकमंडल आम्ही अगदी संध्याकाळी सोडले आणि रात्री नऊ वाजता म्हैसूरला परत आलो आणखी एखादा दिवस उटकमंडलला घालवता आला असता तर बरे वाटले असते पण कपडे व हतरुणे पांघरुणं म्हैसूरला राहिल्यामुळे ते शक्य नव्हते शिवाय म्हैसूरला राजवाड्यावर केलेली विजेची रोषणाई पाहावयाची होती. कारण ती फक्त सोमवारीच

असते ती पाहून निद्रेच्या आधीन झालो.

मंगळवार, दि ३०–१०–७९ रोजी सकाळी महिलांचा खरेदीचा कार्यक्रम झाला जेवण झाल्यावर बारा वाजता म्हैसूर सोडले व तेथून दहा मैलावर श्रीरंगपट्टणला आलो श्रीरंगपट्टण कावेरी नदीच्या तीरावर वसले आहे हे प्राचीन शहर आहे द्राविडी पद्धतीची तीन मंदिरे इथे आहेत व ती चांगल्या स्थितीत आहेत रंगनाथस्वामींचे मंदिर सर्वात मोठे व महत्वाचे आहे. प्रवेशद्वारासमोरील गोपूर मोठे व प्रेक्षणीय आहे प्रवेशद्वारातून आत गेल्यावर मोठे पटांगण लागते त्यानंतर तीन सभामंडप क्रमाने ओलांडावे लागतात पहिल्यात ऐंशी, दुसऱ्यात बहात्तर व तिसऱ्यात सोळा खांब आहेत व ते सर्व दगडी आहेत त्याच्या आत आणखी एक दालन असून तेथे उत्सव मूर्ती आहे त्याच्या आतल्या गाभाऱ्यात भगवान रंगनाथ स्वामींची–विष्णूची–शेषशायी मूर्ती आहे ही दहा फूट लांबीची असून उजव्या कुशीवर पहुडली आहे शेष चांदीचा आहे वक्षस्थळापाशी धातूची लक्ष्मीची मूर्ती असून पायाजवळ कावेरीची मूर्ती आहे रंगनाथस्वामीच्या मंदिरात एक काळ्या पाषाणाचा मोठा मारुती आहे

हैदरअल्ली व त्याचा शूर मुलगा टिपू सुलतान यांच्या पराक्रमाबद्दल श्रीरंगपट्टण प्रसिद्ध आहे त्यांच्या कबरी तेथेच आहेत इ स १७९९ मध्ये इंग्रजांनी श्रीरंगपट्टण जिंकले व टिपू सुलतान लढता लढता धारातीर्थी पडला श्रीरंगपट्टण येथे जुम्मा मशीद लहानशीच आहे, दर्यादौलत हा टिपूचा राजवाडा आणि गुंबज ही तीन ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. तिचे दोन मनोरे उंच आहेत दोनशे पायऱ्या चढून गेले की उंचावरून सभोवतालचे दृश्य सुंदर दिसते दर्यादौलत हा टिपूचा राजवाडा टुमदार व दुमजली आहे सभोवती विस्तीर्ण आवार आहे कर्नल आर्थर वेलस्ली–पुढे ड्यूक ऑफ वेलिंग्टन–काही दिवस या राजवाड्यात राहिला होता त्याचे एक आज्ञापत्रही पाहावयास मिळाले त्यात त्याने श्रीरंगपट्टण येथील ऐतिहासिक वास्तू जपून ठेवण्याबद्दल शिफारस केली आहे दर्यादौलत महालात भिंतीवर छतावर व दरवाजावर पानाफुलांची रंगीत नक्षी काढलेली आहे व काही पक्षी दाखविले आहेत. टिपू सुलतान पानाफुलांचा व पशुपक्ष्यांचा

शौकीन असावा महालाभोवती हिरवळ आहे, काही फळझाडे आहेत व चारी बाजूना सुंदर प्रवेशद्वारे आहेत सभोवतालच्या आवाराच्या मानाने मधली इमारत लहान वाटते गुंबज ही इमारत चौरस असून प्रत्येक बाजूला अतिशय गुळगुळीत व काळ्याकुळकुळीत पाषाणाचे अतिशय सुंदर खांब आहेत ते विशेष प्रकारच्या पाषाणाचे ( Horn blend ) केलेले आहेत. वरती मुसलमानी पध्दतीचा घुमट-गुंबज आहे आत तीन थडगी आहेत. मध्ये हैदरअल्लीचे थडगे व एका अंगाला टिपूचे व दुसऱ्या अंगाला टिपूच्या आईचे थडगे आहे आतील भिंतीवर सुंदर नक्षी आहे तीन बाजुंनी हस्तीदंती काम केलेले तीन जाळीदार दरवाजे आहेत फक्त उत्तरेच्या बाजूला दरवाजा नाही. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस उर्दूत मजकूर लिहिलेला आहे प्रवेशद्वाराचे तोंड पश्चिमेला आहे परिसर सुंदर व शांत आहे. लहानसे गाव असूनही श्रीरंगपट्टण पाहण्यासारखे ठिकाण आहे

श्रीरंगपट्टण सोडल्यावर आमची आरामगाडी बंगलोरच्या रोखाने धावू लागली व संध्याकाळच्या सुमारास बेंगलूरच्या महाराष्ट्र निवासात येऊन थांबली

दि २१-१०-७९ रोजी बंगलूर दर्शनासाठी आमची आरामगाडी निघाली बंगलूर हे कर्नाटक राज्यातील सर्वात मोठे शहर व त्या राज्याची राजधानी आहे या शहराचा विस्तार २५ चौरस मैल आहे व लोकसंख्या १० लाख आहे बंगलूर शहर समुद्र सपाटीपासून ३००० फूट उंचीवर एका पठारावर वसले आहे हवामान थंड, प्रसन्न व आरोग्यप्रद आहे. हे रेल्वेचे मोठे केंद्र असून तेथून देशाच्या सर्व दिशांनी गाड्या जातात तसेच बंगलोर-हून देशाच्या सर्व दिशांना विमाने जातात. बंगलूर शहर अतिशय पध्दतशीरपणे आखलेले आहे रुंद पक्क्या सडका, सडकेच्या दोन्ही बाजूंना वृक्ष, विस्तीर्ण चौक, भरपूर मोकळी जागा, सुंदर इमारती, ठिकठिकाणी बगीचे असा एकंदर थाट आहे सगळीकडे हिरवेगार, ऐन उन्हाळ्यातही पाण्याची विपुलता, सगळीकडे विजेचा लखलखाट, सर्व सुखसोयी इत्यादी गोष्टीमुळे बंगलूर हे दक्षिण भारतातील एक प्रसिध्द व प्रेक्षणीय स्थळ झाले आहे. गावात ३० पेक्षा अधिक सिनेमागृह आहेत.

दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही शास्त्रीय संशोधनांची संस्था बंगलूरचे मोठे आकर्षण आहे. टाटा कुटुंबाने जमशेटजी नसरवानजी टाटा (१८३९ ते १९०४) यांच्या स्मरणार्थ ३० लक्ष रुपये देणगी देऊन १९११ साली ही संस्था स्थापन केली. विश्वविख्यात भारतीय शास्त्रज्ञ चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी आपले नोबेल पारितोषिकविषयक संशोधन याच संस्थेत केले. या संस्थेचे क्षेत्र ३०० एकर असून तेथे सर्व शास्त्रीय विषयांचे संशोधन चालू असते. शेकडो वृक्ष, सुंदर आखणीचे रस्ते, निरनिराळ्या प्रयोग शाळांच्या इमारती, पूर्ण शांतता व स्वच्छ मोकळी हवा या कारणांमुळे संशोधनास अत्यंत योग्य असे हे स्थळ आहे यात शंका नाही.

लालबाग आणि कबन पार्क ही दोन सार्वजनिक उद्याने अतिशय विस्तीर्ण व सुन्दर आहेत. लालबाग येथे एका खडकावर सोळाव्या शतकात उभारलेला एक मनोरा आहे. असे चार मनोरे शहराच्या चार दिशांना आहेत. केंपे गौडा नावाच्या अधिकाऱ्याने हे मनोरे बांधविले असे म्हणतात. बसवनगुडी येथे ११ फूट उंचीचा प्रचंड नंदी आहे. हा नंदी एकाच दगडातून खोदलेला असून बसलेल्या अवस्थेत आहे. सर्व अवयव प्रमाणबद्ध आहेत. जवळच गविगंगाधर नावाचे शिवमंदिर आहे. या मंदिरातच अखंड दगडाची दोन छत्रे, एक त्रिशूल व एक डमरू आहे.

विजया बँकेची २३ मजली इमारत हे एक बंगलूरचे आकर्षण आहे. अडीच कोटी रुपये खर्चून बांधलेली ४८० मोठ्या खोल्या असलेली राज्य विधान सौध ही विधान परिषदेची इमारत प्रेक्षणीय आहे. कर्नाटक सरकारचा चंदनी व इतर प्रकारच्या साबणांचा कारखाना पाहिला. शेवटी विश्वेश्वरय्या टेक्निकल म्यूझियम पाहिले. यात सर्व जनतेला समजेल अशा पद्धतीने शास्त्रीय विषय समजावून दिले जातात. बंगलूर येथे साड्यांची खरेदी हा भगिनीवर्गाचा मुख्य कार्यक्रम तो सायंकाळी ६ ते ९ पर्यंत उरकला.

दि. १–११–७९ रोजी बंगलूरहून सकाळी ८ वाजता प्रयाण केले व गाडी हॉस्पेट येथील तुंगभद्रेवरच्या धरणाच्या रोखाने धावू लागली. तेथील रेस्टहाऊसमध्येच रात्रीचा मुक्काम होता. सध्याकाळी साडेचारच्या सुमारास

आम्ही धरणावर पोहोचलो. धरणामुळे निर्माण झालेला जलाशय समुद्रासारखा पसरला होता. पश्चिम क्षितिजाकडे पाहिले तो पाण्याला आकाश टेकलेले. मुंबईला सूर्य समुद्रात मावळताना जसा दिसतो तसा या जलाशयात सूर्यास्त दिसला सूर्य लंबवर्तुळाकार झाला व तापवून लाल झालेल्या लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे दिसू लागला. सूर्यास्तसमयीचे रंग पश्चिम आकाशात दिसू लागले आणि सूर्याचा लाल गोळा पाण्यात सावकाशपणे बुडाला. तुंगभद्रेवरचे हे धरण फारच मोठे आहे धरणाच्या दुसऱ्या बाजूला दोन दरवाजांतून वेगाने पाणी वाहत होते एक मोठे विद्युतनिर्मितिगृह तेथे आहे काळोख पडेपर्यंत सभासद धरणावर थांबले व नंतर विश्रामगृहाकडे आमची गाडी गेली विश्रामगृहामध्ये काही खोल्या आहेत व मोठा हॉलही आहे. जेवणाची सोय चांगली आहे

दि २-११-७९ रोजी सकाळी स्नाने, चहा व नास्ता आटोपून हॉस्पेट सोडले व तेथून ९ मैलावर असलेल्या हंपी येथील विजयानगर साम्राज्याचे अवशेष पाहावयास गेलो हंपी तुंगभद्रेच्या काठी आहे व ४०० वर्षांपूर्वीच्या राजधानीचे अवशेष नऊ मैलांच्या विस्तीर्ण परिसरात पसरलेले आहेत.

हंपी हंपी येथे शृंगेरीतल्या विद्यारण्यस्वामींनी हक्क व बुक्क बंधूंना हाताशी धरून इ स १३३६ मध्ये विजयनगरची स्थापना केली. हक्क व बुक्क हे संगम वंशाचे सरदार होते विजयनगरचे साम्राज्य दक्षिणेकडे कन्याकुमारीपर्यंत पसरले होते कृष्णदेवराय या पुरुषाने १५०९ ते १५२९ असे २० वर्षे राज्य केले व विजयानगरचे वैभव कळसास पोचविले, त्याच्या मृत्यूनंतर हे साम्राज्य केवळ ३६ वर्षे टिकले विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा व बेदर येथील बहामनी सुलतानांनी आपली सैन्ये एकत्र केली व इ. स १५६५ मध्ये राक्षसतगडी येथे विजयनगरचा शेवटचा सम्राट रामराजा याच्या सैन्यावर हल्ला केला रामराजा मारला गेला व त्याच्या सैन्याचा संपूर्ण पराभव झाला, विजयनगरची लूट व विध्वंस पाच महिने चालली होता यावरून त्याच्या वैभवाची कल्पना येईल.

२३२ वर्षे टिकलेले विजयनगरचे साम्राज्य संपन्न व बलिष्ठ होते.

व्यापार, कलाविकास, वाङ्मय, सुखी व शांत जीवन, विद्येचा विकास, लष्करी सामर्थ्य, सुवत्ता या सर्व दृष्टींनी ते पुढारलेले होते. उत्पन्नाचा एक-षष्ठांश भाग राजाला मिळे न्यायदान चोख होते. सर्व दक्षिणभर मंदिरे बांधण्यात आली तेलगू, तामीळ व कानडी या भाषांचा विकास झाला कृष्णदेवरायांनी एकूण सहा स्वाऱ्या करून आपले साम्राज्य वाढविले हिंदू-धर्मातील सर्व पंथांचे रक्षण केले लोकांना राजकीय व धार्मिक स्वातंत्र्याचा आणि शांततामय जीवनाचा लाभ करून दिला

रामायणातील वाली, सुग्रीव यांचे राज्य येथेच होते वालीचा वध करून सुग्रीवाशी रामाने सख्य केले ते याच ठिकाणी हंपी हीच रामायणा-तील किष्किंधा नगरी. रामाला हनुमानासारख्या परमभक्ताचा व पुरुषाचा लाभ येथेच झाला.

मातंग ऋषींचा आश्रम येथेच होता ऋष्यमूक नाव असलेला पर्वत येथलाच पंपा सरोवर येथलेच. आमची आरामगाडी प्रथम थांबली ती विरुपाक्ष किंवा पंपापती मंदिरापाशी हे मंदिर बरेच सुस्थितीत आहे व अजून येथ पूजा अर्चा होते. आतील शिवलिंग चांगल्या स्थितीत आहे. मंदि-राच्या प्रवेशद्वारी गोपुर आहे मंदिराचे आवार मोठे आहे जवळच तुंग-भद्रेचा कालवा किंवा पाट आहे मंदिराच्या भिंतीवर काही प्राचीन चित्रे आहेत व ती चांगल्या स्थितीत आहेत मंदिराच्या मागे लोकपावन तीर्थ आहे व तेथेच शृंगेरीचे अधिपती व विजयनगरचे राजगुरू विद्यारण्यस्वामी राहात असत. विरुपाक्ष मंदिराशिवाय बसवेश्वर मंदिर, उग्र नरसिंह, विठ्ठलस्वामी मंदिर व तेथील अखंड दगडी रथ, कमलमहाल, राखणमनोरा, हत्तीखाना, राण्यांचे स्नानगृह व हजारीराम मंदिर ही पाहण्यासारखी ठिकाणे आहेत विठ्ठलस्वामी मंदिर विशेष प्रेक्षणीय आहे तेथील नक्षीकाम अप्रतिम आहे सप्तसूर ज्यातून निघतात असे लहान दगडी खांब आहेत.

एका पोर्तुगीज प्रवाशाने लिहून ठेविले आहे की त्याला विजयानगर रोमएवढे मोठे वाटले व अतिशय सुंदर दिसले इराणच्या वकिलाने लिहून ठेविले आहे की तत्कालीन भारतीय व युरोपातील कोणत्याही राजधानीपेक्षा विजयानगर अधिक सुंदर होते. जेथे सामान्य लोक राहत तेथे दगडी उखळे,

भिंतीचे दगड व पाण्याचे दगडी पाट अद्यापही दृष्टीस पडतात कालाय तस्मै नमः । हेच अखेर खरे.

हंपी येथील अवशेष पाहून परत हॉस्पेटला आलो व दुपारचे जेवण घेतले त्या दिवशी बदामी येथील लेणी पाहून मुक्कामाला विजापूरला जावयाच होते. बदामीपासून मद्रा मैलांवर परेजगड नावाचे लहानसे गाव आहे तेथे बनशंकरी देवीचे प्रेक्षणीय मंदिर आहे मंदिर प्राचीन बांधणीचे वाटले आसमत निसर्ग रमणीय आहे. तेथून बदामाची लेणी पाहावयास गेलो ही लेणी सहाव्या-सातव्या शतकात खोदलेली असून प्रेक्षणीय आहेत. काही वैदिक धर्माभिमान्यानी खोदलेली दिसतात. काही जैन धर्मीयांना खोदलेली आहेत ही लेणी डोंगराच्या चढावर खोदलेली आहेत. लेण्यातल्या पाषाण मूर्ती सुंदर आहेत अर्थात मुसलमानांनी केलेल्या विध्वंसाची साक्ष ठायी ठायी दिसते हे सागावयास नकोच. ज्यांनी वेरूळ, अजंठा येथील लेणी पाहिली आहेत त्याना बदामीच्या लेण्यात विशेष काही वाटत नाही.

सध्याकाळी बदामी येथून निघालो ते रात्री ९ वाजता विजापूरला मुक्कामाला आलो

दि ३-११-१९७९ रोजी विजापुर पाहण्याचा कार्यक्रम सकाळी ९ ते १२ होता

बिजापूर किंवा विजापूर हे याच जिल्हयाचे मुख्य ठिकाण आहे इ. स. १४८९ ते १६८६ हा २०० वर्षांचा काळ भरभराटीचा होता. त्या वेळी आदिलशाही नांदत होती इ. स. १६२६ ते १६५६ ही तीस वर्षे महमद आदिलशहा राज्य करीत होता. त्यानेच गोलघुमट बांधविला मुसलमान बादशहांना आपल्या व आपल्या प्रियतमांच्या कबरीवर स्मृतिमंदिरे बांधण्याचा छंदच होता याला अपवाद औरंगजेब तळघरात खऱ्या कबरी, वरती दर्शनी किंवा नकली कबरी व त्यावर प्रचंड घुमटाचे चौरसाकृती उंच स्मृतिमंदिर हा ठराविक साचा या स्मृतिमंदिरापैकी आग्र्याचा ताजमहाल व विजापुरचा गोलघुमट ही दोन स्मृतिमंदिरे जगप्रसिद्ध आहेत

गोलघुमटाचा आतील व्यास १२४ फूट आहे इमारतीची जोत्यावरील उंची १९८ फूट आहे चारी कोपऱ्यावर वाटोळे जिने चिचोळया

खतोऱ्यात बसविलेले आहेत चार बाजूंना मोठमोठे कमानी दरवाजे आहेत. गोलघुमट ही प्रचंड इमारत विटांची असून चुन्यात बांधलेली आहे आणि घुमटाला मध्ये कसलाही आधार नाही

आत शिरल्यावर मध्यभागी नकली थडगी आहेत खरी थडगी खाली तळघरात आहेत आत शिरताच टाळी वाजविली म्हणजे पाच वेळा प्रतिध्वनी ऐकू येतो वरती गेल्यावर घुमटाच्या आत प्रशस्त गॅलरी आहे समोरासमोर येतील अशी चार बाके आहेत त्यापैकी एकावर पती आणि समोरच्या बाकावर पत्नी बसली तर दोघांमध्ये १२४ फूट अंतर असूनही दोघांना अगदी हलक्या आवाजात विश्रब्ध कुजबूज करता येते थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या माणसाला काहीएक ऐकू येत नाही म्हणून या सज्जाना कुजबुजणारे सज्जे म्हणतात व त्यामुळे गोलघुमट हे जगातले एक आश्चर्य झालेले आहे

त्या वेळेचा चुना आणि सनला आजकालच्या सिमेंटपेक्षा टिकाऊ असला पाहिजे, कारण गोलघुमटासारख्या इमारती आज ३०० वर्षे होऊन गेली तरी मजबूत आहेत गोलघुमट हा त्या वेळच्या स्थापत्यकलेचा एक आश्चर्यकारक नमुना आहे हल्ली पाहायला जाणारे लोक इतका गोंगाट करतात की त्याना काय पाहावयाचे हेच कळत नाही असे दिसते

गोलघुमटाबाहेर एक पुराण वस्तुसंग्रहालय आहे तेही पाहाण्यासारखे आहे. गोलघुमटाचे आवार मोठे प्रशस्त आहे व स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे

इब्राहिम रोझा नावाची दोन स्मृतिमंदिरे गावाबाहेर जुळ्या भावंडांसारखी उभी आहेत सुलतान इब्राहिम दुसरा व त्याच्या नातलगाच्या कबरी तेथे आहेत. या इमारती गोलघुमटाच्या मानाने लहान आहेत पण अत्यंत प्रमाणबद्ध असून कलाकुसर व नक्षीकाम अन्यत्र आढळत नाही

विजापूरची जामा मशीद दक्षिण भारतात सर्वांत मोठी मशीद आहे. तिचे प्रशस्त आवार प्रेक्षणीय आहे. येथे प्रत्येक व्यक्तीला प्रार्थनेस बसण्यासाठी चौकोन आखलेले आहेत मेहतर महाल एका मेहतराने बांधविला इमारत लहानशीच पण आतील छतावरील नक्षीकाम अप्रतिम आहे. आसार

महाल ही प्रशस्त इमारत न्यायलयासाठी म्हणून बांधली, पण पुढे तिचा उपयोग महमद पैगंबरांचे पवित्र अवशेष ठेवण्याकरिता करू लागले या अवशेषामुळे या स्थानाला पावित्र्य प्राप्त झाले आहे.

रणरागिणी सगळ्या भारतभर प्रसिद्ध असलेली पचधातूची अजस्र-तम मलिका-इ मैदन ( रणांगणाची स्वामिनी ) किंवा मुलुख मैदान तोफ एका बुरुजावर बसवलेली आहे ती १४ फूट लांबीची आहे उघड्यावर असूनही तिला अजिबात गंज चढलेला नाही तिचे तोंड इतके मोठे आहे की एखादा माणूस सहज आत बसेल राक्षसतगडीच्या लढाईत विजयानगरा च्या विरुद्ध ती वापरली होती असे समजते तो उडवली म्हणजे तिच्य घनगर्जनेने उरात धडकी भरे असे सांगतात.

लांडा कसाब ही २१ फूट ७ इंच लांबीची तोफ दुसऱ्या एका बुरुजा-वर बसवलेली आहे मात्र तिचे तोंड लहान आहे

ताजबावडी ही विहीर १२० फूट लांब तितकीच रुंद आहे चोहो-बाजूनी दगडी बांधकाम केले आहे इतकी मोठी विहीर क्वचितच आढळते ताज सुलताना या आपल्या लाडक्या राणीच्या स्मरणार्थ ही विहीर सुलतान इब्राहीम याने इ स १६२० च्या सुमारास बांधली श्रीदत्तात्रेयाचे जागृत स्थान नृसिंहमंदिर म्हणून प्रसिद्ध आहे

कै पांडुरंग देसाई वकील यानी बांधविलेले लक्ष्मीमंदिर प्रेक्षणीय आहे.

विजापूर पाहणे साडेबारा वाजता संपले जेवण झाल्यावर आमची आरामगाडी भरधाव वेगात निघाली ती ४ वाजता पंढरपूरला आली दि ३।११ ७९ कार्तिकी यात्रेचा शेवटचा दिवस होता गर्दी कमी झाली होती सहल यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व सभासदांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले व आभार मानले वास्तविक पंढरपूर दर्शन कार्यक्रमात नव्हते तेव्हा ते घेतल्याबद्दल सर्व सभासदांनी चालक सौ सुमन बेलसरे यांचे आभार मानले ७ वाजता गाडी फलटण मार्गे पुण्याकडे निघाली व बरोबर मध्य-रात्री १२ वाजता शनिवारवाड्यापाशी येऊन पोहोचली अशा रीतीने ही १२ दिवसांची सहल बरोबर १२ व्या दिवशी रात्री १२ वाजता संपली.

## प्रकरण पंधरावे

# आमचा कन्याकुमारीचा प्रवास

बरोबर एक वर्षापूर्वी आम्ही कर्नाटकचा प्रवास केला त्याचप्रमाणे यदाही भाऊ-बीजेच्या नतरच्या दिवशी सोमवारी, दि. १०-११-८० रोजी कन्याकुमारीस प्रयाण केले व २०-११-८० रोजी परत आलो दहा दिवस कसे गेले ते समजलेच आही इतका हा प्रवास सुखावह झाला

कन्याकुमारीची निवड आम्ही केली ती विशिष्ट कारणामुळे : १) मुंबई ते त्रिवेंद्रम थेट गाडी अलीकडे झाली आहे. तिला जयन्ती जनता एक्सप्रेस म्हणतात पुण्यातासुनही शयनयानात जागा आरक्षित करता येते त्रिवेंद्रम येते पुढे पॅसेंजर गाडीने चार तासात कन्याकुमारी माझ्यासारख्या आजारी माणसाला हा प्रवास सुखकारक झाला

२) आम्ही १९५४ साली कन्याकुमारीला गेलो होतो तेव्हा किनाऱ्या- पासून थोडया अतरावर एक मोठे व एक लहान असे दोन खडक समुद्रात पाहिले होते त्यांना विवेकानंद खडक असे म्हणत. या खडकावर ७५ लक्ष रुपये खर्चून एक स्मारक उभारल्याचे वाचले होते. त्याची छायाचित्रेही पाहिली होती ते स्मारक बघावे, अशी फार इच्छा होती. हे राष्ट्रीय स्मारक आहे व सर्व राज्यानीं त्याला हातभार लावलेला आहे

३) निवात जागेत राहण्याची चांगली सोय विवेकानंदपुरम येथे आहे असे समजले होते. शिवाय खर्च आम्हांला परवडण्यासारखा आहे असे ऐकले होते. पुण्याच्या कलकलाटाचा, गर्दीचा व धावपळीचा उबग आला होता व हवापालटाची फार आवश्यकता वाटत होती

४) समुद्रसान्निध्य, वेगळे सृष्टिसौंदर्य, वेगळे वृक्ष व वनस्पती, भिन्न परिसर, वेगळे राज्य, वेगळी भाषा, वेगळा पेहराव व वेगळे अन्न यांचे आकर्षण होतेच एकाच ठिकाणी उभे राहून सकाळी पुर्व समुद्रातून होणारा सूर्योदय व सध्याकाळी पश्चिम समुद्रात होणारा सूर्यास्त पाहण्याचे सौभाग्य

कन्याकुमारीशिवाय इतर कोठे नाही हे माहीत होते व त्याची पुनरावृत्ती करावयाची होती

५) कन्याकुमारीची मूर्ती डोळे भरून पाहावयाची होती. सोळा किलो मीटर अंतरावर असलेले दाक्षिणात्य शिल्पकलेचा व भव्यतेचा आदर्श असलेले शुचिंद्र मंदिर पुन्हा पाहावेसे वाटत होते

६) पूर्वकडे असलेला बंगालचा उपसागर, दक्षिणेकडचा हिंदी महा॰ सागर व पश्चिमेकडचा अरबी समुद्र अशा तीन सागरांचा संगम कन्या॰ कुमारीला होतो अशा संगमावर पुन्हा एकदा स्नान करावयाची इच्छा होती.

हे व इतर अशाच प्रकारचे हेतू मनात धरून आम्ही सफरीसाठी कन्याकुमारीची निवड केली शिवाय ६ डिसेंबर १९८० पासून स्मारक लोकास पाहावयास मिळणार नाही अशी वाईट बातमी वर्तमानपत्रांत आली होती. दुष्काळाने गाजलेल्या या भारतवर्षात असे होणारच नाही अशी हमी कोणीच देऊ शकणार नव्हता माझ्यासारख्या आयुष्याच्या अंतकाळाच्या उंबरठ्यावर उभा असलेल्या माणसाला ही संधी गमावणे शक्य नव्हते.

कॅम्पस इन चार्ज, विवेकानंद केंद्र, विवेकानन्दपुरम, कन्याकुमारी पि. नं ६२९७० (तामीळनाडू) या पत्त्यावर मनि॰आर्डरने तीन माणसां॰ करिता स्वतंत्र खोली दररोज १५ रुपये भाड्याने आरक्षित केलेली होती. जयन्ती जनताचे आरक्षण सहा महिने अगोदरपासून करता येते. आम्ही सव्वा महिना अगोदर दोन्ही आरक्षणे केली होती पत्रव्यवहार इंग्रजीत करावा पचाईत पडते ती येताना त्रिवेंद्रम ते पुणे या आरक्षणाची आपली परतीची तारीख ठरली असल्यास त्रिवेन्द्रम स्टेशनमास्तरांकडे आगाऊ पैसे भरून महिना दोन महिने अगोदर आरक्षण करणे चांगले आम्ही तसे न केल्यामुळे येताना पचाईत पडली आरक्षित जागा सर्व भरल्या होत्या. शेवटी आरक्षित नसलेला एक डबा असतो त्यात हमालाला जास्त पैसे देऊन जागा धरावी लागली त्यामुळे बसून तरी येता आले नाही तर उभ्याने येण्याचा प्रसंग आला असता. पुणे ते कन्याकुमारी प्रत्येक आरक्षित जागेसाठी रु ८२ खर्च आला

सोमवारी रात्री ८ ३० ला पुणे सोडले जेवण करून पथाऱ्या पसरल्या व निद्रादेवीच्या आधीन झालो जयन्ती जनता एक्सप्रेस महाराष्ट्र,—कर्नाटक, आन्ध्र प्रदेश, तामीळनाडू आणि केरळ या पाच राज्यातून जाऊन शेवटी केरळात त्रिवेंद्रम येथे थांबते सोलापूर, गुटकल, रेणीगुंठा, एरोड, एर्नाकुलम, क्विलॉन. त्रिवेंद्रम ही काही महत्त्वाची स्थानके वाटेत लागतात. त्रिवेन्द्रमला पोहोचायला चाळीस तास लागले त्रिवेंद्रमला गाडी बदलावी लागते तीन तास त्रिवेंद्रमला गाडीची मार्ग प्रतिक्षा करण्यात गेले त्रिवेंद्रमहून दुपारी ३ वाजता गाडी निघाली ती प्रत्येक स्थानकावर थांबत कन्याकुमारीला बुधवारी संध्याकाळी साडेसहा वाजता पोहोचली.

मलबार किंवा केरळ किनाऱ्याने प्रवास करताना आपण एखाद्या उपवनातून प्रवास करतो आहोत असे वाटते त्यामुळे प्रवास कंटाळवाणा होत नाही दोन्ही बाजूस रम्य वनश्री व एका मागून एक लागणारी लहान लहान खेडी यामुळे आपण लोकवस्तीतूनच प्रवास करतो आहोत असे वाटते केरळ किनारा म्हणजे नारळी केळीच्या बागा आणि भातशेती याची रेलचेल भाताची हिरवीगार शेते सगळीकडे असल्यामुळे सर्व जमिनीवर हिरवा गालिचा अंथरलेला आहे असे वाटते.

समुद्रामुळे उत्पन्न झालेली क्षार सरोवरे—बॅक वाटर्ससारखी लागतात जेथे भातशेती असते तेथे गोड्या पाण्याची सरोवरे आहेत केरळात सर्वत्र पाण्याची विपुलता दिसते अगदी थोड्या अंतरावर दुतर्फा बागांमधून सुंदर, छोटी, कौलारू घरे झोपड्या, घरांसमोर सुंदर अंगणे, नारळाची टरफले उकलण्यात, काथ्या व काथ्याच्या वस्तू बनविण्यात अथवा दुसऱ्या कसल्या तरी कामात गुंतलेले स्त्री पुरुष, शांत वातावरण, प्रदूषणरहित हवा, छाया प्रकाशाची मौज सर्वत्र दिसते केरळ राज्याला दक्षिण भारताचे नंदनवन म्हणतात ते अगदी यथार्थ आहे नारळाचे झाड हा येथील कल्पतरू आहे नाराळाच्या झाडाचा कोणताही भाग फुकट जात नाही खोबरे अन्न म्हणून आणि तेलासाठी व पेंडीसाठी उपयोगी पडते खोडाचा उपयोग होड्या, तराफे करण्यासाठी आणि इमारतीसाठी होतो करवंटयांच्या सुंदर सुंदर कलाकृती करतात व सरपण म्हणून उपयोग होतो हिरांचे झाडू तयार

करतात. पानांचा उपयोग छपरांचे व भिंतीचे झाप करण्यासाठी होतो काथ्याचा उपयोग पायपुसणी, दोरखंड, मॅटिंग, ब्रश, कार्पेट वगैरे अनेक वस्तू बनविण्यासाठी होतो

क्विलॉनपासून त्रिवेंद्रमपर्यंतचा प्रवास व त्रिवेंद्रमपासून कन्याकुमारीचा प्रवास तसा मोठा आल्हाददायक आहे केरळमध्ये पावसाळा जून ते जानेवारीपर्यंत असा आठ महिने असतो. सोमवारी रात्री ८–३० ला निघालेले आम्ही बुधवारी संध्याकाळी साडेसहा वाजता कन्याकुमारीला पोहोचलो. लगेच टॅक्सीने विवेकानंदपुरम्मधल्या विवेकानंद लॉजमध्ये जाऊन आमच्या खोलीत विसावलो कन्याकुमारीला महत्त्वाची गोष्ट म्हणजे कन्याकुमारी देवीचे दर्शन कन्याकुमारीची कहाणी मोठी मनोरंजक आहे बाणासुर नावाचा एक दैत्य होता. त्याने कठोर तपश्चर्या करून परमेश्वरापासून अमरत्वाचा वर मिळवला होता. कोणत्याही पुरुषापासून आपल्याला मृत्यू येऊ नये असा वर त्याने मिळवला होता स्त्रियांच्या शक्तीबद्दल बाणासुराची भावना तुच्छतेची होती म्हणून त्याने स्त्रियापासून मृत्यू नको अशी मागणी वर मागताना केली नव्हती वरदानाने उन्मत्त झालेला बाणासुर पृथ्वीवर धुमाकूळ घालू लागला व भूमाता अगदी गांजून गेली. ती ब्रह्मदेवाकडे गेली पण त्याने आपण काही करू शकत नाही असे सांगितले. ब्रह्मदेवाबरोबर भूमाता विष्णूकडे गेली विष्णूने सांगितले की पराशक्ती शिवाय दुसरे कोणीही बाणासुराचा वध करू शकणार नाही पराशक्तीला प्रसन्न करण्यासाठी एक मोठा यज्ञ करावा म्हणजे ती यज्ञात प्रकट होईल. असे विष्णूने सुचविल्यावरून देवांनी एक मोठा यज्ञ केला होमकुंडात देवी प्रकट झाली व तिने दक्षिण समुद्राच्या काठी तप करण्यास सुरवात केली. कालांतराने देवी उपवर झाली व तिच्या विवाहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. नारदाला वाटले की जर विवाह करून कन्याकुमारी संसारी बनली तर बाणासुराचा वध होणे शक्य नाही म्हणून नारद तिच्याकडे आले व म्हणाले, " तु विवाहाचा विचार करतेस हे ठीकच आहे, परंतु असुरांच्या जाळ्यात फसणार नाहीस याची काळजी तुला घेतली पाहिजे परमेश्वरालाच केवळ साध्य होईल अशी अट तू जाहीर कर. डोळे नसलेला नारळ,

गाठ नसलेला ऊस व शिरा नसलेले पान पहाटे कोंबडा आरवण्यापूर्वी जो आणून देईल त्याला खुशाल वर पराशक्तीने नारदाचे म्हणणे मान्य केले आणि हाती वरमाला घेऊन वाट पाहात बसली परमेश्वराने या तिन्ही गोष्टी जमा केल्या व तो लगबगीने कोंबडा आरवण्यापूर्वी कन्याकुमारीला पोचण्यासाठी निघाला. शुचीन्द्र या ठिकाणी येऊन पोचताच नारदाने कोंबड्याचे रूप घेऊन कुक्कुटरव केला तो एकताच परमेश्वराला वाटले की कन्याकुमारीची अट तर पुरी होत नाही मग पुढे जाण्यात काय शहाणपणा आहे ? म्हणून तो शुचीन्द्र या ठिकाणीच स्थिर राहिला व स्थाणु लिंगाच्या स्वरूपात आजही तिथे आहे वरमाला हातात घेतलेली कन्याकुमारी वरराजाची वाट पाहात अद्यापही मंदिरात उभी आहे लग्नासाठी जी सामग्री जमा केली होती तिची वाळू बनली व त्यामुळेच कन्याकुमारीच्या सागरावरील वाळू विविधरंगी आहे एक मोठे धातूचे पात्र होते त्याने पाषाणरूप घेतले ते अद्यापही मंदिरात दिसते

बाणासुराचा वध बाणासुराच्या कानावर जेव्हा कन्याकुमारीच्या सौंदर्याची ख्याती गेली तेव्हा तो तिला मागणी घालण्यासाठी आला "मला युद्धात जिंकलेस तर तुला मी वरीन," असे कुमारीने त्याला सांगितले स्त्रियांच्या शक्तीबद्दल बाणसुराची कल्पना तुच्छतेची होती म्हणून त्याने फक्त पुरुषांपासून अमरत्व मागितले होते कुमारीशी युद्ध करण्यास बाणासुर तयार झाला बाणातीर्थापाशी दोघांचे घनघोर युद्ध झाले व यात पराशक्तीने बाणासुराचा वध केला मरण्यापूर्वी बाणसुराने देवीची क्षमा मागितली व उद्धती देण्याची विनती केली देवीने त्याची ती विनती मान्य केली आणि आषाढी अमावस्येला जो कोणी बाणतीर्थावर स्नान करील त्याला गंगास्नानाचे पुण्य लागेल असा वरही दिला

कन्याकुमारीचे मंदिर फार प्राचीन आहे. मंदिर विस्तीर्ण असून चोहोबाजूनी उंच भिंत आहे आत तीन प्रकार आहेत देवी गाभाऱ्यात असून पूर्वाभिमुख आहे देवी अंधारात आहे पण कर्पूर आरतीच्या उजेडात देवीची चंदनचर्चित मूर्ती चांगली दिसते. मूर्ती पूर्णाकृति असून अतिशय सुंदर आहे मूर्ती उभी असून रेखीव आहे एका हातात वरमाला आहे दुसऱ्या

प्रकारात देवेंद्राने स्थापन केलेला गणपती आहे त्याला इंद्रकांत गणेश म्हणतात कन्याकुमारीची सखी भद्रकाली मंदिरात उत्तरेला उभी आहे या मंदिराला उंच कळस अथवा गोपुर नाही

## विवेकानंद शिलास्मारकाचा इतिहास

विवेकानंदाचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त त्याचा जन्म कलकत्त्यामध्ये ९ जानेवारी १८६२ रोजी झाला ते एका ख्रिश्चन कॉलेजमधून पदवीधर झाले १८८० च्या सुमारास त्यांची व त्याचे गुरू रामकृष्ण परमहंस यांची गाठ पडली रामकृष्णांनी नरेंद्रला अध्यात्मातला आपला पट्टशिष्य मानले आणि आपले सर्व अध्यात्मज्ञान नरेंद्राला दिले १५ ऑगस्ट १८८६ रोजी रामकृष्ण परमहंस मृत्यू पावले. त्यानंतर लवकरच नरेंद्रनाथांनी विवेकानंद हे नाव घेऊन परमहंसांच्या सर्व शिष्यांचे पुढारीपण स्वीकारले. विवेक आणि आनंद ही दोन आपली वैशिष्टये हेच जणू काय त्यांना सुचवायचे होते

१८८६ ते १८९२ ही सहा वर्षे त्यांनी हिमालयापासून कन्याकुमारी-पर्यंत संबंध देशभर भ्रमण केले. देशातील दैन्य व दारिद्र्य पाहिले. गरीब आणि दलित यांचा छळ आणि पिळवणूक पाहिली मूठभर लोक गरिबांच्या श्रमावर गबर झाले आहेत आणि चैन करीत आहेत जातिभेदांनी सर्व समाज पोखरून काढला आहे सर्वत्र दांभिकपणा फैलावला आहे पण उच्च-तम आध्यात्मिक जाणीव जागी झाली तर हिंदुस्थान पुन्हा मोठा होईल आणि सर्व जगाला मार्गदर्शन करू शकेल प्रत्येक माणसात परमेश्वराचा अंश आहे हे प्रत्येकाने जाणले पाहिजे माणसात देव पाहायला शिकले पाहिजे जगात कोणी उच्च नाही व कोणी नीच नाही.

१८९२ मध्ये डिसेंबर महिन्यात स्वामीजी कन्याकुमारीला आले. कालीमातेचे किंवा पराशक्तीचे उपासक असल्यामुळे कन्याकुमारीचे पुरातन मंदिर पाहून त्यांना फार आनंद झाला. कन्याकुमारी ही पराशक्तीचेच रूप आहे अशी समजूत आहे. कन्याकुमारीचे पदचिन्ह समुद्रातील एका खडकावर

उमटले आहे अशी त्यांना माहिती मिळाली. पराशक्तीने शिवप्राप्तीसाठी एका पायावर उभे राहून कठोर तपश्चर्या केली. तेथे हे पदचिन्ह उमटले आहे ते पाहण्याची विवेकानंदांना इच्छा झाली पण नावाड्याला द्यायला जवळ पैसे नव्हते २५ डिसेम्बर १८९२ या दिवशी सायकाळी त्यांनी समुद्रात उडी घेतली नरभक्षक शार्क माशाचे हा संन्याशी भक्ष्य बनणार असा नावाड्यांनी अदाज केला. पण काही वेळाने त्याना खडकावर उभे असलेले विवेकानंद दिसले त्यांना आचंबा वाटला. विवेकानंदांनी पोहून खडक गाठला होता २५, २६, २७, डिसेंबर १८९२ असे तीन दिवस आणि तिन्ही रात्री अन्नपाण्याशिवाय विवेकानंदांनी तेथे तपश्चर्या केली आणि त्याना साक्षात्कार होऊन पुढील मार्ग दिसला. सर्वसंग परित्याग किंवा सन्यास आणि मानवजातीची सेवा ही दोन ध्येये त्याच्या मनात रुजली सेवाभावी स्वयसेवकाचे पथक उभारले पाहिजे आणि समतेचा आणि सेवेचा सदेश त्यांनी जगभर फैलावला पाहिजे असे त्यांनी ठरविले अशा रीतीने कन्याकुमारी येथील सुमुद्रावरील खडकावर हा संन्यासी राष्ट्राचा किंबहुना जगाचा द्रष्टा शिक्षक बनला १८९३ मध्ये अमेरिकेत शिकागो येथे सर्व धर्मपरिषद भरणार होती. तिला हजर राहून हिंदुधर्माची महती अमेरिकेच्या लोकासमोर गावयाची व तिचे श्रेष्ठत्व सिद्ध करावयाचे असे त्यानी ठरवले. अनेक अडचणीवर मात करून त्यांनी अमेरिका गाठली सप्टेंबर १८९३ मध्ये त्यांनी जगभर गाजलेले आपले भाषण केले.

कन्याकुमारी मंदिराच्या आग्नेयेला समुद्रात एकमेकांस जोडलेले दोन मोठे खडक आहेत त्यांना इंग्रजीत Twin Rocks ( जुळे खडक ) असे म्हणतात त्यापैकी एक खडक उंच आहे व दुसरा सखल आहे त्या सखल खडकावर पराशक्तीचे पदचिन्ह उमटले आहे अशी समजूत आहे त्यांना विवेकानंद खडक असे नाव पडले. या खडकापर्यंत जाण्यास स्टीमलॉचमध्ये बसून दोन तीन मिनिटे लागतात खडकावर विवेकानंदांचे भव्य स्मारक बांधावे अशी कल्पना सुचली त्याल एकनाथजी रानडे या महाराष्ट्रीय सदगृहस्थाचा पुढाकार होता या स्मारकासाठी लागणारी प्रत्येक वस्तू नावेने स्मारकाच्या जागी नेणे जरूर होते काम फार अवघड व खर्चाचे

होते शिवाय हे स्मारक व्हावयाचे होते, सर्व राज्यातील लोकांचा हातभार याला लागणार होता. ७५ लक्ष रुपयांचा अंदाज होता महाराष्ट्राने या स्मारकासाठी २१,४८,११३ रुपये म्हणजे सर्वात जास्त रुपये दिले आहेत.

खडकावरचे विवेकानंद स्मारक (Vivekanand Rock Memorial अत्यंत मजबूत व साधे आहे बाराही महिने समुद्रावरचा वारा, ऊन, पाऊस, थंडी यांचा मारा स्मारकावर सतत होत राहणार हे लक्षात घेऊन स्मारक मजबूत केले आहे. स्मारकात जो उंच खडक आहे त्यावर दुमजली इमारत आहे. त्यात दुसऱ्या मजल्यावर विवेकानंद मंडप आहे त्यात विवेकानंदांचा पूर्णाकृती ब्रांझचा उभा पुतळा आहे. त्याच्याभोवती चौरस मंडप आहे तो काळ्याकुळकुळीत संगमरवरी पाषाणाचा आहे विवेकानंदाच्या समोर साधारणपणे १००–१३५ माणसे बसतील इतकी जागा सोडून स्वामी रामकृष्ण परमहंस व त्यांच्या पत्नी यांचे मोठे फोटो आहेत तळमजल्यावर ध्यान-मंडप आहे त्यात प्रकाश अगदीच कमी असतो व कमालीची शांतता असते. ज्याला खरोखर ध्यान करावयाचे आहे त्याने आत बसून ध्यान करावे. शिवाय एक दुकान आहे. तेथे विवेकानंदांचे व त्यांच्याविषयीचे वाङमय विकत मिळण्याची सोय आहे. जो लहान खडक मंडप आहे. त्याला श्रीपाद पारई (देवीचा पाय उमटलेला खडक) असे म्हणतात येथे एका पायावर उभी राहून कन्याकुमारी देवीने शिवप्राप्तीसाठी तपश्चर्या केली असा समज आहे. देवीच्या पावलाचा ठसा उमटलेली जागा आहे तेथे लहानशी चौरस इमारत बांधली आहे तिला चार दरवाजे आहेत, दरवाजाबाहेर उभे राहूनच दर्शन घ्यावे लागते आतील खडकावर पावलाचा आकार उमटलेला दिसतो त्यावर फुले, नाणी पडलेली असतात. चौकोनी इमारतीबाहेर मंडप आहे खडकावर पावसाचे पाणी साठवण्याचा एक तलाव आहे, त्यात बारीक मासे सोडलेले आहेत एका कोपऱ्यात स्वच्छता गृह आहे खडकावर कोठेही उभे राहिले तर समुद्र दिसतो आणखी काही लहानसहान खडक आसमन्तात आहेत त्यावर लाटा येऊन फुटतात तेव्हा मोठे सुंदर दृश्य दिसते. खडकावर एका ठिकाणी माती घालून फुलझाडे लावली आहेत एका ठिकाणी सूर्योदय व सूर्यास्त कोणत्या महिन्यात कोणत्या ठिकाणी होतात ते

आकृतीने दाखविले आहे खडकावरील विवेकानंद स्मारक प्रत्यक्ष बघितल्या-शिवाय त्याची कल्पना येणार नाही. समुद्रात बेटासारख्या असलेल्या खडका-इतके सुंदर व टिकाऊ स्मारक कसे बांधले असेल, याचे सामान्य प्रेक्षकाला आश्चर्य वाटणे साहजिक आहे स्मारक पाहावयास लोकांना नेणारी स्टीम-लाँचची यंत्रणा व स्थानिक कोळी यांच्यामध्ये काही वाद निर्माण झाला आहे त्यामुळे ही यंत्रणा ६ डिसेंबर १९८० पासून बंद होणार आहे, अशी पाटी पाहिली व फार वाईट वाटले परंतु तामिळनाडचे मुख्यमंत्री श्री जी रामचंद्रन लवकरच कन्याकुमारीला भेट देणार आहेत व काहीतरी तडजोड निघेल असे दि २-१२-८० च्या वृत्तपत्रात वाचले तेव्हा बरे वाटले. स्मारक पाहण्यास बंदी झाली तर तामिळनाडूचे नुकसान होणार आहे. आज कन्याकुमारीला येणाऱ्या प्रेक्षकांमुळे अनेक लोकांचे पोट भरते आहे. खाद्यपदार्थांची, खेळण्यांची, सागर किनाऱ्यावर मिळणाऱ्या शंख-शिंपल्यांची व त्यापासून बनविलेल्या शोभिवंत वस्तूंची अनेक दुकाने आज कन्याकुमारीत आहेत त्यांचे गिऱ्हाईक कमी होईल बस सर्व्हिसचा धंदा बसेल रोज हजारो उतारूंची ये-जा करणारी मोटार लाँच बंद होईल व राष्ट्रीय एका-त्मेची हानी होईल ज्यांनी देशभर हिंडून एक कोटी रुपये जमवून हे एक-मेवाद्वितीय स्मारक तयार केले त्यांची घोर निराशा होईल विवेकानंदांनी आपल्या महनीय कामगिरीने जे धर्मजागृतीचे व मानवतेचे कार्य केले त्याची स्मृती हे स्मारक पाहूनच जागृत होते काही लोक त्यापासून स्फूर्ती घेत आहेत तो स्फूर्तीचा झरा आटेल आणि देशाचे मोठे नुकसान होईल तूर्तास तरी कोळ्यांचा वाद मिटला आहे

कन्याकुमारीला विवेकानंद शिला स्मारकाखेरीज महात्मा गांधींचे स्मारक म्हणून बांधलेले गांधी मंदिर प्रेक्षणीय आहे हे चौमजली असून अगदी वरच्या मजल्यावरून कन्याकुमारी गावाचे विहंगम दर्शन होते. तसेच सूर्यास्त पाहण्यासाठी हे ठिकाण चांगले आहे अगदी तळमजल्यावर गांधी-जींचे मोठे तैलचित्र एका मेघडम्बरीत ठेवले आहे व त्यांचे एक वाक्य उद्धृत केले आहे गांधीजी १५-१-१९३७ रोजी कन्याकुमारीला गेले होते त्यांनी लिहिले आहे—

कन्याकुमारीच्या भूशिरावर बसून मी हे लिहित आहे समोर तीन समुद्राचे पाणी एकमेकांत मिसळून त्याने जगात अद्वितीय असे दृश्य निर्माण केले आहे कन्याकुमारी हे बंदर नाही व त्यामुळे जहाजाचो वर्दळ अगर ये-जा नाही येथील देवी कन्याकुमारीप्रमाणे येथील पाणीही कौमार्यावस्थेतच आहे ’

ज्या ठिकाणी मंदिर बांधले आहे तेथे गांधीजींच्या अस्थीचा कलश दर्शनासाठी ठेवला होता नंतर तीन सागरांच्या संगमात त्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले गांधी मंदिर अगदी साधे आहे हे मंदिर म्हणजे तामिळनाडूच्या लोकांनी गुजराथच्या सुपुत्राला वाहिलेली श्रद्धांजली आहे. विवेकानंदांचे शिलास्मारक ही अखिल भारताने बंगालच्या सुपुत्राला वाहिलेली श्रद्धांजली आहे या दोहोंच्यामध्ये एक लहानसे मंदिर आहे. त्याला आद्य शंकराचार्य मंदिर म्हणतात. दात आद्य शंकराचार्यांची संगमरवरी मूर्ती मध्यभागी असून तिच्या दोन्ही बाजूंना तीन तीन याप्रमाणे सहा शंकराचार्यांच्या किंचित लहान आकाराच्या मूर्ती आहेत या मंदिरासमोर एवं सोळाखांबी मंडपासमोरच समुद्रस्नानासाठी व्यवस्था केली आहे. पाण्याला बांध घालून उथळ अशी जागा केली आहे तेथे कंबरेइतक्या पाण्यात समुद्र-स्नान करता येते आम्ही तेथे स्नान करून भारतातील सर्व नद्यांच्या स्नानाचे पुण्य मिळविले. कन्याकुमारी येथील तिन्ही स्मारके साधी आहेत व ते योग्यच आहे कारण शंकराचार्य, विवेकानंद व गांधीजी हे साध्या राहणीचे व उच्च विचारसरणीचे अग्रदूत होते.

विवेकानंद केन्द्र ही वसाहत स्मारकाबरोबरच निर्माण झाली आहे. विवेकानंद केन्द्राने बरीच जागा व्यापली असून त्यात एक मोठा दुमजली विवेकानंद लॉज, केंद्राची कचेरी, बगीचा, कॅंटीन, नोकरांकरिता चाळी-सारखी घरे, ग्रंथालय, लहान मुलांसाठी खेळण्याची जागा, विवेकानंदांच्या जीवनावरील भव्य प्रदर्शन वगैरे अनेक इमारती आहेत कॅंटीन चांगले आहे. चहा–कॉफी मेदूवडे इडली वगैरे जिन्नस मिळतात दोन्ही वेळ जेवणही मिळते. लॉजमधल्या खोल्याही चांगल्या आहेत भाडेही माफक आहे केंद्र गावापासून मैल दीड मैल लांब आहे पण मोफत बस सर्व्हिस आहे. ती

चार-पाच मिनिटांत तुम्हाला गावात घेऊन जाते. समुद्रही दोन फर्लांगावर आहे कन्याकुमारी स्टेशन केंद्रापासून जवळ आहे. विवेकानंदांच्या जीवनावरील प्रदर्शन ६१ चित्रांचे आहे ते पहाण्यास फक्त ५० पैसे फी आहे प्रत्येक चित्राखाली जो मजकूर आहे, तो छापलेली ३४ पानी पुस्तिका एक रुपयाला मिळते ही पुस्तिका वाचली म्हणजे विवेकानंदांची देशोद्धाराची तळमळ व त्यावर त्यांनी सुचविलेले उपाय लक्षात येतात. केंद्राच्या कचेरीत निरनिराळे फोटोग्राफ व त्यांची व त्यांच्या संबंधी लिहिलेली इतराची पुस्तके विकत मिळतात विवेकानंद केंद्रात व आवारात शांतता, स्वच्छता व सृष्टिसौंदर्य वाखाणण्यासारखे आहे. कन्याकुमारी गावात गोंगाट, गर्दी व सिनेमा संगीत याचा त्रास आहे

कन्याकुमारीपासून आठ मैल किंवा १३ किलोमीटर अंतरावर शुचींद्र म्हणून एक विशाल व प्राचीन मंदिर बसच्या रस्त्यावर असून ७० पैसे तिकिट पडते एकदा जाऊन पाहण्यासारखे खचितच आहे हे शिवमंदिर असून येथील शिवलिंगाला शिवाचे स्थाणुलिंग म्हणतात विष्णू आणि ब्रह्मदेव यांचीही वेगवेगळी मंदिरे आहेत. अत्री ऋषींची पत्नी अनसूया हिची सत्वपरीक्षा करण्यासाठी ब्रह्मा, विष्णू आणि शंकर अतिथिवेषाने आले व तिच्या सतीत्वा पुढे नम्र होऊन त्यांना बालरूप धारण करावे लागले ते याच ठिकाणी असा समज आहे म्हणजे हे स्थान दत्तात्रेयाचे जन्मस्थान असे म्हणावे लागेल. येथे चंद्राचेही एक मंदिर आहे. परंतु मंदिरात मूर्ती नसून आरसा आहे. इंद्राला याच ठिकाणी शुचित्व मिळाले व तो अहिल्येला भ्रष्ट केल्याच्या पापापासून मुक्त झाला म्हणून त्याची मूर्ती नाही असे सांगतात याच मंदिरात १२ फूट उंचीची हनुमानाची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे मूर्तीचे शरीरसौष्ठव वाखाणण्यासारखे आहे या मारुतीला तुळशीच्या माळा प्रिय आहेत त्या घालण्यासाठी शिडीची सोय आहे या देवळातील पाषाणाचे खांब प्रचंड आकाराचे असून त्यावरील नक्षीकाम अप्रतिम आहे एके ठिकाणी मोठ्या खांबाभोवती सात लहान लहान खांब आहेत त्यावर आघात केला की सात सुरांचे संगीत ऐकू येते. प्रवेशद्वारी सात मजली मोठे गोपूर आहे. त्यावरील नक्षीकाम सुंदर आहे. मंदिराबाहेर

एका बाजूला एक तलाव असून त्यातही एक मंदिर आहे. येथे चैत्रात मोठा उत्सव होतो. त्याला जलयात्रा म्हणतात. चातुर्मासात एक महोत्सव होतो त्याला रथोत्सव म्हणतात शुचीन्द्र मंदिरात दररोज अर्ध्या रात्री इंद्र पूजा करावयास येतो असा समज आहे शुचींद्राला ज्ञानवनक्षेत्र असेही म्हणतात इतक्या आडबाजूला इतके प्रेक्षणीय व पवित्र स्थान पाहून आनंद व आश्चर्य वाटले द्रविडी शिल्पकलेचा व स्थापत्यशास्त्राचा एक अत्युत्कृष्ट नमुना म्हणता येईल असे हे शुचींद्र मंदिर आहे

येथे इंग्रजीत ज्यांना ड्रॅगन ( Dragon ) म्हणतात ते काल्पनिक भयानक प्राणी कसे असतात याची कल्पना येते पुष्कळ प्रचंड खांबाच्या तळाशी पाषाणाचे ड्रॅगन बसविलेले आहेत.

कन्याकुमारीचा पाच दिवसांचा सुखकर निवास संपवून आम्ही सोमवार, दि १७–११–८० रोजी दुपारी १–३० वाजता कन्याकुमारी स्टेशन सोडले व आगगाडीने ५ वाजता त्रिवेंद्रम येथे स्टेशनवर येऊन पोचलो जयंती जनता एक्सप्रेस मंगळवारी सकाळी ८–१० ला सुटवयाची होती सामानाची व्यवस्था लावून टॅक्सीने पद्मनाभ मंदिर पाहण्यास गेलो पद्मनाभ किंवा अनंतशयन हे त्रावणकोर संस्थानचे कुलदैवत होते आता त्रावणकोर संस्थान केरळमध्ये विलीन झाले आहे व त्रावणकोर हे नाव देखील नष्ट झाले आहे पद्मनाभाची मूर्ती प्रचंड आहे तीन दरवाज्यातून अनुक्रमे मस्तक दर्शन, नाभिदर्शन आणि चरणदर्शन घ्यावे लागते पुरुषांना पद्मनाभाचे दर्शन शर्ट, कोट, टोपी रखवालदाराकडे ठेवून उघड्याने घ्यावे लागते. देवापुढे पैसा ठेवावयाचा व साष्टांग नमस्कार घालायचा नाही असा कडक नियम आहे

मंदिराच्या बाहेर एक सुंदर तलाव किंवा तीर्थ आहे चारी बाजूनी घाट बांधलेले दक्षिण भारतातील तलाव फार सुंदर दिसतात मंदिराच्या प्रवेशद्वारावरील गोपुर सात मजली उंचच उंच असून सुंदर नक्षीकामाने आहे पद्मनाभाची भोगमूर्ती किंवा उत्सवमूर्ती लहानशी पण सोन्याची आहे

मंदिरात एक सोन्याची घंटाही आहे मंदिराच्या चारी बाजूना

विस्तीर्ण सभामडप आहेत मंदिराचे व सभामंडपाचे खांब मोठे व एकसंधी दगडाचे असून त्यावर देवादिकांच्या सुबक मूर्ती कोरलेल्या आहेत गावात मध्यवर्ती असे हे मदिर आहे त्रिवेंद्रम हे शहर मोठे असून सुदर आहे याची प्रचीती टॅक्सीतून फिरतानादेखील येते मोठे व पक्के डांबरी रस्ते, विजेचा लखलखाट, टोलेजग इमारती यामुळे दक्षिणेकडील नदनवन असलेल्या केरळचे राजधानीचे शहर शोभते खरेच

मंगळवारी सकाळी ८-३० वाजता जयंती जनता एक्स्प्रेस सुटली व आम्ही बुधवारी रात्री १२-३० वाजता पुण्याच्या स्थानकावर उतरलो घरी सुखरूप येऊन पोहोचल्याबद्दल आनद वाटला. पण सारखी विवेकानदाच्या शिला स्मारकाची आठवण येत होती. तेथे दोन भेटीत जे अपूर्व समाधान लाभले व मनावर जे सस्कार झाले ते अविस्मरणीय होते. असाच अनुभव सज्जनगडावर गेलो असताना आला होता. त्या त्या ठिकाणी शरीरातून एक लहर जाते व ती आपल्याला निराळयाच उन्नत वातावरणात घेऊन जाते त्या थोर पुरुषाचा आत्मा आपल्याला स्पर्श करतो की काय न कळे केदारनाथला गेलो तेव्हा अशीच लहर शरीरातून गेल्याचे आठवले त्यावेळी आद्य शकराचार्यांच्या आत्म्याने स्पर्श केला असेल. अशा वेळी अतींद्रिय शक्तीचा साक्षात्कार होतो असे वाटते तसा अनुभव कन्याकुमारी मदिरात अथवा शुचीन्द्र मदिरात किंवा पद्मनाभ मदिरात आला नाही वास्तविक ती मदिरे जास्त भव्य आहेत आळंदीच्या श्री ज्ञानेश्वर मदिरात केव्हा केव्हा अतीन्द्रिय शक्तीचा साक्षात्कार होतो असा आमचा अनुभव आहे आता शिलास्मारकाचे चित्र पाहून ते दिवस आठवायचे व पुन्हा तो अनुभव येतो का पाहावयाचा एवढेच आपल्या हाती आहे प्रत्येकाने जरूर वर उल्लेखिलेली चार ठिकाणे तरी पाहावी अशी आमची शिफारस आहे

## स्वामी विवेकानंदांची शिकवण

हिंदुस्थानात आहेत तितके आळशी लोक जगात कोठेही नाहीत उठा, जागे व्हा व अथक परिश्रम करा. तुम्हाला जन्म मिळाला आहे तो आळसात निष्क्रियतेत घालवण्यासाठी नाही, तर उद्योग करून जग अधिक सुदर

करण्यासाठी आहे. पाश्चात्त्यांकडून चांगले असेल ते घ्या. पण त्यांची भ्रष्ट नक्कल करू नका. स्वत्व गमाऊ नका. सत्याची कास धरा. प्रत्येक मानवात ईश्वरी अंश आहे. दरिद्री, दुःखी, परित्यक्त लोकांना मदतीचा हात द्या. सर्व माणसे समान आहेत. भेद केले आहेत ते स्वार्थी माणसांनी. ईश्वराने नव्हे, संपत्ती, सत्ता, कीर्ती यांचा लोभ धरू नका. टीका करणारे करीत बापडे टीकेकडे लक्ष देऊ नका. आपण आपले कर्तव्य करीत राहावे.

स्वामी विवेकानंदांच्या चरणी लीन होऊन हे प्रवासवर्णन पुरे करतो.

---

# — गंगालहरी —

१९९४ साली ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात आळंदी येथे आजारी असतांना वेळ जाण्याचे एक साधन म्हणून जगन्नाथपंडितांच्या 'गंगालहरी' या संस्कृत काव्याचा मी श्लोकबद्ध अनुवाद केला. या कामांत ५२ दिवस मोठ्या आनंदात गेले. श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या कृपेने एक फर्लांगही चालू शकत नसलेला मी दोन महिन्यात दोन मैल चालू लागलो.

जगन्नाथपंडित हा मूळचा दाक्षिणात्य पंडित. गोदावरी जिल्ह्यांत मुंगुंडु हे त्यांचे जन्मस्थान. पित्याचे नाव पेरुभट्ट आणि आईचे लक्ष्मी. कविश्रेष्ठ जगन्नाथ हा शहाजहान बादशहाच्या दरबारांत 'पंडितराज' या हुद्यावर होता. एकदा शहाजहान बादशहा व जगन्नाथ पंडित राजप्रसादाच्या गच्चीवर सुखसंवाद करीत होते त्यावेळी एक यवन सुंदरी डोक्यावर पाण्याने भरलेला कलश घेऊन चालली होती. बादशहाने तिचे वर्णन करावयास जगन्नाथ पंडितास सांगितले.

जगन्नाथाने वर्णन केले ते असे

इय सुस्तनी मस्तकन्यस्त कुंभा
कुसुम्भारुण चारु चेल दधाना
समस्तस्य लोकस्य चेत. प्रवृत्तिम
गृहीत्वा घटे न्यस्य यातीव भाति

याचा अथ .-

केशरी रंगाची लालसर सुरेख साडी नेसलेली ही सुदर स्तनाची तरुणी आपल्या मस्तकावरील पाण्याच्या कलशात सर्व प्रेक्षकांची जिकलेली मने घालून ती घेऊन चालली आहे असे वाटते हे वर्णन ऐकूण बादशहा इतका खूष झाला की त्याने जगन्नाथाला काय हवे ते माग असे सांगितले. जगन्नाथाने ती तरुणीच मागितली. बादशहा म्हणाला ' दिली ' शहाजहानने कन्यादान केले औरंगजेब गादीवर आल्यावर जगन्नाथाचा राजाश्रय नष्ट झाला व तो देशोधडीला लागला अखेर त्याने गंगेच्या काठी बसून ' गंगालहरी ' हे काव्य लिहिले. प्रत्येक श्लोकाच्या समाप्तीबरोबर गंगेचे पाणी वरवर चढू लागले व काव्य समाप्त होताच गंगामातेने जगन्नाथाला व त्याच्या यवनपत्नीला आपल्या पोटात घेतले अशी आख्यायिका आहे उत्तर भारतात गंगालहरी हे काव्य गंगेच्या काठी राहणाऱ्या लोकांच्या नित्य पाठांतले आहे

जगन्नाथपडित हा जाडा विद्वान आणि श्रेष्ठ कवि होता. कल्पना-विलास, अर्थसौन्दर्य, लालित्य, प्रसाद, माधुरी, पांडित्य, उचित शब्दांची योजना, रसपरिपोष इत्यादि श्रेष्ठ काव्यगुण जगन्नाथाच्या काव्यात प्रकर्षाने आढळतात गंगालहरी हे काव्य करुणरसाने ओथंबलेले आहे. रसगंगाधर आणि भामिनी-विलास हे त्याचे दोन श्रेष्ठ काव्यग्रंथ संस्कृत वाङमयाला भूषणभूत आहेत इतरहि काही लहानमोठी काव्ये जगन्नाथाने लिहिली आहेत गंगालहरी या काव्याचे मराठी रूपांतर वामनपडिताने केले आहे असे मी ऐकले परंतु ते माझ्या पाहण्यांत आले नाही. शक्य तितका मूळ काव्याला धरून पण सोप्या भाषेत अनुवाद करण्याचा मी प्रयत्न केला आहे

## वृत्त शार्दूलविक्रीडित

गंगे, हें जल शोभतें तव महासौभाग्य या भूमिचें
ज्यानें हें जग निर्मिलें सहज, त्या ऐश्वर्य हें शंभुचें
वेदांचें जणु सार, मूर्त अथवा जें देवतासत्कृत
नाशो आमुचि पापराशि जल तें, शोभे जणू अमृत ॥१॥

गंगे जो तव सुप्रवाह पडता दृष्टीसही एकदा
दीनांचें करि दैन्य दूर तशि ती दुष्टाचि पापापदा
आहे जो गुरु, तोडण्या शिकवितो अज्ञानवृक्षा सदा
देवो तो तव सुप्रवाह सुभगे आम्हां बहू संपदा ॥२॥

सूर्याचें करजाल नाशित तमा जेवी जगीं सर्वथा
तेवी आठविता जिला निरसते पाप्यांचिही अज्ञता
सेवायास सुयोग्य मूर्ति तव जी देवांसही सर्वदा
मूर्ती ताप हरो मम त्रिविध ती, संतापहा चित्तिचा ॥३॥

झाला जो मज गर्व कारण मला आधार तुझा अती
त्यायोगें अपमानिले सकळ मी त्या देवतानां किती
औदासीन्य जरी मनी धरिशि तूं यावेळि माझ्यावरी
आधाराविण त्या तुझ्या वद रडूं कोणापुढें मी तरी ॥४॥

ज्यांनीं त्यागिलि मोठमोठि गणुनी राज्यें तृणाच्या सम
वेताच्छादित या तुझ्या वरियलें तीरास गेहासम
मार्गे सारितसे सुधेस जल जें, तें नित्य जे प्राशिती
आनंदे मग मुक्तिच्या सहज ते मार्गासही हांसती ॥५॥

दायाया सवतीस मत्सर महा बालाकृत्य उमा
फेंकी नेत्रकटाक्ष जे घडविती क्षोभास लाटांमधें
ज्या लाटा करिती बहू चलन त्या शंभूशिरीं सर्वदा
देहापासुनि ज्या तुझ्या निपजल्या नाशोत पापांसदा ॥६॥

जेव्हां राजसती प्रभाति करिती स्नानें जलीं या तुझ्या
तेव्हां तत्स्तनकस्तुरी मिसळते पाण्यांत चेतोहरा
कस्तूरीमृगदेह तत्क्षणि पहा दिव्यत्व संपादिती
स्वेच्छने मग देवतासह पहा ते नंदनीं नांदती ।।७।।

ज्याच्या सुस्मरणे क्षणात अवघ्या चित्तास शांती मिळे
गाता जें तव गोड नाम अवघें मत्पाप दूरी पळे
कानाना रिझवीतसे निशिदिनीं रम्यत्व ज्याचा गुण
ते ' गंगा ' तव नाम अंतसमयीं माझ्या मुखी राहुदे । ८।।

माते, या तव तीरि आणि सुजलीं जे क्रीडती कावळे
इंद्राच्या नगरींतहि न वसती त्यांना मुळीं आवडे
वस्ती जेथिल नाशिते सहजची जन्ममृतीच्या भया
होवो तीर तुझें समर्थ अमुच्या शोकास नाशावया ।।९।।

भेदातीत परी न वेद कथिती स्पष्टार्थ ज्याचा कदा
जाणाया असमर्थ होत रसना, बुद्धी जनाची जया
नाशी जें अतिशुद्ध तत्त्व आमुच्या अज्ञानरूपी तमा
गंगे तू जडवस्तु नाहिस परी तें तत्त्व तू केवळ ।।१०।।

दानें देऊनि, मोठमोठि करुनी ध्यानें, व्रतें, कष्टद
तैसीं आचरुनी सुघोरहि तपें दुर्लभ्य विष्णूपद
लीलेनें मिळवूनि देशि सकलां श्रीविष्णुचें तें पद
ऐसा या वसुधातली कवण तो त्वत्तुल्य आहे वद ।।११।।

जी मूर्ती करि नष्ट संसृतिभया घेतां जिचें दर्शन
मूर्तीचा महिमा तुझ्या जगति या तो कोण वर्णू शके
गंगे, मंगल मूर्ति जी तव धरी शंभू शिरीं नित्य जो
रागानें जरि म्लान झालि गिरिजा पर्वा न तो दाविती ।।१२।।

उन्मत्तीं अति निंद्य जीं गणियली पाप्यांनि जीं त्यागिलीं
उच्चारास अयोग्य अज्ञ गणिती, जीं पातकें थोरली
कांटा येइ तनूवरी म्हणुनिया दुष्टांन जी त्यागिलीं
लोकाची असलीं अधें न श्रमतां तू वारिशी एकली ॥१३॥

स्वर्गातूनिच शोक नष्ट करण्या आलीस तू भूतली
शंभूनें परि त्याक्षणीं निजजट पाशी तुला बांधिली
निर्लोभी हृदयांतही करिसि तू उत्पन्न लोभाप्रती
ऐसा हा गुण जो तुझा सृजितसे बद्धत्वदोषप्रती । १४॥

अज्ञानि नि मुके तसेच बहिरे, जे आंधळे पांगळे
ज्यांना पीडिति ते नवग्रह असे, कामेंचि जे गांजले
देवांनींहि अरक्ष्य जे ठरविलें, नर्कांत जे डुबले
ऐसे उद्धरण्यास औषध जगीं तू हेंच गे एकले ॥१५॥

स्वाभावीकपणेंच स्वच्छ अणखी जें थंडची या अशा
पाण्याचा महिमा तुझ्या जगतिं या विख्यात भारी असे
स्वर्गी जाउनियाहि सागर परी दिव्यत्वही पावुनी
गाताती महिमा तुझा अतिमुदें अद्यापि रोमांचित ॥१६॥

जाते जे करिती लहान असलीं पापें नि पस्तावली
त्यांना शुद्ध करावयास जगती तीर्थे बहू वर्तती
प्रायश्चित्त नसे जयास असलीं पापेंचि जे सेविती
त्यांना उद्धरण्यास या त्रिभुवनीं तूं एकली जागसी ॥१७॥

धर्माचेंहि निधान, आणिकाचि जें संतोषदायी अती
तीर्थांमाजि प्रधान, वस्त्रच जणूं त्रैलोक्यव्यापी असें
अज्ञानासहि नाशिते, करितसे संतुष्ट बुद्धीस जें
संपत्ती वितरे असें जल तुझें नाशो अघे आमुचीं ॥१८॥

द्रव्याची मदिरा पिऊनि भ्रमली दृष्टी जयांची अशा
राजांच्या घरि मागुती भ्रमुनिया जं कष्ट मी सोशिले
शत्रू मी स्वाहितास, मंदमति मी, इच्छा अतां एकची
माते दावि दया मला क्षणभरी, मृत्यू इथें येउदे ॥१९॥

वायुल्पशानामत्तानामत अशा लाटांमुळे या तुझ्या
पाण्याला झणि देति केशररुची अंबोजिनी रेणू ते
देवस्त्रीस्तनमुक्त जो अगरु तो ज्यातें तरी सान्द्रची
माते, निर्मल, पाणि तें तव हरो संसारजालाप्रती ॥२०॥

माते, जन्म तुझा नखांतुनि असे श्रीविष्णुच्या निर्मल
आहे वास जटेंत जाडहि तसा कामारिच्या उज्वल
[illegible]
नाहीं विस्मय कीं महत्वचि तुझें गर्जे जगीं सर्वदा ॥२१॥

येणाऱ्या तटिनी अनेक असती त्या पर्वतापासुनी
आहे कोण तुझ्यापरी चढली जी श्रीशंभुच्या मस्तकीं,
आहे कोण जिनें सदा निजजलें विष्णूपदा क्षाळिलें
अल्पांशेहि कुणी तुझ्यासम, असे सांगू शकेना कवी ॥२२॥

ब्रह्मा [illegible]विरि तो सुखें निरवधी घेवो समाधीसुख
झोपूदे भगवान शेषशयनी, नाचो सदा शंकर
प्रायश्चित्त पुरे, पुरेत अवघी दानें, तपें पूजनें,
इच्छा पूर्ण करूं शके अशिव तू जागी जागीं जोंवरी ॥२३॥

मी आहेचि अनाथ तू असशि गे स्नेहार्द्र, मी बालक
पंगू मी, गतिदायी तूं, पतित मी, तू विश्व उद्धारिशी,
रोगानें अतिग्रस्त मी, भीषज तू, मी हा तृषपीडित,
तूं तो अमृतसिन्धु, मी शरण गे आलों, रुचें तें करीं ॥२४॥

कल्याणी तव ही कथा अवतरे जेव्हां महीच्या तली
तेव्हां सर्व विरून जात गलका, जो त्या यमाच्या पुरीं
पाप्याना यमराजदूत बघण्या अन्यत्र जाती कुठें
देवांचाहि विमानसंघ गरदी आकाशमार्गी करी । २५॥

स्वर्गीची सरिता जिच्या जलि उठे, स्पर्शामुळें वायुच्या,
लाटाच्या मधुनी तुषारसरणी जी नित्यची चंचल
कामक्रोध अतीव जो सृजितसे ज्वाला ज्वराची हृदीं
जाळी जी तनुला पहा निशिदिनी, संताप तो ती हरो ॥२६॥

ब्रह्माण्डासम जो जणूं सकलही त्रैलोक्य सामावितो
ज्याच्या आतिल भाग कन्दुक जणू लाटांमुळे डोलतो
शंभूच्या अति दाट विस्तृत अशा आहे जटाच्या सम
पाण्याचा समुदाय हा तव हरो पापें सदा हीं मम ॥२७॥

मातें उद्धरण्यास निष्प्रभ अशीं तीर्थें पहा लाजती
शम्भू आणिक अन्य देव कर ते कानावरी ठेविती
माते तूंचि दयार्द्रचित्त मजला उद्धारिशी एकली
सर्वांचा गुरुगर्व पापहरणीं तू एकली वारिशी ॥२८॥

चाण्डाळांनीहि त्यागिली करूनियां ज्यांची चिकित्सा महा
ऐसा पापसमूह मी गणियला माझा जणू आसरा
उद्धारार्थ सदैव सिद्ध परि तू पाप्यांचिया मत्सम
होई कैंवि समर्थ मी नरपशु गानी गणाच्या तव ! ॥२९॥

उद्धारोनि जया समस्त जगता वाटेलही विस्मय
ऐसा आजवरी न पातकि मिळे उद्धारण्यातें तुला
इच्छा ही चिरकाल मानसि तुझ्या, साफल्य व्हावें तिचें
प्रेमानें तुजपाशि मी म्हणुनय, माते, पहा येतसे ॥३०॥

श्वानाच्या सम वागतों सतत मी, खोटें वदे सतत,
अभ्यासीत कुतर्क हा विषयचीं, इच्छीं परा दुश्चित,
ऐकोनीहि पुन: पुन: सततची माझे असे दुर्गुण
माते, कोण तुझ्याविना ग्रथिल जो, माझें असें हे गुण ? ॥३१॥

नाहीं घातलि मी मिठी जर तुझ्या रम्या तनूला अतां
डोळ्यांचा उपयोग काय मम या, आहेत जे सुंदर
धिक्कारासचि पात्र कान अमुचे ना ते जरी ऐकती
लाटांचा तव खेळनिर्मित असे जो रम्य मञ्जुध्वनी ॥३२॥

पापें जी करतो मनुष्य अवघीं तीं तूंच गे नाशिसी
लीलेनें, अशि तू जिथें नसशि तें मांगल्यहीन स्थळ
जाती सत्कृति तेथ जे निजबळें स्वर्गा विमानातुनी
पापी ते पडतात नित्य नरकीं लाचारची होऊनी ॥३३॥

विप्रांना वधिती, करीति विषयी दृष्टी गुरुस्त्रीकडे,
मद्यप्राशन नित्य पाहि करिती, सोनें सदा चोरिती
ते, दानें महशूर आणि करिती जे यज्ञ त्यांच्यावरी,
स्वर्गी पावति मान्यता जलि तुझ्या अती तनू अर्पुनी ॥३४॥

जो दुर्लभ्य सुगंध नित्य लुटतो वायु फुलांपासुनी
जो घेतो क्षणि प्राण होति विरहें घायाळ त्यापासुनी
तो पापी परि वायु स्पर्श करुनी लाटा तुझ्या एकदां
लीलेनें करि शुद्ध तीं त्रिभुवनें, आश्चर्य हें मन्मनीं ॥३५॥

आहेती जगतीं बहू सतत जे अन्यार्थही कष्टती,
काही अन्य विशुद्ध अंतरि, कुणी मोक्षाप्रती वांछिती,
जो लोकद्वयभार सर्व मम तो, माते, तुला अर्पुनी
विश्वासूनि कृपेवरी तव, सुखें झोपें जगन्नाथ मी ॥३६॥

संस्कारें अतिहीन, पातकि तसे, पाखंडिही दुर्मती
यांच्या उद्धरणी वसे मनिं तुझ्या तें प्रेम नाटे कधीं,
पापांच्या समुहावरी मम असे तें प्रेम नाटे कधीं,
कोणाचा निज जो स्वभाव बदले, ऐसें घडेना कधीं ॥३७॥

नाचे शंभु प्रदोषकाळिं, उठती लाटा जटाच्या मधें
त्या हातानिच ताल कीं धरुनिया गंगा रमे नर्तनीं,
ढका भासत गोड की डमरूचा अद्रिप्रवेशध्वनी
गंगातांडव तें समस्त अमुचा संताप दूरी करो ॥३८॥

माते सोपविली तुझ्यावरचि मी कल्याणचिंता मम
ती तूं देशिल सोडुनी जरि मला या संकटाच्या क्षणीं,
विश्वासास अपात्र तू त्रिभुवनीं होशील तेव्हां म्हणी,
तेंवी होइल निर्मळा तव दया आधारहीना जगीं ॥३९॥

लाटा ज्या शिवमस्तकावरुनिया गंगामध्ये वर्षति
गौरीच्या, सजवी सदा प्रणयिनी अर्धांग जो शंभुचें,
हस्तें कोमल सारुनी बघतसे सापत्नभावेंचि ज्या
त्या लाटा विजयी असोतचि सदा, वन्दीं जगन्नाथ मी ॥४०॥

माते, येइ न कोण संनिधि तुझ्या पावित्र्येजान्वित
वांछीती फळ जें समर्पिशि तया, हा हेतु त्यांच्या मनीं,
मी येई तुजपाशि कारणची कीं सानन्द आत्मा मम
मर्यादा न जिला अशी तुजवरी प्रीति स्वभावें करी ॥४१॥

भालीं भाविक लोक लाविति टिळा ज्या मृत्तिकेचा तव
आहे भास्करतुल्य जी विनशनीं अज्ञानरुपी तम
भाळींचें अवघें कुयोग करते जी नष्ट तात्काळची
ती माती तव, सर्व शोक करुंदे निर्मूल, जो मन्मनीं ॥४२॥

ज्यांचे चित्त सदा स्वधर्मिच रमे मूर्खांस ऐशा पहा
पुष्पांचा फुलल्या करोनिच सडा जे त्या मिषें हांसती
देती शुद्धपणा सदा मलिन त्या भुग्यास जे सौरत्नें
त्वत्तीरस्थ सुपुष्ट वृक्ष अमुचे सन्मित्र होवोत ते ॥४३॥

कोणी कष्टमयी सदा करिति ती देवाचि सेवा महा,
यज्ञांतें करिती कुणी, इतर ते योगी बनूं पाहती,
मी नामस्मरणीं रमे परि तुझ्या त्रैलोक्यसंचारिणी
मातीं कीं तृणजाल केवळ पहा संसारजालासि या ॥४४॥

विश्रामाविण पुण्यसंचय जिहीं आजन्म केला महा
नाहीं देव समर्थ कोण करण्या कल्याण त्यांचे वद,
सत्कृत्यें नच केलि ज्यानि कधिही, तैसे निराधार जे
त्यांना तारिल जी अशी तुजविणें, माते, दिसेना कुणी ॥४५॥

चाखोनी जल तें तुझें, गमन मी केलेंचि मूर्खासवें
आनंदार्थ धर्मे परी न मजला विश्रान्ति कोठें मिळे
जागा मी बहुकाळ देह मजला, माते, दयाशील तूं
वाऱ्यानें मृदु, शैत्ययुक्त तुझिया अंकीं चिरस्वास्थ्य दे ॥४६॥

व्याघ्रांचे कटिवस्त्र सुंदर तुझें तें घट्टची बांध गे
चंद्राची शिरिं खोंव कोर किरिटीं, सर्पांनि तो आवळीं,
शिवकारी नच आज मात्र मजला सामान्यसा मानुनी
उद्धाराचि घडी असे मम अतां, बाहे जगन्नाथ मी ॥४७॥

## वृत्त सुमंदारमाला

धरी मस्तकीं जो किरीटासि, शोभे शरच्चन्द्रशुभ्रा जिथें चंद्रिका,
जिच्या चार हातीं क्रमें कुंभपद्में भयाभावकल्याण हीं शोभतीं,
अलंकार ऐसे सुधाधार जेवी, महावस्त्रही त्यासि तैसेच जी
वसे शुभ्र नक्रावरी मूर्ति ऐसी, तुझी ध्याति ते नाश ना पावती ॥४८॥

विराजे अती मंद हास्यामुळे त्या मुखाच्या सुतेजें सदासर्वदा,
करी शांत जें भाजले सत्तीच्या महाग्नीमध्यें त्यांस जो लीलया,
जिच्या ज्ञानचंद्रामुळें जन्मलेलें चमत्कार नाना करी चांदणें
प्रिया शंतनूभूपतीची करो ती सुकल्याण माझ्या तनूचें सदा ॥४९॥

सदा तू हरीचीं धुशीं पादपद्में, सदा वाहशी स्वर्गभूमीवरी,
मला होइ संसारसर्पामुळें जो अता ताप तो तूचि गे संहरी,
भिती वाटते ज्याचि देवादिकांही, करी नाश जो अमृताचा क्षणी
जिरोनीहि दिव्यौषधी ज्यात जाती, न मन्त्रामुळेंही हटे जो कधीं ॥५०॥

कशानें गजाचेंहि तें चर्म, नदी, तसा चंद्र, सर्पांचीहि मालिका,
हरोनीहि सर्वस्व द्यूतांत शंभू पणाला तुला लावु इच्छीतसे,
बघे पार्वती हास्यमुद्रा कटाक्षे तुला कोपमुद्रांकिता जेधवां
सुरू होइ जें नृत्य लाटांत क्षोभें, सदाचेंचि पावित्र्य देवो अम्हां ॥५१॥

## वृत्त : इंद्रवज्रा

जी भूषवीते शिर शंकराचें
जी दुःख नाशी सकलां जनाचे
आहे मनोज्ञा विचलत्तरंगा
गंगा करो ती मम शुद्ध अंगा ॥५२॥

## वृत्त : अनुष्टभ्

अमृताचीच ही लाट जगन्नाथ विनिर्मिता
जो पठे नित्य ही, त्याला लाभे सकल संपदा ॥५३॥

टीप :— या अनुवादांत जे गुण असतील ते जगन्नाथपंडिताचे आहेत व
दोष असतील ते माझे आहेत

# लोकराज्य दिन

## सत्यमेव जयते

दि १५-१-१९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व त्यानंतर दि. २६-१-१९५० रोजी भारत हे सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र असल्याची घोषणा करण्यांत आली अपार कष्ट आणि अतुल त्याग करून मिळविलेले स्वातंत्र्य टिकविणे आणि आपला देश वैभव-संपन्न करून देशांतील दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, भांडणतंटे आणि दैन्य नष्ट करण्याचा प्रयत्न करणे हे भारतांतील प्रत्येक माणसाचे पहिले कर्तव्य आहे राष्ट्रपति एकदा म्हणाले त्याप्रमाणे " भारतांत यापुढे कोणीहि राजा नाही, किंवा आपल्यापैकी प्रत्येकजण भारताचा राजा आहे " याचा अर्थ सर्वांचा दर्जा सारखाच आहे मग त्याचा हुद्दा कोणताहि असो व तो कोणताहि समाजोपयोगी व्यवसाय करीत असो. भारतांतील प्रत्येक स्त्रीपुरुषाला पुढील हक्क प्राप्त झाले आहेत : (१) प्रत्येकाला विचार, उच्चार, समजती श्रद्धा व पूजा या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य राहील (२) सर्वांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळेल (३) सर्वांना समान दर्जा व संधी मिळेल. (४) अस्पृश्यता मानली जाणार नाही. (५) केवळ लायकीचाच विचार करून सरकारी नोकऱ्या दिल्या जातील लायकी सिद्ध झाल्यास कोणत्याहि पुरुषाला अथवा स्त्रीला भारतांतील मोठ्यात मोठे स्थान मिळू शकेल. (६) सर्वांना भाषणाचे व मतप्रचाराचें स्वातंत्र्य राहील (७) शस्त्रांशिवाय एकत्र जमणे, संघ वा संस्था स्थापन करणे, भारतात कोठेहि संचार करणे, वस्ती करणे, संपत्ति मिळविणे, धारण करणे अथवा विकणे, व्यापार अगर रोजगार करणे हा प्रत्येकाचा हक्क राहील (८) सार्वजनिक सुखसोयींचा ( दुकाने, खानावळी, करमणूक गृहे दवाखाने, विहिरी, पाणोठे, रस्ते, घाट, उद्याने, धर्मशाळा, वाहतुकीची साधने, वाचनालये, इ.) सर्वांना सारखाच उपयोग करतां

येईल (९) वयाला २१ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला मताधिकार राहील (१०) बंधुभावाची जोपासना केली जाईल, राष्ट्राचे ऐक्य सांधले जाईल आणि व्यक्तीची प्रतिष्ठा सांभाळली जाईल. (११) माणसाची खरेदी-विक्री करणे, वेठीस धरणे आणि बिगार हे गुन्हे समजले जातील. (१२) १४ वर्षांखालील मुलांमुलींना कारखान्यात, गिरणीत किंवा जिवाला जोखीम असलेल्या ठिकाणी नोकरीस ठेवण्यास बंदी राहील. या हक्कांना मर्यादा – समाजाची नीतिमत्ता व स्थैर्य आणि राष्ट्राचे स्वातंत्र्य यांना हानिकारक अशा गोष्टी कोणालाहि करू दिल्या जाणार नाहीत आणि कोणी करू लागल्यास त्याला कायद्याप्रमाणे शिक्षा होईल आपण सर्वांनी अवश्य करण्यासारख्या गोष्टी :– सत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणा प्रत्येक बाबतीत आचरणात आणावयाचा, समाजहितासाठी आपण होऊन–दुसऱ्याच्या भीतीने नव्हे–शिस्त पाळावयाची, सर्व धर्मांबद्दल आदर बाळगावयचा, सर्वांशी समतेने वागावयाचे, शक्य तितके स्वावलंबी बनून इतरांना शक्य ती मदत करावयाची ( निदान श्रमदानाची ) आणि आपले कर्तव्य निष्ठेने करावयाचे

# श्री जवाहरलाल नेहरू

## यांची

भारतांतील सर्व स्त्रीपुरुषांना हांक,

१ राजकीय मतभेद असले तरी प्रत्येकाने देशाच्या संरक्षणासाठी व कल्याणासाठी ऐक्य राखले पाहिजे आणि सर्वांच्या भल्यासाठी आखलेल्या योजना पार पाडण्यासाठी इतरांशी सहकार्य केले पाहिजे

२ राष्ट्राचे कल्याण व ऐक्य यांना पहिले महत्त्व दिले पाहिजे व त्यासाठी जात, पंथ, भाषा व प्रांत यासंबंधीचे भेद मागे टाकून सबंध राष्ट्राचा अधिक विचार केला पाहिजे

३ कोणत्याहि प्रकारच्या हिंसेचा धिक्कार व त्याग केला पाहिजे. हिंसावृत्ति द्वेष निर्माण करते व फुटीरपणाला वाव देते.

४ धर्माचा हेतु व्यक्तीला उच्चत्वाप्रत नेणे आणि इतरांबद्दल सहिष्णुता निर्माण करणे हा असतो संकुचित पूर्वग्रह आणि असहिष्णुता इतरांच्या मनात आपल्या धर्माबद्दल आदर निर्माण करीत नाहीत. आपण केवळ आपल्याच धर्माचा आदर केला पाहिजे असे नव्हे तर इतरांच्या धर्माचाहि आदर केला पाहिजे.

५ सर्वांना समान वागणूक हे आपले ध्येय असले पाहिजे आणि उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य ह्या भावना आपण टाळल्या पाहिजे

६ स्वार्थाला खालचे स्थान देणारे आणि सर्वांचे कल्याण साधणारे नागरिक बनण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे

७ स्त्रियांना सहकारी मानून आदराने वागविले पाहिजे त्यांना पडद्यात अथवा अलग न ठेवता राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये भाग घेण्याची संधी दिली पाहिजे.

८ मुलांना सौजन्याने व प्रेमाने वागविले पाहिजे आणि त्यांना शिक्षा किंवा धाक दाखविता कामा नये.

९ मद्य आणि इतर अमली पदार्थ टाळले पाहिजे

१० ग्रामोद्योग आणि घरगुती उद्योग-धंदे यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि शक्यतोवर खादी वापरली पाहिजे

११ खाद्यपदार्थ व इतर वस्तूमध्ये भेसळ करण्यास प्रतिबंध केला पाहिजे

१२ लाच देणे व घेणे हे देणाराला व घेणाराला वाईट असते आणि त्याबद्दल कडक उपाय योजले पाहिजेत

१३ घर, रस्ता, खेडेगाव आणि शहर नीटनीटके आणि स्वच्छ ठेविले पाहिजे.

१४ राष्ट्राच्या विकासासाठी चालू असलेली पंचवार्षिक योजना, समाज कल्याण योजना ह्यासारखी प्रचंड कार्ये आपण समजून घेतली पाहिजेत आणि ती पुढे नेण्यात आणि पार पाडण्यात सहकार्य केले पाहिजे.

१५ शारीरिक श्रमाबद्दल आदर बाळगला पाहिजे आणि प्रत्येकाने विधायक कार्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे शारीरिक श्रम केले पाहिजेत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५७
दा. क्र. २२२३६
ग्रंथ शाखा (ग्रंथ प्रतो)

REFBK-0024246